जानेवारी १९८८ किंमत २ रु.

# श्री साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक



जानेवारी १९८८

# श्री साईलीला

श्री साईबाबा संस्थान
शिरडीचे अधिकृत मासिक


संपादक

**श्री. रा. द. बन्ने**

कार्यकारी अधिकारी श्रीसाईबाबा संस्थान शिरडी

-: कार्यकारी संपादक :-

**श्री. सदानंद चेंदवणकर**

(मराठी आवृत्ती)

---

**६६ वे)** **किंमत २ रुपये** **(अंक १०**

**दूरध्वनीः- ४१२ २५ ६१**

---

- कार्यालय -

ई निकेतन", प्लॉट नं. ८०४ बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई- ४०० ०१४.
वार्षिक वर्गणी रु. १०/- (ट.ख. सह) किरकोळ अंक २ रु. फक्त.

**श्री साईबाबांच्या संदेशाचा जगभर प्रसार करणे हे श्री साईलीलाचे मुख्य उद्दिष्ट आहे.**



# रघुनाथ सावित्री साईनाथ भजनमाला

३७

चिंतावे शोधावे अंतरी तुला बां।
साई गुरुबाबा कोठकोठें।।
उघडावें कैसे तेची निज डोळे।
जेणें श्रीसोहाळे पाहूं शके।।
ध्यान तें करावें कोणत्या प्रकारें।
जेणें मन मुरे स्वरुपांत।।
दास म्हणे माझी ऐका जी विज्ञप्ती।
देई तव प्राप्तीं दर्शनाची।।

३८

सुख वाटे फार सांई दिलदार।
वाही कारभार भक्तांचा तो।।
न सोसवे दुःख लेंकरांबाळांचें।
वेळीं त्या धैर्याचे बळ देती।।
किती हो प्रपंच वाढविला त्यांनी।
सर्वांसी हस्तांनीं साह्य लाभे।।
दास म्हणे आम्हां वाली भेटला हो।
तयाचा मी लाहो जीवीं धरीं।।

३९

पहावें तितुकें देवा तुझें रुप।
सद्रूप चिद्रूप तूंचि तोची।।
नाना छंदे रंगे कसा नटलासी।
घटघटनेसी कारण तूं।।
बोलतो हा कोण बोलविता कोण।
एक नारायण सर्वांभूतीं।।
धन्य तूं ईश्वर नाहीं अंतसीमा।
द्यावया उपमा कोण शके।।
योगी ध्यानी तपी शिणले शोधतां।
रमला खेळतां गोपांसंगे।।
अर्जुन–रथींचें केलें तूं सारथ्य।
ज्ञान बोध पथ्य देउनियां।।
भक्त एकनाथ सांवता बोधला।
गाइलें गीताला जनीसंगें।।
कबीर नानक तुका नामदेव।
झाले ज्ञानदेव ज्ञानी जगीं।।
चोखामेळा गोरा श्रेष्ठ रामदास।
आले उदयास भक्त तुझे।।

## नूतन वर्षाभिनंदन

ख्रिस्ती शताब्दीप्रमाणे सुरु होणारे नूतन वर्ष आमच्या असंख्य वाचकांस, लेखक कवी तसेच हितचिंतकास सुखाचे, समृध्दीचे व भरभराटीचे जावो.

— का. संपादक

या मासिकात प्रकाशित झालेल्या लेखांतील
मतांशी संपादक सहमत आहेतच असे नाही.


# श्री साईलीला, जानेवारी – १९८८

## अनुक्रमणिका


| क्रमांक | लेख-कविता शिर्षक | लेखक-कवि नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | संपादकीय | – | ४ |
| २. | संत सद्‌गुरु श्री साटम महाराज | – श्री. भालचंद्र गद्रे | ६ |
| ३ | ओम् नमो साई | – श्री. रमाकांत पंडित | १० |
| ४ | मी पाहिलेले साईबाबा | – डॉ. गजाननराव दाभोलकर | १३ |
| ५ | श्री साईबाबांची शिकवण | – श्रीमती ज्योती उमडेकर | १७ |
| ६ | श्री साईनाथांची शिकवण... | – श्री. शरदचंद्र शेरे | १८ |
| ७ | साईबाबा – एक जागृत दैवत | – श्री. दि. रे. बाबरेकर | २० |
| ८ | मुंबापुरीतील श्री साईबाबांचे सर्वात मोठे मंदिर | – साईनंद | २२ |
| ९ | श्री साईबाबांची अतर्क्य लीला | – श्री. दत्ताराम केरकर | २५ |
| १० | ओम् साईनाम | – श्री. जनार्दन बांदेकर | २७ |
| ११ | ग्रंथ परीक्षण | – | ३२ |
| १२ | दर गुरुवारचा श्री साईमहाराजांचा पालखी सोहळा | – श्री सदानंद चेंदवणकर | ३६ |
| १३ | ध्यास तुझा लागला | – सौ. अनुराधा पिंपळगावकर | ३९ |
| १४ | इति श्री साई उवाच | – श्री डी. जी. देशपांडे | ४० |
| १५ | तुमचे श्री साईबाबांविषयक सामान्यज्ञान किती आहे? | – श्री. सदानंद चेंदवणकर | ४५ |
| १६ | साईदरबारातील माणिक आणि मोती – ४ | – सौ. विभावरी राणे | ४६ |
| १७ | श्री. खापर्डे यांची शिरडी दैनंदिनी | – साईनंद | ४९ |
| १८ | श्री साई आणि भक्तीच्या नवविध भूमिका | – श्री. चकोर आजगांवकर | ५० |
| १९ | देव श्रेष्ठ की गुरु श्रेष्ठ | – श्री. हरिश्चंद्र म्हात्रे | ५२ |
| २० | जय प्रभो साईनाथा | – श्री. दा. र. दळवी | ५४ |
| २१. | श्री साईबाबांनी रक्षण केले | – कै. श्री. वसंत प्रधान | ५५ |
| २२ | साईचरणी प्रार्थना | – कु. नीता लिंगरकर | ५७ |
| २३ | साई! साई! साई! | – सौ. प्रतिभा दमनिया | ५७ |
| २४ | श्री साईनाथांची थोर कृपा | – श्री. विश्राम कदम | ५८ |
| २५ | लकी नंबर | – सौ. विजयालक्ष्मी वैऊडे | ६० |
| २६ | साईकृपे ऑपरेशन यशस्वी झाले | – सौ. अर्चना चंदने | ६२ |
| २७ | श्री बाबांची कृपा | – कु. रेश्मा धेंडे | ६३ |
| २८ | शिरडी वृत्त – सप्टेंबर १९८७ | – | ६४ |
| २९ | अव्यक्त साई जगती, शुभ संक्रमण पहाती। | – श्री. मधुकर अंबाडे | ६४ |

# संपादकीय

# श्री साई – ज्ञानाचे भांडार



संतचूडामणि भगवान श्री साईनाथ महाराजांनी आपल्या हयातीत आपला कोणताही शिष्य तयार केला नाही. तेव्हा आज बाबांचा कुणीही शिष्य नाही. तसा शिष्य असता तर शिरडीत आज मोठी अडचण निर्माण झाली असती. श्री साईमहाराजांनी कोणताच ग्रंथ लिहिला नाही, पुस्तक लिहिले नाही. तसे लिहिले असते तर त्याच्या विक्रीवरील पैशासाठी आणि आवृत्त्यांवर आवृत्त्यांच्या पुन्हा पुन्हा छपाईसाठी कितीतरी अडीअडचणी निर्माण झाल्या असत्या. श्रींनी दूरवर विचार करून या सर्व गोष्टी टाळल्या असेच म्हणावयास पाहिजे.

श्री बाबांनी बोधामृत देऊन तत्कालीन जनतेला व समाजाला जागे करण्याचा, परमेश्वराचे ध्यानी लागण्याचा महान उपदेश केला. ते खरोखरीच ज्ञानाचा सागर होते, असेच म्हणावयास हवे. श्री साईबाबा प्रत्यक्ष परमेश्वरच होते. सामान्य माणसाप्रमाणे ते शिरडीतच नव्हे तर या भूतलावर ते वावरले खरे पण ते ब्रह्मस्वरुपात होते हे विसरतां कामा नये. लौकिक दृष्ट्या ते इंद्रियांवर विजय मिळवून वागत होते. ते साधकांना मार्गदर्शक होते. बाबांनी तेव्हा अनेकांच्या जीवनात अध्यात्म ठसवून त्यांना ज्ञानी केले. आजही अनेक भक्त श्री साईबाबांपासून अध्यात्म साधना करीत असतील. ज्ञानीयांचा राजा योगेश्वर श्री ज्ञानेश्वर माऊली म्हणतात-

माझा मऱ्हाठाची बोल कौतुके।<br>
अमृतातेही पैजा जिंके॥

हेच बोल श्री बाबा अगदी खालच्या थरातील लोकांना ग्रामीण मराठी भाषेत शिकविण्यासाठी पुन्हा शिरडीत अवतीर्ण झाले. कालमानानुसार व देशातील प्रचलित समस्यांनुसार बाबा लोकांना ज्ञान देत होते. ते साचे बंद नव्हते. श्री ज्ञानेश्वर माऊलीने अध्यात्मिक ज्ञान वाङ्मय निर्मिती करून दिले तर श्री साई माऊलीने वेगवेगळ्या स्तरावर तसे तसे अडाणी, अशिक्षित लोकांना सुध्दा अध्यात्म शिकविले. ज्यांच्यापर्यंत साधे प्राथमिक मराठी शिक्षण पोहोचले नव्हते त्यांना श्री ज्ञानेश्वर माऊलींची ज्ञानेश्वरी, भावार्थदीपिका, अमृतानुभव इ. समजणे फारच कठीण होते व तसा त्यांचा प्रचार–प्रसारही खेडोपाडी नव्हता. अजूनही ज्ञानेश्वरी कित्येकांना दुर्बोध वाटते.

पण आज परिस्थिती बदलली आहे. श्री साईनाथ महाराज त्या काळी प्रत्येकाची अधिकार स्थिती, ग्रहणशक्ती विचारात घेऊन ज्ञानप्रदान करीत असत. श्री देव मामलेदारांना ज्ञानेश्वरी समजावली बाबांनीच. श्री नानासाहेब चांदोरकरांना गीतेचा

अर्थ समजावून सांगितला त्यांनीच. श्री संत दासगणू महाराजांना ईशावास्य भावार्थ बोधिनी लिहीत असताना न समजलेल्या एका प्रमेयाची उकल मोलकरणीच्यामुखातून करविली बाबांनीच. श्री ज्ञानेश्वर माऊलीने रेड्यामुखी वेद वदविल्याची आठवण होते श्री साईबाबांकडे ज्ञानाचा भरपूर साठा होता. जणू ज्ञानभांडारच त्यांचेकडे होते. अध्याय ३२वा पहा. उतून चालिला आहे खजिना। एकही कोणी गाड्या आणीना।। खणा म्हणता कुणीही खणीना। प्रयत्न कोणा करवेना।।१६२।। मी म्हणे तो पैका खणावा। गाड्यावरी लुटून न्यावा।। खऱ्या माईचा पूत असावा। तेणेच भरावा भांडार।।१६३।। असा हा बाबांजवळचा ज्ञानाचा खजिना व भक्तीची लयलूट करावयाची असेल तर शिरडी हे ज्ञानपीठ आहे.

श्री साईनाथ महाराजांनी श्री म्हाळसापती, दीक्षित, जोग, महाजनी, बुटी, खापर्डे, संत उपासनी, चांदोरकर, मेघा अशा एक ना दोन अनेकांना, त्यांच्या सहवासात आलेल्यांना, त्यांचे केवळ दर्शन घेतलेल्यांना सुध्दा ज्ञानी करुन सोडले होते.

तेव्हा बाबा भक्तांनो, मी साईभक्त आहे, एवढेच म्हणण्यावर भागवू नका, बाबांजवळ भरपूर ज्ञान भांडार आहे. बाबा बी.ए., एम. ए., पी.एच. डी. नव्हते पण आजच्या या पदव्या मिळविणाऱ्यांना सुध्दा बाबांचे ज्ञानामृत, बोधामृत खरोखरच लाजवील. तेव्हा भक्तांनो, ज्ञान मिळवा. ते मिळविताना बाबांच्या चरणाजवळ स्थिर व्हा. एकत्रित व्हा. स्वतः श्री साईनाथ सद्‌गुरुच्या भूमिकेत म्हणतात, गुरुकडे कसे पहावे– अध्याय ३२– गुरु एक दृष्टीचे ध्यान। इतर सर्व गुरु समान।। नाही गुरुविण दुजें आन। अनन्य अवधान या नाव।।

# श्री साईलीला
# श्री साई काव्यबहार विशेषांक

श्री साईलीला पुढील अंक श्री साईकाव्यबहार विशेषांक म्हणून नेहमीप्रमाणे प्रसिध्द होईल. या अंकासाठी कुणीही काव्यात्मक मजकूर पाठवू नये, अशी विनंती. गेली कित्येक महिनेच्या महिने स्वीकृत केलेला मजकूर शिल्लक असल्याने नव्याने आलेल्या मजकूरास या अंकात स्थान देणे केवळ अशक्य आहे.

का.संपादक

# ५०व्या पुण्यतिथी निमित्त

# कोकणचे असामान्य संत सद्‌गुरु श्री साटम महाराज

**- श्री. भालचंद्र गदे**

सुखनिवास, चेंदणी, ठाणे.


कलियुगातील माणूस दिवसेंदिवस अनितीकडे झुकतोय. कुणाचा कुणाला ताळमेळ राहिला नाही. अनिती, अनाचार, अश्रध्दा वाढून धर्मा-धर्मांत असहिष्णुता निर्माण होऊन, सारा समाज बेसहारा बनू पहातोय. देवा-धर्मावर विश्वास नसलेला नास्तिक समाज वाढू लागल्यावर, नामाच्या भक्तिने श्रध्दावान नवसमाज तयार करण्याचे व धर्मा-धर्मांतील अंतर दूर करुन सारी एकाच मातेची लेकरे आहेत, सर्वांनी सर्वांशी मायेने- आपुलकीने वागण्याचा त्यांना संदेश देऊन, त्यांच्या जीवनात आनंद निर्माण करण्याचा प्रयत्न, परमेश्वराने हरेकवेळी वेगवेगळ्या अवतारात जन्म घेऊन केला. श्री अक्कलकोटस्वामी, शिर्डीचे श्री साईबाबा, शेगांवचे श्री गजानन महाराज, श्री टेंबेस्वामी, कणकवलीचे श्री भालचंद्र महाराज, पावसचे श्री स्वामी स्वरुपानंद तर दापोली सावंतवाडीचे श्री साटम महाराज ही सर्व थोर मंडळी **परमेश्वरांचेच अवतार होते.**



सद्‌गुरु श्री साटम महाराजांनी दापोली-सावंतवाडी (रत्नागिरी) येथील आपल्या वास्तव्यात अनेक अद्‌भुत, अगम्य लीला करुन लोकांना आपल्याकडे खेचून घेतले व त्यांना ऐहिक, पारमार्थिक सुखाचा राजमार्ग दाखविला.

मालवणातील मसुऱ्यानजिक कोहोळ गाव आहे. या गावच्या चारिवडे वाडीत सद्‌गुरु श्री. साटम महाराज यांचा जन्म झाला. त्यांच्या वडिलांचे नाव नारायणपंत व

आईचे नाव लक्ष्मीबाई. ते जातीने मराठा होते. तसेच ते दोघेही अतिशय धार्मिक वृत्तीचे व सत्प्रवृत्त होते. मंदिरात जाऊन शंकराची बेल, फुलांनी पूजा केल्यावर, त्यांचे वडील तासनतास मूर्तीला मिठी मारुन बसायचे. आपल्या पोटी भगवान शंकराने जन्म घ्यावा, यासाठी ते खूप व्रतवैकल्ये करीत. एकदा त्यांना स्वप्न पडले. स्वप्नात ते पिंडीसमोर ध्यानस्थ बसले होते. एवढ्यात मंदिरातील घंटांचा आपोआप नाद सुरु झाला. महादेवासमोरील नंदी उठून उभा राहिला व महादेवाची पिंडी गुप्त होऊन तेथे त्यांची पत्नी शांतपणे झोपली होती. तिच्या अंगावर बेलाची पाने व फुले पसरली होती व मस्तकावर पाच फण्याच्या शेषाने आपली फणा धरली होती. सारा गाभारा तेजाने उजळला होता. त्यांच्या ह्या स्वप्न–दृष्टांताप्रमाणे लवकरच त्यांना मुलगा झाला. **शंकराचा प्रसाद म्हणून त्यांनी त्याचे नाव** 'शंकर' असे ठेवले.



मुलगा चार वर्षांचा झाल्यावर मात्र साटम कुटुंब उदरनिर्वाहासाठी मुंबईला आले. तेथे कामाठीपुऱ्यात तेराव्या गल्लीत ते रहात असत. शंकर लहानपणी फार हूड होता. त्याने शिक्षणही त्यामुळे अर्धवट सोडले. त्यातच आजूबाजूच्या लोकवस्तीचा परिणाम शंकरवर झाल्याने तो बिघडला. व एका पारशाच्या गुत्त्यावर काम करु लागला. त्यामुळे दारुडे, जुगारी, सट्टेबाज यांच्या जाळ्यात तो ओढला गेला. शंकरचे हे विचित्र वागणे पाहून त्याच्या आई–वडिलांना मात्र असह्य वेदना होऊ लागल्या. असा पुत्र पोटी आल्याबद्दल सतत दुःख होऊन त्यांना जगणे कठीण होऊ लागले. शेवटचा उपाय म्हणून त्यांनी शंकरचे लग्न करुन टाकले. पण तराही त्याच्या स्वभावात फरक

पडत नव्हता. एकदा गुत्त्यावर शंकरचे एका दादाबरोबर भांडण झाले. तो गँग घे त्याच्या घरावर चालून आला. त्यावेळी घरातल्यांना न जुमानता शंकर बाहेर धावल तो एकटा त्यांच्यावर अक्षरशः तुटून पडला. त्याच्या तडाखेबंद लाठीच्या प्रह गुंडांची पांगापांग झाली. व तेव्हापासून शंकर तेथला 'बडादादा' झाला. लोकांन त्याची जरब वाटू लागली. पुढे पेस्तनजीबाबाने आपले दुकानही शंकरच्या ह केले. पण लोकनिंदेमुळे शंकरच्या आईवडिलांनी दुःखाने प्राण सोडले. शंकरव दुःखद घटनेचा विलक्षण परिणाम झाला. तो तासन्तास विचार करु लागला. त्य पत्नीही कंटाळून गावाला निघून गेली व भाऊ आणि वहिनीही प्लेगच्या साथीला पडल्याने, शंकर पुरताच एकटा पडला. सातत्याच्या विचार-चिंतनामुळे, अमर-चि शाश्वतपद प्राप्त करण्याचा त्याने दृढ निश्चय केला.

चर्चगेट स्टेशनजवळ पारशांची पवित्र विहीर आहे. पेस्तनजीबाबा बरोबर श तेथे दर्शनार्थ जाऊ लागला. तेथे अनेक बैरागीही बसायचे. अनाहूतपणे बैराग्यांचा सहवास शंकरला फार आवडू लागला. व पुढे पुढे गुत्त्यावरही न जाता स वेळ तो तेथेच घालवू लागला. तेथेच एका अवलियाशी शंकरची गाठ पडली. त्या तेजाने मोहीत झाल्याने तो सारखा त्या अवलियाच्या मागे–मागे राहू लागला. शंक ते वेड पाहून, अवलिया त्याला म्हणाला, "ह्या जगात मान, कीर्ति, सत्ता,स्त्री, यासाठीच सारे वेडे झाले आहेत. त्यांना देवाकरिता वेडा झालेला जीव क समजणार? लोक तुला काहीही म्हणत असले तरी तुला दिशा दाखविण्याचा ईश्व मला आदेश दिला आहे." नंतर त्याने शंकरच्या डोक्यावर हात ठेवून त्याला अनु दिला. त्याची कुंडलिनी शक्ती जागृत केली. त्या परीस-स्पर्शाने शंकरदाद जीवनपटच साफ बदलला. मुंबईहून भ्रमंती करीत–करीत ते आंबोलीच्या घन जंगलात आले. येथे त्यांनी घोर तपश्चर्या केली. सर्व दिव्य–भव्य अनुभव स अवस्थेत त्यांना मिळू लागले. विदेहाअवस्थेत ते नाचू–गाऊ लागले. क्षणाक्षण त्यांचे भाव बदलू लागले नि पूर्णत्वाला जाऊन अमृतानुभव मिळवून ते जगाचे "स महाराज" झाले!

महाराजांकडे सावंतवाडीकरांचे लक्ष वेधण्याचा प्रसंगही मोठा अद सावंतवाडीचा एक गाडीवान आषाढी-कार्तिकीला पंढरपूरला दिंडीबरोबर जात नेहमीप्रमाणे दर्शन घेतल्यावर त्याला कॉलऱ्याने गाठले. तो वाटेतच खितपत प असता, एक साधू पिठलं–भात खायला उठवतोय, असे त्याला स्वप्न पडले. उत्साहात तो उठून चालू लागला. आंबोलीच्या धर्मशाळेत तो आल्यावर तेथे प मारुन त्याने हात–पाय धुतले.. तोच दाट झाडीतून कुणीतरी आपल्याला मारतोय, असे वाटून त्याने त्या दिशेकडे पाहिले, तो स्वप्नातलाच साधू पुढे उभा आनंदाने धावत जाऊन त्याने त्याचे पाय पकडले. तेवढ्यात एक धनगर पिठलं– घेऊन तेथे हजर झाला व सर्वांनी मिळून आनंदाने जेवण केले. नंतर त्यांचा घेऊन वारकरी सावंतवाडीच्या दाणोलीला आला, एका खडकाजवळ क्ष

थांबला. तोच "अरे दमलास का? देवाने मला सोबतीसाठी पाठविले आहे. चल,मी येतो तुझ्याबरोबर वाडीपर्यंत" ही वाक्ये व परिचित आवाज कानी पडला म्हणून वारकऱ्याने वळून पाहिले. तो तोच साधू मागे उभा! वारकऱ्याच्या आश्चर्याला त्यामुळे पारावार उरला नाही. नि त्याचवेळी हा साधासुधा साधू नाही,हे त्याने मनोमन जाणले.

डोकीवर जटाभार, दाढी वाढलेली, अंगावर कांबळे तर कधी नग्न अवस्थेत साटम महाराज सावंतवाडीत फीरत असायचे. लोक त्यांना वेडा समजायचे. लहान मुले तर त्यांना दगड मारुन खोड्या करायचे. वारकरी मात्र समर्थांना पूरता ओळखून होता. तो त्यांना खाऊ-पिऊ घाले व हे क्लेश आपण का भोगता? असे विचारे. "टाकीच्या घावांनी देवपण येतं" असं उत्तर देऊन ते त्याला गप्प बसवत. हळूहळू समर्थांना वेडा म्हणणारी माणसेच त्यांच्यासाठी वेडी होऊ लागली. माणसं त्यांच्या-भोवती जमा होऊ लागली. त्यांना एकेक अनुभव येऊ लागले. त्यामुळे त्यांची महती वाढू लागली. जो-तो महाराजांची बडदास्त ठेवू लागला. ते कधी एका ठिकाणी थांबत नसत. कधी आंबोलीच्या जंगलात, कधी इन्सोलीच्या बेटात, कधी नागझरीवर तर कधी ते गुरांच्या गोठ्यातही आढळायचे.

त्याकाळी राजाच्या गाडीला आडवं जाणं म्हणजे साक्षात मरणच! सावंतवाडीचे राजे श्रीमंत बापूसाहेब महाराज भोसले एकदा गाडीने चालले असता, श्री साटम महाराजांनी राजाची गाडी मध्येच अडवली.ते म्हणाले,"दिल्लीला पळतोस कशाला? तुझे ताट वाड्यावर निवून चालले आहे." त्यावेळी महाराजांना लोक वेडा म्हणत. तरीही लोकांचे न ऐकता त्या वेड्याच्या विलक्षण-वाणीने प्रभावित होऊन राजाने गाडी परत राजवाड्यावर नेली. तर सावंतवाडीला आपले कागदपत्र नुकतेच येऊन पडल्याचे व आता दिल्लीला जाण्याचे कारण उरले नसल्याचे राजाच्या लक्षात आले. ह्या चमत्कारामुळे राजांची महाराजांवर श्रध्दा बसली व ते त्यांचे निरिस्सम अनुयायी बनले. एवढा मोठा राजाच महाराजांचा भक्त झाल्यावर मग सारा समाजच श्री.साटम महाराजांच्या मागे लागला व मग दाणोलीला लोकांची गर्दी वाढू लागून ते एक श्रीक्षेत्र बनले.

महाराज काही तरी जादुटोणा करतात. ह्या संशयाने एक तरुण टोळके दाणोलीला आले होते. समर्थांनी त्यावेळी उग्र स्वरुप धारण केले. कुणालाच ते जवळ येऊ देईनात. त्या उन्मत्त अवस्थेत केवळ दृष्टीक्षेपाने त्यांनी एका घराला अग्नि लावला. त्या घराला प्रदक्षिणा घालून ते पेटत्या घरात आत शिरायचे तर क्षणात बाहेर यायचे. तर अग्नीत उडी घेऊन ते पद्मासन घालून अधांतरीच बसायचे. हा जबरदस्त चमत्कार पाहून त्या तरुण टोळक्यातील एक जण फार प्रभावित झाला. त्याला समर्थांविषयी ओढ वाटली. ते जाणून समर्थांनी त्या जळत्या घरातील एक पेटते फळकूट फेकून त्यावर बसण्याची त्याला आज्ञा केली. तोही श्रध्देने त्यावर निवांत बसला. त्यामुळे खूष होऊन, समर्थांनी त्याला एक निखारा देऊन तो धोतराच्या गाठीत बांधायला सांगितले. घरी जाऊन तो पहातो तो त्याचे सुंदर

शिवलिंग त्याच्या हाती लागले. ह्या गुरुप्रसादाने तो त्यांचा अनन्यभक्त झाला.

मालवणचे श्री. गजाननराव वायंगणकर यांच्या कुटुंबावर समर्थांची विशेष माया होती. मालवणवरुन जाताना ते हमखास श्री. वायंगणकरांच्या बंगल्यावर उतरायचे. त्यांचे सारे कुटुंबच समर्थांच्या छायेत होते. समर्थांच्या ह्या कुटुंबावरील मायाळू अनुग्रहामुळे पुढे त्यांचे सुपूत्र श्री. रघुनाथ यांनी अंतःस्फूर्तीने "सद्गुरु श्री समर्थ साटम महाराज" हे महाराजांचे पहिले गद्य-चरित्र आपल्या रसाळ भक्तियुक्त शब्दांत लिहिले. महाराजांच्या खूपश्या लीला ह्या पुस्तकात फार छान एकत्रित झाल्या असून, हे देखणे पुस्तक भाविकांना मुद्दाम संग्रही ठेवण्यासारखे झाले आहे. ठाण्याचे सद्गुरु सेवक श्री. दिनकर देवळेकर यांनाही महाराजांनी समाधी मंदिरात अनुग्रह दिला असून, समर्थांच्या ओढीने त्यांच्यावर पद्य-काव्य रचून, समर्थ- प्रचार करण्याचे व्रत त्यांनी स्वेच्छेने अंगिकारले आहे. त्यांचीही समर्थांवरील पुस्तके प्रसिध्द झाली आहेत.

नुसतेच चमत्कार करण्याचा समर्थांचा हेतू नव्हता तर प्रसंगोपात नाना चमत्का करुन त्यांनी लोकांना श्रध्दावान केले. एवढेच नव्हे तर आपला भक्त ज्ञानी कस होईल, स्वतः अंतर्मुख बनून परिस्थितीशी स्वतःच कसा सामना करील यावर त्यांच भर होता. म्हणूनच नुसतेच चमत्कार करण्याच्या मागे न लागता, प्रसंगी त्यांन आपल्या भक्तांवर मुद्दाम संकटे टाकली व त्या संकटाला सामोरे जाण्यासाठी श्रध्दा भक्ती, निष्ठा यांची प्रत्येक जीवाला किती आवश्यकता आहे, हे एकेक अनुभवांतून संकटांतून आपल्या भक्ताला अनाहूतपणे शिकवून "समर्थ" भक्त तयार केले.

शेवटपर्यंत दाणोलीत (सावंतवाडी) ते मुक्काम ठोकून होते. दुःखी-कष्टी जीवांन नामाचा आधार देऊन, त्यांना श्रध्दावान नितीमान बनवण्याचे अवतारकार्य त्यां केले. शेवटी तेथेच दि. २८ मार्च १९३७ रोजी (फाल्गुन कृष्ण २, शके १८५ आपले हे अवतारकार्य संपवून समर्थांनी देह ठेवला. त्यांची समाधी दाणोली येथ बांधली असून आजही ह्या अत्यंत-जागृत समाधीची प्रचिती श्रध्दावंत भाविकांना ये आहे.

# ॐ नमो साई

- श्री. रमाकांत पंडि
प्रभास्मृती, भाऊदाजी रोड, माटुंगा, मुंबई-

केवळ महाराष्ट्रच नव्हे तर सारा भारत साधुसंतांची एक महान खाण आहे. भूमीत गेल्या हजारो वर्षात संतमहंतांची जी एक अखंड आणि दिव्य परंपरा आढ

येते,तशी परंपरा जगातील इतर कोणत्याही देशात आढळून येत नाही. तसेच अवतार कल्पना ही भारतीय परंपरेत आढळणारी एक महान विचारसरणी आहे. धर्माची स्थापना अधर्माचा नाश, दुष्टांचा संहार आणि सज्जनांचे परिपालन अशी चतुर्विध कामे पार पाडण्यासाठी ईश्वर अनेक अवतार घेतो,अशी भारतीयांची पारंपारिक श्रध्दा आहे. या श्रध्देतून अलौकीक कार्य करणाऱ्या व्यक्तींना सुध्दा अवतारत्व देण्यात आले आहे. अशा अलौकीक व्यक्तिमत्वाच्या-साधुसंतात शिरडीच्या श्री साईबाबांचा समावेश होतो.

प्रत्यक्ष शरीराने जरी साईबाबा आज विद्यमान नसले तरी श्रध्देच्या रुपाने आज ते आपल्या असंख्य शिष्यांच्या हृदयात जिवंत आहेत. जशी श्रध्दा तसे फळ या न्यायाने आजही भक्तांना फळ मिळत राहते, असे अनेकांचे अनुभव आहेत.

सबका मालिक एक या तीन शब्दांमध्ये ब्रह्मा, विष्णू, महेश्वर यांच्या उपदेशाचे सार सर्वस्व सामावलेले आहे व ते सार काढणारे महान अवलिया होत साईबाबा.

श्री साईबाबांची शरीरयष्टी सुमारे ६।फूट, तीक्ष्ण दृष्टी, विशाल भालप्रदेश,अंगात कफनी, कपाळावर एक हिरवा पिवळा रुमाल बांधलेला, अशी ही व्यक्ति नित्य धुनीपाशी बसलेली. चिमट्याने मधूनमधून निखाऱ्यावरील राख झाडत व चिलमीचे झुरके मारीत मारीत,कधी एकदा दुसरा शब्द बोलत असत. श्री साईचे सहज बोलणे परंतु ते अमृततुल्य असून परम हितकर होते. श्री साईबाबा जितेंद्रिय होते. त्यांचे खाणे म्हणजे अर्धी भाकर आणि चटणी, ती मिळाली व कटोरभर पाणी मिळाले की संपले. श्री साईबाबा म्हणजे दयेचे सागर. एकदा हातात अर्धी भाकर व चटणी घेऊन खाण्यास सुरुवात करणार तोच एक भिखारी तेथे आला. साईबाबानी आपल्या हातांतील सर्व भाकरी व चटणी ताबडतोब प्रथम त्या भिखा—यास देऊन त्याची भूक शमविली. दुसऱ्याच्या सुखात सुख मानण्याचे व दुःखात दुःख मानणारे साई होते.

साईबाबांच्या अवतारकार्याचा मुख्य उद्देश जर काय असेल तर दुःखीताच्या जीवनात आनंद निर्माण करणे, थकलेल्यांना, श्रमलेल्यांना चैतन्य देणे, त्यांचे दुःख दूर करुन त्यांना भगवत भजनाची आवड निर्माण करणे. श्री साईबाबांनी आपल्या अवतार कार्याने संपूर्ण विश्वाला आनंद देऊन आपली जीवन ज्योत आसमंतात अदृश्य केली.

भगवान श्रीकृष्णाचा उद्धव व समर्थ रामदासांचे कल्याण त्याचप्रमाणे श्री म्हाळसापती हे श्री साईबाबांचे एकनिष्ठ भक्त होते. शिरडीत श्री खंडोबा मंदिरात "आवो साई" असे म्हणून म्हाळसापतीनी त्यांचे प्रथम स्वागत केले. श्री म्हाळसापतींनी दिलेले नावच पुढे रुढ होऊन साईबाबा भक्तांचे प्रिय दैवत झाले. श्री साईबाबा राम तर श्री म्हाळसापती लक्ष्मण. श्री म्हाळसापतीची थोर भक्ती, एकनिष्ठा यामुळेच बाबा शिर्डीत कायम वास्तव्यास राहिले नि आज शिरडी पुण्यनगरी बनली आहे. श्री म्हाळसापतीनी बाबांच्यातील दैवी अवतार ओळखला, जाणला नि अखंडसेवा भक्ति, दृढ विश्वास, निष्ठा बाबांच्या चरणी वाहिल्या. म्हणूनच बाबांचे ते परमभक्त झाले नि खऱ्या अर्थाने सर्व भक्तजनास त्यांची ओळख पटली. रामाबरोबर जशी लक्ष्मणाची

महती तशीच श्री साईबाबांबरोबर श्री म्हाळसापतीची महती मान्य करावी लागेल. श्री म्हाळसापतीने श्री बाबांच्या सहवासात ६० वर्षे घालविली.ह्या प्रदीर्घ अवधीत ते नित्य बाबांची सेवा करीत. श्री बाबांच्या पूजेचा मान त्यांचाच होता. श्री म्हाळसापती, श्री तातोबा श्री बाबांच्या समवेत नित्य मशिदीत झोपत असत. पूर्व, पश्चिम, उत्तर दिशांना डोके करून तिघे झोपत पण झोपते वेळी त्यांचे पाय एकमेकांच्या पायात भिडत. तिघांच्या रात्रभर गोष्टी चालत. असा क्रम १४ वर्षे अव्याहत चालू होता.

श्री साईबाबांची प्रेमळ नजर लोकांना सांगून गेली की तुम्ही कितीही माझ्यापासून दूर राहिलात तरी तुम्ही माझे आहात व मी पण सदैव तुमचाच आहे व असेन. साईचा आदर्श डोळ्यांपुढे ठेवून अंतःकरणापासून साई हे नाव घेऊन आपले आचरण करणे, हीच साईभक्ती. तेथे डामडौलाला अजिबात स्थान नाही. त्याच्याकरिता सोवळे ओवळे नको, धूपदीप काही नको, शुध्द आचरणाची फक्त गरज आहे. ज्याचे मन निर्मळ त्यालाच साई पावतो. साईचे नामस्मरण करणे,हीच त्यांची आरती. श्री साईनी भक्तांना मी तुमच्या पाठीशी आहे,हे अभिवचन दिले. भक्तांच्या संकटाला धावून जाणे,हे त्यांचे ब्रीद होते व आजही याची आपणास प्रचिती येत आहे.

एकदा बापूसाहेब जोग लोकमान्य टिळकांची गीतारहस्याची एक प्रत घेऊन बाबांकडे गेले आणि बाबांनी काय आहे म्हणून विचारता जोगांनी ती प्रत बाबांच्या चरणापाशी ठेवून दिली. बाबांनी काही काळ ते पुस्तक चाळले आणि एक रुपया त्या पुस्तकावर ठेवीत परत करीत म्हटले,याचे विचारपूर्वक अध्ययन करा, यानेच तुमचे कल्याण होईल.

श्री साईबाबांच्या वास्तव्याने छोट्याशा शिरडीला आज एक महान क्षेत्राचे श्रेष्ठत्व लाभले आहे. त्यांच्या मंगल नामस्मरणाने आणि पूजनाने नुसती शिरडीच नव्हे,तर सारा भारत देश पूनीत होत असल्याचे विराट दृश्य आज आपल्याला दिसत आहे. शिरडीला बाबांच्या दर्शनाला येणाऱ्या असंख्य भक्तांत एकप्रकारची अनाकलनीय अशी एकात्मता आढळते. प्रदेश, वेश, भाषा, धर्म यात वरवर दिसणारी विभिन्नता साईच्या चरणी विलीन पावते आणि आम्ही सारे भारतीय एक आहोत, आमचा आत्मा एक आहे, आमची ह्रदये एक आहेत,असा साक्षात्कार इथे घडल्यावाचून रहात नाही.

जगत जननी माय माऊली
साईबाबा माझी आई
अनायास या होई आई
कुशीत मज तू घेई साई

## माझ्या आठवणीतून-

# मी पाहिलेले साईबाबा...... २

डॉ. गजाननराव गो. दाभोलकर

निवेदन- डॉ. गजाननराव गो. दाभोलकर

शब्दांकन- स्नुषा सौ. मिनाक्षी अरविंद दाभोलकर

'साईकृपा', सेंट मार्टिन्स रोड, वांद्रा, मुंबई.

**(भगवान श्री साईनाथांचे एक लाडके भक्त व 'श्री साईसच्चरित' या जगप्रसिध्द श्री साईपोथीचे रचनाकार श्री गोविंदराव दाभोलकर उर्फ 'हेमाडपंत' यांचे चिरंजीव डॉ. गजाननराव उर्फ अण्णासाहेब यांनी आमच्या आयोजित लेखमालेत गुंफलेले हे दुसरे पुष्प.)**



डॉ. गजाननराव दाभोलकर **लेखक**

बुडती हे जन पहावे डोळा।
म्हणून कळवळा येतो त्यांचा॥

असे तुकाराम महाराज म्हणत असत. खऱ्या साधूचे अंतःकरण मानवी जीवनाच्या कल्याणासाठी तळमळत असते. सध्या आपल्या नामस्मरणाचे वेड लावणारे श्री साईबाबा हे सुध्दा असेच दुसऱ्यासाठी तळमळणारे जन्मसिध्द पुरुष होते. त्यांनी कधीच कोणाला उपदेशाचे डोस पाजले नाहीत. आपल्या नजरेनेच व प्रेमळ स्वभावाने त्यांनी भक्तांची मने जिंकली.

मी त्याकाळी १३/१४ वर्षांचा असेन. माझ्या वडिलांबरोबर मी प्रथम शिर्डी येथे गेलो, ते १९१६ साली. त्याकाळी शिर्डीचा प्रवास बराच त्रासाचा होता. कोपरगावाहून

बैलगाडीने आम्ही गेलो. मी लहान असल्याने इतका काही समज नव्हता. वडील जिकडे नेतील तिकडे जायचे इतकेच समजत होते. शिर्डी येथे पोहोचल्यावर वडिलांचे स्नेही माधवराव देशपांडे भेटले, त्यांनी आम्हाला मशिदीत नेले. त्या काळची मशीद म्हणजे नुसती तीन बाजूंनी भिंत व मध्ये उंचावर सपाट शेणाने सारवलेली जागा होती. मशिदीत उजव्या हाताला एका आसनावर सफेद कफनी घातलेले, डोकीस सफेद फडका गुंडाळलेले, गोरेपान, उंच, अजान बाहू असे आजोबा बसले होते. समोर बरीच मंडळी त्यांच्याशी गप्पागोष्टी करीत होती. मशिदीच्या पायऱ्या चढून आम्ही वर गेलो. वडिलांनी त्यांच्या चरणांवर डोके ठेवले. माधवराव देशपांडेंनीही तसाच नमस्कार केला. मी त्यांचे अनुकरण केले. नंतर माधवराव म्हणाले, बाबा हा हेमाडपंतांचा (अण्णासाहेबांचा) मुलगा आला आहे.



डॉ. गजाननराव दाभोळकर **आला**

मी हसत हसत पुन्हा नमस्कार केला. तेव्हा "ये बापू" असे बाबांनी बोलून मला मांडीवर बसविले. कोणाला तरी उदी आणण्यास सांगितले व माझ्या ओंजळीत घातली. मी उठूनक पुन्हा वडिलांकडे गेलो. बाबांनी परवानगी दिल्यावर खाली तिथेच बस्तान ठोकले. मी बाबांचे निरीक्षण करीत होतो. त्यांचे डोळे अतिशय तेजस्वी व पाणीदार होते. हसतमुख चेहऱ्याने ते सर्वांकडे पहात होते. प्रत्येकाचे नाव घेऊन जातीने चौकशी करीत होते. त्यांचा तो प्रेमळ स्वभाव पाहून माझे डोळे भरून आले. दुसऱ्याच्या सुखदुःखात ते सामील होत असत. कोणाला आजार झाला तर तो स्वतःवर घेऊन भक्तास निर्धास्त रहाण्यास सांगत. त्यांनी कधीच कुणाकडून काही घेतले नाही, उलट दुसऱ्यांना जे जो मागेल ते ते दिले. ते म्हणत, "काम, क्रोध, लोभ ही नरकाची द्वारे तीन॥" मी आहे एक फकीर, मला कशाला पाहिजे काही. ही द्वारकामाईच माझे

सर्वस्व आहे. तुम्हीच धनाचे वाटेकरी व्हा. परंतु लोभ धरु नका. जितके पचेल तितकेच खावे.

दुपारी १२ वाजता मेघा पूजेचे साहित्य घेऊन आला. बाबांची पूजा व आरती तोच करीत असे. मशिदीतच प्रथम एका कोपऱ्यात बाबांचे स्नान आटोपले. त्यांनी पिवळ्या रंगांची कफनी व डोकीस रुमाल बांधला. मेघाने त्यांना आसनावर बसविले व त्यांनी पूजा केली. मग आम्ही सर्वांनी त्यांची पाद्यपूजा केली. मेघाने आरतीची तयारी केली. आम्ही सर्व उभे राहून आरतीस सुरुवात केली. मेघा नेहमी एका पायावरच उभा राहून आरती करीत असे. त्या दिवशी मी ते प्रत्यक्ष पाहिले. मला मोठे आश्चर्य वाटले. त्याचे पाय किती दुखत असतील, असे मला वाटले. परंतु सर्वजण तल्लीन होऊन आरती करीत होते. नंतर सर्वांना प्रसाद देण्यात आला. मग बाबांच्या पाया पडून आम्ही वाड्यावर गेलो. तेथे बाबांबद्दलच चर्चा होत होती. जो तो आपल्याला आलेला अनुभव सांगत होता.

संध्याकाळी पुन्हा आम्ही सर्व मशिदीत जमलो. मेघा आरती घेऊन आला. आरती झाल्यावर आम्ही गप्पागोष्टी करुन आपापल्या घरी गेलो. आम्ही वाड्यावरच उतरलो होतो. बाबा मशिदीतच एक कपडा अंथरुन त्यावर झोपत. उशी वगैरे नसे. एकदा मशिदीत व एकदा चावडीत झोपण्याचा त्यांचा नियम होता. आरतीसुध्दा एकदा चावडीत व एकदा मशिदीत होत असे.

मी बाबांना दोन तीनदा पाहिले आहे. त्यावेळी मला त्यांच्या दर्शनाचे महत्व उमगले नाही. परंतु आता ते प्रत्ययास आले आहे. ज्याच्या त्याच्या तोंडी माझे नाव आहे. चरित्रकारांचा मुलगा आणि बाबांचा स्पर्श झालेला म्हणून प्रत्येक भक्त मोठ्या प्रेमाने मला येऊन भेटतात. ही सर्व बाबांचीच कृपा आहे. आज मी ८४ वर्षांचा आहे. पण सर्व साईमंदिरांचे नागपूर, मद्रास, कलकत्ता, बंगलोर, इंदूर, बलसाड, इत्यादि ठिकाणी दर्शन घेऊन आलो आहे. माझी स्वतःची कामे मी स्वतः करु शकतो. पोथीत नमूद केलेली तसबीर आमच्या निवासस्थानी आहे. त्यातच मी बाबांना पाहातो. दररोज आम्ही सकाळी पूजा व संध्याकाळी आरती करतो. त्यावेळच्या बाबांच्या आठवणीने माझे मन भरुन येते.

माझे वडील १९१० साली प्रथम शिर्डीस गेले. त्यांचा पूर्व इतिहास बाबांनी सर्वांसमक्ष सांगितला. तो ऐकून बाबा किती अंतर्ज्ञानी आहेत? म्हणून त्याना माझ्या वडिलांनी गुरु मानले. बाबांनी त्यांच्याच हस्ते आपले चरित्र घडवून आणले. आणि "हेमाडपंत " हा किताब त्यांना बहाल केला. माझे वडील म्हणत-

फळली जयांची पुण्ये अगाधे।<br>त्यांसीच साईदर्शन लाधे।।

आमची पूर्वपुण्याई म्हणूनच साईबाबांसारखे सिध्दपुरुष आमच्या जीवनात आले. त्यामुळे आम्ही कृतार्थ झालो!

इ. स. १९१६ नंतर माझे वडील ति. गोविंद रघुनाथ दाभोलकर आध्यात्मिकतेच्या दिशेस वळले. त्यांचे वाचन अफाट होते. रामायण, महाभारत, एकनाथी भागवत,

ज्ञानेश्वरी, गुरुचरित्र वगैरे. ही सर्व पुस्तके त्यांची पाठ होती. त्यांच्या मागे काही पुस्तके आम्ही त्यांच्या नावे नॅशनल लायब्ररीला दान केली.

माझ्या वडिलांनी जे हे लेखन केले, ते अद्वितीय आहे, यात शंकाच नाही. ज्ञानेश्वरांना जशी प्रेरणा झाली,तशीच माझ्या वडिलांनीही बाबांच्या प्रेरणेने हे लिखाण केले. वाईट इतकेच झाले, ही पोथी ते पूर्ण करु शकले नाहीत. शेवटची अवतर्णिका मी व ठाण्याच्या देवांनी पूर्ण केली. ती सुध्दा माझ्या वडिलांनी लिहून ठेवलेल्या चिटोऱ्यांच्या सहाय्यानेच पूर्ण केली. माझ्या वडिलांना देवाज्ञा झाली. त्यानंतर मी शिर्डी संस्थानची सेक्रेटरी म्हणून २० वर्षे सेवा केली. मला अर्धांगवायू झाला आणि शिर्डी माझी बंद पडली. परंतु बाबांच्या कृपेने मी एका वर्षात बरा झालो. पुढे १९७८ पासून पुन्हा विनायक देसाईंच्या कृपेने मी शिर्डी येथे एस. टी. ने वर्षातून चार वेळा तरी जात होतो.

पोथीत वडिलांनी नमूद केले आहे की, ही पोथी जो कोणी वाचेल, वा ऐकेल त्यांची संकट मुक्तता होईल. आणि खरोखरच आज या अनुभवामुळेच बाबांचा भक्तगण दिवसेंदिवस वाढत चालला आहे. वडिलांनी त्यावेळी बाबांना सांगितले होते, "मला तुमचे चरित्र लेखन पुढच्या पिढीसाठी करावयाचे आहे. त्यांना त्याचा फायदा होईल." तेव्हा बाबा म्हणाले, "तुझी इच्छा! मी तुझ्या पाठीशी आहे. तू मुळीच घाबरु नकोस. शिर्डीत आज माणसे नाहीत, उद्या ती मुंग्यांसारखी येतील." हे बोल आज खरे ठरले आहेत.

बाबा हिंदू की मुसलमान हा त्यावेळचा वाद अजूनही सर्वांच्या मनात आहे. परंतु बाबा माणूस होते व माणुसकीची शिकवण बाबांनी सर्वांना दिली. बाबांच्या भक्तगणांत सर्व जाती धर्मांचा समावेश आहे. यावरुनच हे लक्षात येते. झाड कोणी व केव्हा लावले त्याचा शोध घेण्यापेक्षा त्याची गोड, मधुर फळे चाखण्यातच मजा असते. बाबांनी हा मानवतेचा वृक्ष त्यावेळी लावला आहे आणि आपण सर्वांनी त्याची फळे एकत्र येऊन चाखावयाची आहेत. माझा तुम्हा सर्वांना आशीर्वाद आहे की, ती अशीच पुढे चालू ठेवावीत. त्यातच आपल्या देशाचे हित आहे.

साई नाही तुमचा वा आमुचा।
तो तो सर्व भूतस्थ साचा।
सूर्य जैसा सकल जगाचा।
हा सकळांचा तैसाच।

हा मंत्र सर्वांनी ध्यानात ठेवावा. बाबांनी पुन्हा या भारतभूमीवर प्रगट व्हावे,असे मला मनापासून वाटते.

# श्री साईबाबांची शिकवण

- श्रीमती ज्योती उमडेकर
द्वारा:- श्री. मिलिंद प्रभाकर उमडेकर
असिस्टंट स्टेशन मास्टर,
शांतासदन, १८ नवी पेठ, उज्जैन.

आजचे युग भौतिकवादाचे आहे. विज्ञान सर्व क्षेत्रात उत्तरोत्तर प्रगति करीत आहे. मनुष्य सुखोपभोगाच्या मागे लागला आहे. प्रत्येकजण ऐश्वर्यवान बनू इच्छित आहे. आपले ऐश्वर्य दुसऱ्याला दिसावे म्हणून अशा ऐश्वर्याच्या खुणा ज्याला इंग्रजीत 'स्टेटस् सिंबॉल' म्हटले जाते, त्या अनेक भल्या बुऱ्या मार्गाने प्राप्त करण्यासाठी जिवाचा आटापिटा करीत आहे. अशामध्ये सुख मनुष्यापासून दूर दूर पळत आहे आणि जमवलेल्या ऐश्वर्याचा उपभोग घ्यायलाही वेळ नाही. कारण अधिकाधिक ऐश्वर्य प्राप्त करण्याची तृष्णा त्याला काही एक मर्यादेपर्यंत आल्यावर सुध्दा स्वस्थ बसू देत नाही.

मूळात आपली सुख आणि ऐश्वर्याची व्याख्याच चुकीची आहे. नुकतीच इंदूरला श्री गुरुपौर्णिमा उत्सवात इंदूरचे ज्ञानेश्वरीचे प्रकांड विद्वान प्रो. प्र. गो. घाटे यांनी आपल्या एका प्रवचनात ऐश्वर्य शब्दाची व्याख्या अशी केली की, 'ऐश्वर्य म्हणजे धन व इतर मूल्यवान वस्तू जवळ असणे नव्हे तर ईश्वरीय गुण स्वतःच्या अंगी बाणविणे हेच खरे ऐश्वर्य आहे'. ही व्याख्या मनाला फार पटली. तसेच सुख काय आहे हे आम्हाला माहीत नसल्यामुळे आम्ही निरनिराळ्या वस्तूंच्या उपभोगालाच सुख मानायला लागतो. परंतु अशा उपभोगाचा काही काळाने आम्हाला वीट येतो. उदाहरणार्थ, मिठाई आम्हाला खावीशी वाटते. परंतु तीच जर रोज आम्ही खाऊ लागलो तर काही काळाने ती डोळ्यांसमोरही नकोशी वाटेल. हीच गोष्ट साऱ्या वस्तूंची आहे. मग ज्याचा कधी वीट येणार नाही, असे शाश्वत सुख कशात आहे? तर परमेश्वराच्या अनुसंधानात आहे.

श्री साईबाबांचे परमभक्त श्री दासगणू महाराज यांनी ईशावास्योपनिषदावर मराठीत टीकाग्रंथ लिहिला. परंतु पहिल्याच मंत्राचा अर्थ त्यांना समजत नव्हता.

ईशावास्यमिदं सर्वं। तेन त्यक्तेन भुंजीथाः।।

हा तो मंत्र. अर्थ समजवून घेण्याकरता श्री दासगणू श्री साईबाबांजवळ गेले. बाबा म्हणाले, 'अर्थ काही कठीण नाही. उद्या तू परत जाताना विलेपार्ल्याला काका दीक्षितांकडे जा. त्यांची मोलकरीण तुझ्या शंकेचे निराकरण करील.' बाबांच्या आज्ञेप्रमाणे दासगणू पार्ल्याला दीक्षितांकडे गेले. दुसऱ्या दिवशी सकाळी जाग आल्यावर अंथरुणावर पडल्या पडल्याच त्यांना गाण्याचा बारीक पण मधुर स्वर ऐकू आला. ते उठून बाहेर आले तर भांडी घासणारी मोलकरीण लहान मुलगी गाणे गात होती. गाण्यात नारिंगी रंगाच्या जरीच्या साडीचे वर्णन होते. साडीचा जरीचा पदर,

जरीचे काठ, सुंदर रंग ह्यांचे वर्णन ती मुलगी अत्यंत तल्लीनतेने, आनंदाने गात होती. तिच्या अंगावर जी फाटकी साडी होती, ती अंग झाकायलाही पुरेशी नव्हती. श्रीदासगणूंनी नवी साडी आणून तिला दिली, दुपारी ती मुलगी ती साडी नेसून आली व काम करुन गेली. दुसऱ्या दिवशी सकाळी पुन्हा जुनी फाटकी साडी नेसून तितक्याच आनंदाने काम करत होती, जसे नवी साडी नेसून आदल्या दिवशी करीत होती.

ह्या घटनेने श्री दासगणू महाराजांना मंत्राचा अर्थ ताबडतोब समजला 'ईशावास्यमिदं सर्वं, तेनं त्यक्तेन भुंजीथा:। हे सर्व (जग) ईश्वरमय आहे. त्यागाच्या द्वारे त्याचा उपभोग घ्या.' त्यागाच्या द्वारे उपभोग कसा संभव आहे, हे समजवण्याकरता प्रत्यक्ष प्रमाणाची आवश्यकता होती. मोलकरणीचे दारिद्र्य तिच्या फाटक्या साडीवरुन प्रकट होते. परंतु ती आपले दैन्य संपन्नपणे मिरवीत होती. नव्या साडीचा त्याग करुनही तिच्या उपभोगाचा आनंद ती मिळवीत होती व तेच गाणे तल्लीनतेने गात होती. आणि अशा तऱ्हेने त्यागातले सुख प्रत्यक्ष अनुभवीत होती.

ह्याच संदर्भात श्री नाथ पादुकांवर अर्पण केलेले एक पद्य उध्दरण येथे दिले तर अनुचित होणार नाही, असा विश्वास आहे. ते पद्य असे:-

नाथाघरची खूण उलटी । समजायासी कठीण मोठी
बहिरा ऐके बहुविध साज । आंधळा पाहे अंतर सहज
भिकारी तो वैभव भोगी । वैभवशाली दिसे भिकारी
मरती तेची अमर होती । अमृताचा नशा करिती
प्रेमबंधी होय मुक्ति । अंधकारी उजळे ज्योती

वरील पद्यातील 'भिकारी तो वैभव भोगी' ह्या ओळीप्रमाणे दीक्षितांकडच मोलकरीण दारिद्र्यातले वैभव भोगीत होती.

श्री दासगणूंना मंत्राचा अर्थ समजला तसा तुमच्या माझ्यासारख्या अज्ञ जनांना समजावा अशा सोप्या तऱ्हेने कठिणातली कठीण गोष्ट समजावून देण्याची श्री साईबाबांची हातोटी विलक्षण होती. त्यांचे चरणी शतशः प्रणाम।

# श्री साईनाथांची शिकवण
# श्री बाबांची आठवण

- श्री. शरदचंद शेरे
साईस्मृती - १७७९
रत्नागिरी - ४१५ ६१२

भारत हा देश, देव देवतांचा आणि प्रेषितांचा देश आहे. अनादि कालापासून ह्या देशात साक्षात्कारी, सत्पुरुष निर्माण होत आले आहेत. जीवात्मा आणि परमात्मा

यांच्यातील विस्मृत पुन्हा पुन्हा जोडत जाणे हे या सत्पुरुषांचे कार्य.

आजचा काळ "विज्ञान युग" या नावाने ओळखला जातो. परमाणूंच्या ठायी असलेले अगाध सामर्थ्य माणसाने शोधून काढले आहे. अवकाशातून प्रवास करणे त्याला नवे राहिलेले नाही. अवकाशाच्या पोकळीत तरती ठाणी बांधण्याचा तो विचार करत आहे. चंद्रादी उपग्रहांवर जावून वस्ती करण्याच्या वल्गनाही तो करत आहे.

इतके सारे असूनही माणूस आज अ–सुखी आहे, असमाधानी आहे. भौतिक समृध्दी पराकोटीला पोहोचली आहे. परंतु तरीही मानव जात असंतुष्ट आहे. शरीर सुखावल्याने आत्मा सुखावत नाही. आकाश पाताळ एक केले तरीही विश्वाचे कोडे पुरेपूर उलगडत नाही. बुध्दीचे पंख थिटे पडतात. मती गुंग होते. श्रध्देला शरण जावे लागते. बुध्दीला कधीही न गवसणारे समाधान श्रध्देच्या झेपेत सहज सामावते.

भारतातला बहुसंख्य समाज श्रध्दावंत आहे. या देशात ईश्वराची तर पूजा होतेच पण त्यांच्या प्रतिमा आणि प्रतिके ही भक्तीभावांनी पुजली जातात. साक्षात्कारी सत्पुरुष या ईश्वराच्या जिवंत प्रतिमा अशा महात्म्यांच्या केवळ दर्शनानेही अवर्णनीय शांतीचा लाभ होतो. ही अनुभूति प्रत्यक्ष प्रचिती विना येणार कशी?

महाराष्ट्राच्या गोदावरीच्या परिसरात "शिरडी" नावाचे खेडे आहे. या खेड्यात एक असेच सत्पुरुष होवून गेले. ते जन्मले कुठे, वाढले कुठे,त्यांचा धर्म कोणता, जात कोणती, पंथ कोणता, हे कुणालाच निश्चित ठाऊक नाही. त्यांनी स्वतः लिहिलेले एकही हस्तलिखित उपलब्ध नाही. महात्मा कबिरासारखी त्यांची वाणी मात्र दासगणूसारख्या प्रासादिक कवीने छंदबद्ध करुन ठेवली आहे. भक्तजन त्यांना प्रत्यक्ष परमेश्वर मानतात. त्यांच्या भक्तजनात सर्व धर्माचे लोक एकत्र आले आहेत. या अशांत अशा पृथ्वीतलावर त्यांनी सर्व जगाला शांतीचा ऐक्याचा संदेश दिला आहे.

"सबका मालिक एक" हा दिव्य संदेश सांगून सर्व प्राणीमात्रांवर प्रेम करण्यास शिकविणाऱ्या या शिरडीच्या फकिरास सर्व भक्तजन साईबाबा या नावाने संबोधतात.

आजच्या या यांत्रिकी युगातही बाबांच्या नुसत्या नामस्मरणाने असाध्य रोग बरे होणे. असाध्य गोष्ट साध्य होणे. बुध्दीमत्तेच्या पलीकडे जिथे दृष्टी स्थिरत नाही. अशा वेळी मनातील सत्य संकल्प प्रत्यक्ष कृतीत येऊन साकार करण्याचे बाबांचे हे दिव्य साक्षात्कार आजच्या "विज्ञान युगातील" भल्या भल्या शास्त्रज्ञांना नतमस्तक करण्यास लावीत आहे.

आजच्या या अशांत युगात मानव जात विनाशाकडे वाटचाल करीत आहे. धर्मपंथावरुन जातीय दंगे घडवून आपल्या विनाशी मानव संस्कृतीचे दर्शन घडवित आहे. अण्वस्त्रंची निर्मिती करुन त्याने आपली अध्यात्मिक प्रगती खुंटली आहे. आज संपूर्ण पृथ्वी ज्वालामुखीच्या तोंडावर येऊन स्थिर झाली आहे. अशा वेळी कोणता महामंत्र तारील? तर तो फक्त "श्रध्दा आणि सबुरी".

श्री दासगणूनी म्हटल्याप्रमाणे "शिरडी माझे पंढरपूर - साईबाबा रमावर"। आज शिरडी पंढरपूरपेक्षाही दुमदुमून निघाली आहे. आज बाबांनी दिलेल्या दिव्य मंत्राचे पालन करणे अत्यंत जरुरीचे आहे. कारण बाबांनीच सांगून ठेवले आहे. जो, जो,

आला शरण माझिया पदा । वाहीन सर्वथा भार मीहि त्याचा ॥ जो जो भजे जैसा जैसा भावे तयांचे मागे पुढे मीहि आहे ॥

श्री साईनाथांच्या असंख्य, अर्तक्य, साईलीला भक्तजनांना दृष्टांत देत आहेत आणि देत राहातील. त्यासाठी पाहिजे फक्त श्रध्दा - सबुरी.

२१ व्या शतकाकडे भरारी घेण्याच्या वल्गना करणाऱ्या मानवा, आपल्या संस्कृतीचा वसा घेवून आणि साईचा दिव्य संदेश लक्षात ठेवूनच तू जपून टाक पाऊल जरा। आज प्रत्येक साईभक्तांनी साईनाथाची आठवण आणि बाबांची शिकवण यांचा प्रसार घरोघरी करण्याचा संकल्प या शुभदिनी करुया.

"श्री साईनाथ दिगंबर अल्लख हो"

# साईबाबा - एक जागृत दैवत

**- श्री. दि. रे. बाबरेकर**
बी.ए., एल.एल.बी. (हिन्दी साहित्य रत्न)
बी-३३४/३, सरकारी कर्मचारी वसाहत,
बांद्रा (पूर्व), मुंबई-४०० ०५१.

जगाच्या पाठीवर भारत देश म्हणजे संतांचे उगमस्थान. साईबाबा संतांच्या रुपात भगवंतच आहेत. त्यांनी श्री विठ्ठल शंकर, राम व अनेक संतांचे दर्शन आपल्या शिष्यांना व भक्तांना घडवून दिले। येशू खिस्तानंतर अनेक चमत्कार दर्शविणारी विभूती म्हणजे श्री साईबाबा। पणत्यांत पाणी घालून त्या साऱ्याच्या साऱ्या सतत पेटत्या ठेवल्या. त्यांनी अनेक वेळा परकाया प्रवेश केला. ते पूर्णत्वाला पोहचलेले योगीराज होते. त्यांनी आपल्या शरीराचे अनेक अवयव वेगवेगळे केले होते. एकदा तर आपल्या पोटातील लांब आतडी काढून ती जांभळीच्या झाडावर सुकत घातली होती. प्रचंड योगसिध्दीमुळे स्वतःचा प्राण तीन दिवस ब्रह्मांडी चढविला होता. जगाचे कल्याण व मानव समाज सुखी करण्यासाठी श्री साईबाबा वयाचे सोळाव्या-सतराव्या वर्षी शिर्डीमध्ये अवतरले. त्यांचे वास्तव्य निंब वृक्षाच्या झाडाखाली येते. ते दत्तात्रेय अवतारी होते! त्यामुळे दोघांमध्ये चमत्कारांच्या दृष्टीने पुष्कळशी समानता आहे त्यांनी कधीही व कुठेही तपस्या अगर साधना केलेली नाही. ते शिर्डीत आले, त्या वेळेसच पूर्णत्वाने आले! पुराण ग्रंथांसंबंधी, वेद आणि उपनिषिदासंबंधी तसेच कुराणासंबंधी त्यांनी प्रकट केलेले अगाध ज्ञान सर्व जगाला थक्क करणारे आहे कारण ते अंतर्ज्ञानी, स्वयंभू सिद्धपुरुष, योगीराज होते!

श्री साईबाबांचा जन्म, बालपण, चमत्कार व शिष्यसंप्रदायाविषयी त्यांच्या भक्तांना व वाचकांना त्यांच्यासंबंधी उपलब्ध असलेल्या अनेक पुस्तकांतून प्राप्त होत आहे आजही दररोज त्यांच्या चमत्कारांचे अनुभव अनेकांना येत आहेत, कारण ते एक जागृत दैवत आहे। श्रीसाईबाबा यांनी केलेल्या उपदेशांचे वर्गीकरण खालीलप्रमाणे

दोन भागात करता येवू शकते:-

१)सर्वांना सहज आकलन होऊन त्वरित अंमलात आणण्यास योग्य:-

अ)धर्मातील वाद विवाद टाळून सर्व धर्मांनी एकमेकांशी एकमताने वागावे. एकमेकांस सहाय्य करावे. एकमेकास समजून घ्यावे. स्वधर्माबद्दल गर्व करु नये. दुसऱ्या धर्माची निंदा करु नये।

ब)गरीबांवर व प्राणीमात्रांवर दया करा. भुकेल्यांना अन्न द्या. गरजूंना वस्त्रे द्या. निवाऱ्याची सोय नसलेल्यांना स्वतःच्या घरात किंवा झोपडीत निवाऱ्याची सोय करुन द्या. कशावरही आपला अधिकार न दाखविता स्वतःला परमेश्वराचे सेवक समजा।

क)स्वतःचा देह स्वकल्याणासाठी न कष्टवता तो जगाच्या कल्याणासाठी कष्टवा. अशा वर्तनाने मनुष्य जन्माचे सार्थक होईल आणि परमेश्वर प्रसन्न होईल।

ड) आपला सुखाचा संसार सांभाळून आपल्याला आवड असलेल्या कोणत्याही देवतेची उपासना, भक्ती वा नामस्मरण करावे!

इ)'श्रध्दा आणि सबूरी' असली तर संसारातल्या वादळांशी सामना करणे खरोखरीच कठीण नाही।

ई)सर्व कल्पना, विचार, संकल्प, आशा यांचा त्याग करुन निर्लेपवृत्तीने आत्मरत रहाणे, हेच सुख शांतीमार्गाचे द्वार आहे।

**आध्यात्मिक उपदेश:-**

२)अ)देहापेक्षा इंद्रिये सूक्ष्म असतात. त्याहून मन जास्त सूक्ष्म असते। मनापेक्षा बुध्दि अतिसूक्ष्म असते व बुध्दिपेक्षा परमात्मा सर्वात सूक्ष्म असतो।

ब)ज्ञान हे तर स्वयंप्रकाशित असते. त्याचा उपदेश करावा लागत नाही. अज्ञानाचा नाश होताच, ज्ञान आपोआप उत्स्फूर्तपणे प्रगटेल।

क)बाह्य जगातले सुख कितीही प्राप्त करुन घेतले तरी त्याने जीवाला पूर्ण समाधान प्राप्त होत नाही.


ड)चिंतन करणे हा चित्ताचा धर्म असल्यामुळे ज्यांनी आपले चित्त अध्यात्मसाधनेच्या द्वारे शुध्द व पवित्र केले आहे. त्यांनाच त्यापासून निर्माण होणारा आत्मानंद उपभोगता येतो। शुभ कर्मांनी आपले चित्त शुध्द करुन घ्यावे. यातच धर्माचरणाचे सार सामावलेले आहे। मन हे इच्छाशक्तिचे गाठोडे आहे।

ई) जे सज्जन धर्मनिष्ठा अंगी बाणवतात तेच अध्यात्म विद्येचे अधिकारी असतात.

प) भक्तिरसाची गोडी असलेला भक्त जेथे जाईल, तेथील वातावरण सुमंगल होते. त्याच्या सहज बोलण्यातून, दृष्टितून व निराग हास्यातून अमृताचे निष्पंद बाहेर पडतात। त्यांचे आचरण लोकांना मार्गदर्शक व स्फूर्तिप्रद ठरते। 'साई' हे एक जागृत देवस्थान आहे। तुम्ही कोणीही कशीही भक्ती करा ती साईबाबांना मान्य असते. त्यांच्या पूजेत सोवळेओवळे नाही. जातीभेद नाही. धर्मभेद तर मुळीच नाही. भक्तांच्या भोळ्या भाबड्या भक्तिसाठी बाबा केव्हाही धाव घेतात. मनोरथ पूर्ण होतील हाच त्यांचा सर्वांना आशीर्वाद आहे। याकरिता काम, क्रोध, मद, मत्सराची आशा सोडून श्री साईनाथांना अनन्य रितीने शरण जा आणि आपले जीवन सार्थक करा।

# मुंबापुरीतील श्रीसाईबाबांचे सर्वात मोठे अती भव्य मंदिर, मंगल साईधाम – मालाड

– साईनंद





मुंबा नगरीमध्ये भगवान श्री साईनाथांची लहान मोठी अशी मंदिरे सर्वत्र आहेत. आणखीन काही मंदिरांची रचना चालू आहे व नवीन नवीन वास्तू तयार होण्याच्या मार्गावर आहेत. या नगरीत पूर्वी गिरगावातील काँग्रेस हाऊस जवळचे श्री साईधाम हे मंदिर मोठे म्हणून ओळखले जात होते पण आता मुंबईपासून सुमारे ३४ कि.मी. अंतरावर मालाड या पश्चिम रेल्वेच्या स्थानकाच्या पूर्वेस, पश्चिम द्रूतगती मार्गावरील क्वारी रोडवर रिझर्व्ह बँक स्टाफ कॉलनीच्या शेजारीच एक पांढरी शुभ्र संगमरवरी बांधणीची भव्य वास्तू दृष्टीस पडते. ही वास्तू 'मंगल साईधाम' म्हणून ओळखली जात असून या शहरातील एक अती भव्य व विशाल साईबाबांचे मंदिर म्हणून प्रसिध्दीस येत आहे. 'सद्‌गुरु दासकिसन साईबाबा मंडळ' या संस्थेतून ही वास्तू आज उभी आहे.

महाराष्ट्रात जसे अनेक संत होऊन गेले तसे श्री दासकिसनबाबा नावाचे एक सत्पुरुष पुण्या-मुंबईत होऊन गेले. त्यांचा जन्म पुण्यात श्रावण वद्य अष्टमी शके

१८२९ रोजी रात्री १२ वाजता झाला. त्यांच्या वडिलांचे नाव लक्ष्मणराव नाईक व आईचे जमनाबाई. या बाबांचे बालपण अतिशय कष्टात नि हालअपेष्टात गेले. वडील लहानपणीच वारले व त्याबरोबर त्यांच्या कुटुंबावर संकटांची मालिकाच सुरु झाली. शेवटी आईने दारिद्र्याला कंटाळून छोट्या बाबाला कचऱ्याच्या पेटीत टाकून दिले. पण त्याच मोहल्ल्यातील चांदणी नामक मुसलमान स्त्रीने ते मूल पुन्हा जमुनाबाईला आणून दिले.

वयात पुढे आल्यावर दासकिसन बाबा अत्यंत हालअपेष्टात जीवन कंठीत असताना मजल दरमजल करीत औरंगाबादला आले. तिथे फकीराचा दर्गा होता. याच ठिकाणी फकीराच्या वेषात साईबाबांनी दासकिसनना दर्शन दिले. त्यावेळी त्यांच्या अंगावर एक चिंधीही नव्हती. साईबाबांनी त्यांना कफनी दिली व म्हणाले, "खुदा सब आनंद बनायेगा बच्चा, दो आने का धंदा करो, पेट भरो और सेवा में रहना" या जबाबावर दासकिसनजी ईश्वर सेवा करीत होते. रेल्वेत सुताराच्या हाताखाली व पुढे वर्कशॉपमध्ये दुरुस्ती करण्याचे त्यांनी काम केले पण साईसेवा सोडली नाही.

दासकिसन बाबांचा विवाह त्यांच्या वयाच्या २२ व्या वर्षी झाला. त्यांच्या पत्नीचे नाव राधाबाई. त्या पण ईश्वरभक्त होत्या पण विवाहानंतर काही महिन्यांतच त्यांचे देहावसान झाले. आत्महत्येचे विचार त्यांच्या मनात घोळू लागले व त्यांनी लकडी पुलावरुन मुळा-मुठा नदीत उडी घेण्याच्या प्रयत्नात असताना आलीशाबाबांनी त्यांना रोखले व आत्महत्येच्या विचारापासून परावृत्त केले.

पुढे दासकिसन बाबांच्या गुरु भगिनी लक्ष्मीबाई यांनी सद्‌गुरु कृष्णनाथ उर्फ कुशाभाऊ मिरजकर यांची व बाबांची भेट करुन दिली. एकाच भेटीत ते परस्पर एकमेकांकडे आकर्षिले गेले. विख्यात साईभक्त प्रो. नारके यांचेकडे कुशाभाऊंनी त्यांना गुरुमंत्र दिला. लगेच गुरु दत्तात्रेय महाराजांनीही त्यांना दर्शन दिले. पुढे एके दिवशी कुशाभाऊंनी त्यांना साईबाबांच्या प्रतिमेपुढे बसवून साक्षात् साईबाबांचे दर्शन त्यांना घडविले. १९-२-१९४४ रोजी कुशाभाऊंची ज्योत अनंतात विलीन झाली.

आपले गुरु कुशाभाऊंच्या निधनानंतर दासकिसन बाबांनी काही काळ पुण्यात वास्तव्य केले व नंतर ते मुंबईला आले. मुंबानगरीत प्रभादेवी व माझगाव येथे मंगळवारी व गुरुवारी त्यांनी आरती सुरु केली. तिथे त्यांच्या दर्शनास बरीच भक्त मंडळी येऊ लागली. बाबांची पुढे गाठ गुरु भगिनी मंजुळाबाई यांचेशी पडली. त्यांच्या विनंतीवरुन बाबा गिरगावात स्थायिक झाले. तिथेही आरती सुरु झाली. तिथेच त्यांनी ज्ञानसेवेचा अखंड झरा वाहात ठेवला. मंजुळाबाईनी आपल्या निधनापूर्वी आपल्या दोन्ही कन्यका ताईजी उर्फ दमयंती व पुष्पाली यांचा सांभाळ करा असे वचन त्यांचेकडून घेतले. त्याला जागून त्यांनी १२ वर्षे गिरगावात वास्तव्य केले.

दासकिसन बाबांनी आपल्या प्राप्त सिद्धींनी अनेक भक्तांना संकट मुक्त व व्याधीमुक्त केले. त्यांनी अनेक चमत्कारही केले.

गिरगावातील आपल्या जागेत त्यांनी गुरुपौर्णिमा, दसरा, रामनवमी, दत्तजयंती, जन्माष्टमी इ. उत्सव सुरु केले. भक्तमंडळी प्रचंड संख्येने तिथे येऊ लागली. त्यांचे शिक्षण बेताचेच झाले होते तरी त्यांनी 'साई स्तवन मंजिरी' लिहिली व छापली त्यातून त्यांची प्रगाढ साईभक्ती दिसून येते. ता. १४-१२-१९६१ रोजी दासकिसन बाबांचे पुण्याला देहावसान झाले. त्यांच्या असंख्य भक्तांना दु:ख झाले.

त्यांच्या देहावसानानंतर भक्तगणांपैकी एक सिंधी भक्त कै. गोविंदजी कृपलानी यांनी दमयंती उर्फ ताईजी यांचे हाती आरतीचे तबक देऊन पुन्हा आरती सुरु केली व दर गुरुवारी भजन व आरती असा कार्यक्रम गिरगावात पुन्हा सुरु झाला व 'दासकिसन साईबाबा मंडळ ' नावाची संस्था सुरु झाली.

दासकिसन बाबांच्या निर्वाणानंतर दमयंती उर्फ ताईजी या सद्‌गुरु दासकिसन साईबाबा मंडळाची धुरा वाहात आहेत व साईभक्तीची पालखी आपल्या खांद्यावर घेऊन साई पताका फडकावण्याचे कार्य करीत आहेत. असंख्य साईभक्तांना त्या मार्गदर्शन करीत आहेत.

दासकिसनांच्या निर्वाणानंतर ताईजींनी फार मोठा भक्तवर्ग निर्माण केला. त्यामध्ये सर्व धर्माचे व जातीचे लोक आहेत. त्यांचेशी त्या प्रेमाने, आपुलकीने वागून साईभक्तीचा वटवृक्ष पसरविण्याचा यत्न करताहेत.

सद्‌गुरु दासकिसन बाबा हयात असताना त्यांनी ताईजींच्या समोर दोन बड्या व्यक्तींचे पुढे असे सांगितले होते की, "मला कोणी उठ म्हणणार नाही अशी वीतभर जागा द्या". त्यांची इच्छा त्यांच्या हयातीत पूर्ण होऊ शकली नाही. ती आता मात्र ताईजींनी पूर्ण केली आहे. सद्‌गुरु दासकिसन बाबा भक्तमंडळीने मालाड येथे प्रचंड साईमंदिर उभारलेले आज दिसत आहे.

मंडळाने मालाड येथे १००० चौरस वार जागा खरेदी करुन त्यापैकी ७५०० चौरस फूट जागेवर संगमरवरी भव्य मंदिर उभारले आहे. १० मे १९८३ रोजी गुढी पाडव्याच्या सुमुहूर्तावर पाया खोदून बांधकाम सुरु झाले व १० मे १९८६ रोजी ते पूर्ण झाले. १५ मे १९८६ रोजी मंदिराचे उद्‌घाटन बांद्र्याचे वयोवृध्द साईभक्त व हेमाडपंतांचे चिरंजीव डॉ. गजाननराव उर्फ अण्णासाहेब दाभोलकर यांचे शुभ हस्ते करण्यात आले.

१)पनवेलचे प. पू. सद्‌गुरु नारायणबाबा यांनीही या मंदिराला भेट दिली व मंदिर पाहून समाधाना व्यक्त केले. स्वामी रामबाबांनी आपला संदेश याप्रसंगी पाठविला होता. २)तसेच १ नोव्हेंबर १९८७ रोजी ते स्वत: श्री. अशोक रहेजाबरोबर श्री राम बाबा हे स्वतः या मंदिरात आले होते. मंदिर बघून खूष झाले.

या भव्य वास्तूतील सभा मंडप ६० फूट लांब व ३० फूट रुंद आहे. श्री साईबाबांचा छानदार पुतळा जमपुरहून येथे तयार करवून आणून तो २॥ फूट उंचीच्या चौथऱ्यावर उभारला गेला आहे. त्याची उंची ५ फूट ३ इंच व रुंदी २ फूट ६ इंच आहे. मंदिरात श्री साईंच्या पुतळ्या सभोवती गणपती, लक्ष्मीनारायण, शंकर, संतोषीमाता,

राम, लक्ष्मण, सीता, मारुती, दत्तात्रय, राधाकृष्ण, गुरुनानक, झुलेलाल, विट्ठल-रखुमाई यांच्या सुंदर संगमरवरी मूर्ती पण शोभा देत आहेत. दर दिवशी या सर्वांची पूजा होते. साईबाबांची सकाळी ६, दुपारी १२ वा. व सायं. ७ वा. अशी तीनदा आरती होते. गुरुपौर्णिमा, रामनवमी, विजयादशमी, जन्माष्टमी, दासकिसन बाबा पुण्यातिथी असे पाच उत्सव वर्षाकाठी तिथे साजरे होतात. या मूर्ती व साई पुतळ्याच्या चौथऱ्यालगतच एका बाजूस दासकिसन बाबांच्या मानसकन्या पुष्पाजी व एका बाजूस दासकिसन बाबा यांच्या समाधी आहेत. मंदिरात चारी बाजूस भिंतीवर श्री साईसच्चरित्रातले विविध प्रसंग चितारण्यात आले आहेत. तसेच बाबांची वचने पण आहेत.

नुसते साईमंदिर बांधून साईसेवा करण्यातच हे मंडळ थांबलेले नाही. तर साईबाबांची नीती तत्त्वेही आचरणात आणण्याचा यत्न त्यांनी चालविलेला आहे. साई नीती तत्वांचा प्रचार प्रसार भजन-प्रवचनाच्या कार्यक्रमातून येथे हर हमेशा केला जातो. तसेच गरीबांना भोजन पुरविले जाते. गरीब मुलांची सेवासुश्रुषा करण्यासाठी एक दवाखानाही उघडण्यात आला असून मुलांबरोबर मोठ्यांचीही विनामूल्य तपासणी तज्ज्ञ डॉक्टरांकडून करवून औषधोपचार, मोफत इलाज केले जातात काही शैक्षणिक मदतही गरजूंना दिली जाते. अनाथ आश्रमातील जनांना कापड पुरविले जाते व रुग्णालयातील रोग्यांना वेळोवेळी खाद्यपदार्थ पण पुरविले जातात. सकाळी ६ वा. हे मंदिर उघडले जाते व रात्री १० वा. बंद केले जाते. १६ लाख रु. खर्च या मंदिरास आला आहे. आज मुंबापुरीतील सर्वात मोठे व अती भव्य असे हे श्री साईबाबांचे मंदिर म्हणून ओळखले जात आहे. श्री साई भक्तांनी या मंदिराला अवश्य भेट द्यावी अशी विश्वस्तांची प्रेमळ विनंती आहे.

# श्री साईबाबांची अतर्क्य लीला

**श्री. दत्ताराम केरकर**
मु. पो. – अलेवाडी,
चिंचोणे, मडगांव, गोवा.

माझ्या पत्नीच्या डोक्याच्या मध्यभागी एक भले मोठे गुट (एक प्रकारचा फोड) आले होते. त्यामुळे तिच्या डोळ्यांनाही त्रास होऊ लागला, असहाय्य वेदनांनी तिला ग्रासले. तिची ती केविलवाणी, दयनीय अवस्था पाहून मी अस्वस्थ झालो. तिच्या ह्या भीतीदायक आजारपणामुळे घरात विषण्णतेची अवकळा पसरली. मी तिला पणजीस दवाखान्यात दाखविले असता, डॉ. कैसरे यांनी तिच्या डोक्यात मातेर झाले असल्याचे

निदान करुन, फार मोठी शस्त्रक्रिया करावी लागेल, असे सांगितले. डॉक्टरांचे हे उद्गार ऐकताच मी खूपच काळजीत पडलो. काय करावे तेच मला सुचेना ! कित्येक साईभक्तांना श्री साईबाबांच्या उदीचा सुखकारक प्रत्यय येत असल्याचे मी "श्री साईलीला" मासिकात वाचत होतो. त्या प्रमाणे मी शिरडीहून श्री साईबाबांची उदी आणली आणि पत्नीच्या डोक्यास १५ दिवस चोळली, पाण्यातून प्यावयास दिली. १६व्या दिवशी उदीच्या महाप्रतापाचे प्रत्यंतर घडले. मोठे झालेले गुट फुटले, त्यातून सुकलेले मातेर गळून पडले. तिच्या डोळ्यांना होणारा त्रासही संपुष्टात आला. पत्नी पूर्ववत बरी झाली. केवढा हा श्री साईबाबांचा साईभक्तांना दिलासा !

दि. १३/९/१९८७ ची घटना. त्या दिवशी मी देवाला पाणी आणण्याकरिता जात होतो. इतक्यात सुसाट वेगाने येणाऱ्या मोटार सायकलने मला जबर धक्का दिला. त्याचवेळी मला कुणीतरी जोरात मागे खेचल्याचा भास झाला. मागे वळून पाहतो तर कुणीच दिसले नाही. हा अपघात पाहणाऱ्यांना वाटले की, मला फार मोठी इजा वगैरे झाली असेल. परंतु उजव्या पायाची सूज वगळता माझ्या शरीरावर अन्यत्र कुठेही जखम झाली नव्हती अथवा मुका मारही लागला नव्हता. उजव्या पायाला आलेल्या सुजीला मी नित्यनियमाने उदी लावली आणि आठ दिवसातच सूज उतरली. अशी आहे बाबांची आपल्या भक्तांवर कृपा !

२३ मे १९८७ रोजी मला नागेशीला लग्नाचे आमत्रंण होते. सकाळी १० वाजता यावे, असे आग्रहपूर्वक निमंत्रण होते. फोंड्यापर्यंत एकट्याने जाणे मला शक्य होते, परंतु तिथून नागेशीला जाणे, मला केवळ अशक्यच होते. त्यातच घरातील एका महिलेने मला, यावेळेस बसला खूप गर्दी असल्याने खूप त्रास होईल, असे सांगितले. त्यावर "माझे साईबाबा माझ्या बरोबर आहेत, ते संगत सोबत करतील" असे म्हणत मी घराबाहेर पडलो. सकाळी ८चा सुमार होता. मी स्टँडवर जवळ जवळ ९ वाजे पर्यंत म्हणजेच तब्बल दीड तास बसची वाट पाहिली, परंतु बसचा काही थांगपत्ता नव्हता. मी विवंचनेत पडलो. काय करावे तेच सुचेना ! परत माघारी फिरायच्या विचारात असतानाच एक सायकलस्वार आला व त्याने ओळख पाळख नसतानाही, पुढच्या स्टॉपवर सोडतो, असे सांगितले, ज्या स्टॉपवर अन्य काही मार्गावरुन येणाऱ्या बसेस मिळण्याची शक्यता होती. त्या युवकाने मला त्या स्टॉपवर सोडले आणि लागलीच नारायण कुराडे हा माझ्या परिचयातील मनुष्य तेथे मोटारीने आला. तो लग्नालाच चालला होता. त्याने मला आपल्या गाडीने सुखरुप पोहचविले. बाबांच्या संगत सोबतीचा प्रत्यय सर्व भक्तांना असाच नित्य येत राहो, हीच त्या श्री साई चरणी प्रार्थना !



# ॐ साईनाम

- श्री. जनार्दन बांदेकर
१/११, रायगड निवास,
काळाचौकी, मुंबई- ३३.

(कै. अण्णासाहेब दाभोलकर यांनी लिहिलेल्या श्री साईसच्चरित्राच्या आधारे)

ॐ श्री सद्‌गुरु साईनाथ।
तरुण सोळा वर्षांचे वयात।।
लिंबास्थळी शिर्डी गांवात।
प्रथम भक्तार्थ प्रगटले।।
अनंत कोटी ब्रह्मांड नायक राजाधिराज योगीराज परब्रह्म।
श्री सद्‌गुरु साईनाथ महाराज।।

विष्णु, राम, कृष्ण किंवा ब्रह्मा, विष्णु, महेश म्हणजेच साई. साई केवळ दोन अक्षरी नाव म्हणजे ॐ साईनाम। ओम् म्हणजे ब्रह्मांड. सारे जग. भक्तांचा रक्षणकर्ता श्री साई! शिर्डी येथील समाधी मंदिराच्या प्रवेश द्वारावर वरील श्लोक भक्तांच्या नजरेला पडल्याशिवाय राहणार नाही. शिर्डीमध्ये नव्हे, तर साऱ्या जगामध्ये साईबाबांचे अस्तित्व आहे, हे प्रत्येक साई भक्ताला माहीत झालेले असून आज आपणाला प्रत्येक घरी बाबांची आरती, पूजन, भजन आणि बाबांच्या साईसच्चरित्राचे वाचन दिसून येते.

वयाच्या अवघ्या सोळा वर्षात शिर्डी गावामध्ये लिंबाच्या झाडाखाली बाबांना लोकांनी पाहिले. शिर्डीतील गावकऱ्यांनी बाबांजवळ विचारपूस केली असता, त्यांना बाबा म्हणाले, मी कोण? मी कुठून आलो? कुठे जाणार? हे मला ठाऊक नाही. परंतु हे येथे माझ्या गुरुचे स्थान आहे. एवढेच मला माहीत असून मी या ठिकाणीच राहणार. म्हणून साऱ्या गावकऱ्यांनी खंडोबाच्या देवाला विचारुन आपली शंका दूर करुन घेतली. लिंबाच्या झाडाजवळ खोदून पाहिले असता, एक भलेमोठे भुयार आढळून आले. त्या भुयारामध्ये दोन समया पेटत असून काही भांडी सापडली. बाबा प्रथमच शिर्डीगावी आलेले नव्हते. तर त्यापूर्वी बाबांचा मुक्काम शिर्डीगावी असावा, असे काही जाणकारांचे मत होते.

खंडोबाच्या देवळाच्या बाजूला बाबा उभे असताना "आवो साईबाबा" असे उद्‌गार काढणारे खंडोबा भक्त म्हाळसापती, पुजारी यांनी बाबांना सन्मानाने आपल्या जवळ बोलाविले असता, म्हाळसापतीना बाबांच्या चेहऱ्यावरील सौंदर्य, डोळ्यांतील तेज पाहून हा कुणीतरी योगी पुरुष असावा अशी त्यांची खात्री झाली. शिवाय बाबांचा पोशाख पाहून म्हाळसापती थक्कच झाले.

चांदभाईच्या नात्यामधील लग्नाच्या वरातीच्या वेळी बाबा शिर्डीला आले. परंतु ऊन, पाऊस, थंडी यांची पर्वा न करता बाबांनी लिंबाच्या झाडाखाली बसून तपश्चर्या

केली. आणि पुन्हा हळूहळू आपल्या कार्याला सुरवात केली. त्यावेळी शिर्डीगांवी हिंदू–मुसलमान लोकांची जास्त संख्या होती. त्यावेळी गावात जातीयवाद फार माजलेला होता. अशावेळी सर्व लोकांना एकत्र करण्याची कुणाची हिंमत नव्हती. सर्व लोक एकमेकांचा द्वेष करत. अशा वेळी योग्य सांगितलेले सुध्दा लोकांना पटत नसे. हाणामारी नेहमी चालत. परंतु ह्या साऱ्या लोकांना बाबांनी एकत्र आणले. हिंदूंना त्यांच्या रितीरिवाजाप्रमाणे रामनवमी, गुरुपौर्णिमा, दिवाळी सण साजरे करण्यास सांगून मुसलमानांना ईद, मोहरम यांसारखे सण साजरे करण्यास सांगितले.

मानवधर्म एक असून, जातीमध्ये भेद नाही. ईश्वराची/अल्लाची भक्ती केल्याने सुख, समाधान, धनप्राप्ति होते, हे त्यांनी लोकांना पटवून सांगितले. आपापसातील भांडण–तंट्यांमुळे हित न होता उलट आपलेच नुकसान आहे, हे सांगून मशिदीमध्ये बाबांनी हिंदू धर्माप्रमाणे अग्नी पेटविला, ग्रंथ, पुराणांची प्रवचने चालू केली, दिवाळीसारखा सण साजरा केला व मुसलमानांप्रमाणे ईद, मोहरम यांसारखे उरुस देखील करांयला बाबांनी प्रोत्साहन दिले. त्यामुळे हळूहळू सारे लोक एकत्र आले आपला द्वेष, मत्सर विसरुन गेले.

पुढेपुढे मुसलमान मशिदीमध्ये नमाज पडत, कुराण वाचीत, तर हिंदू लोक ग्रंथांचे पारायण करीत. पुढे सारे एकत्र येऊन बाबांची सकाळ/संध्याकाळ आरती करीत. बाबांची पूजा करुन बाबांना ईश्वर मानू लागले.

फाटके तुटके नेसतो रे।
मन मानेल तेथे बसतो रे॥
वेड्या वेड्यापरी दिसतो रे।
परी ब्रह्मांड गिळुनी असतो रे॥

बाबा लोकांना सांगत मी अल्लाचा/परमेश्वराचा गुलाम आहे. मी परमेश्वर नाही. प्रत्येकाच्या नशिबी आलेले भोग प्रत्येकाने भोगलेच पाहिजेत, ते टाळता येत नाहीत. भक्ती केल्याने दुःखांचा दाह कमी होतो, पुढे येणारी संकटे टळतात आणिं सुखाचा मार्ग सापडतो.

त्यावेळी शिर्डीगाव फार लहानसे खेडे होते. त्या ठिकाणी काही छोटीशीच वाण्यांची २–४ दुकाने होती. बाबा रोज दुकानावर जाऊन पणत्या पेटविण्यांसाठी, डब्यातून तेल आणीत. स्वतः संध्याकाळी मशिदीमध्ये पणत्या पेटवून लावीत असत. परंतु रोज फुकट तेल देऊन वाणी कंटाळले. त्यांनी उद्या बाबांना तेल न देण्याचा विचार केला. दुसऱ्या दिवशी बाबा तेलासाठी दुकानावर गेले असता, "तेल संपले" असे एकच उत्तर वाण्यांकडून बाबांना मिळाले. तेल संपल्याचे ऐकून बाबांना आश्चर्य वाटले. बाबांनी द्वारकामाईमध्ये येऊन घाईघाईने सर्व पणत्या एकत्र केल्या. पणत्यांत काकडे ठेवले. हे पाहण्यासाठी लोकांची तसेच सर्व वाण्यांची गर्दी झाली. बघे लोक आपआपसात् कुजबुजू लागले. काय हा वेडा फकीर? तेलाशिवाय पणत्या कशा पेटतील? बीजाशिवाय रोपे उगवतील काय? हे कृत्य म्हणजे वांझेला बाळ

डोण्यासारखे आहे. अशा प्रकारचे टोचून बोललेले बोलणे ऐकून बाबांचे डोळे रागाने लाल झाले. टमरेलामधील थोड्याशा तेलामध्ये पाणी ओतून ते स्वतः प्याले आणि पणत्यांत पाणी ओतून त्या पेटविल्या. तेवढ्यात कुणीतरी ओरडला, तुम्ही सारे आंधळे आहात. धीर धरा पुढे काय होते ते पहा. आश्चर्याची गोष्ट अशी की, बाबांनी त्या पेटविलेल्या पणत्या रात्रभर तेलाशिवाय पेटत राहिल्या. हे पाहून गावातील लोक तसेच वाणी बाबांच्या चरणी लीन झाले. वाण्यांनी आचरण केलेल्या अपराधाची क्षमा मागितली. काही लोक बाबांना म्हणाले, बाबा, तुम्ही कृपेचे सागर असून तुम्ही सूर्यनारायण आहात. तुम्हीं शांततेचे मेरु असून सद्‌गुणांचे सरोवर आहात.

त्यावर बाबा सगळ्यांना सांगत, मी कोण आहे? मी तुमच्या सारखाच गरीब, अनाथ. पण तुम्ही सर्वांनी असे वर्तन ठेवा की, ज्याने श्रीहरी/अल्ला राजी राहील. नेहमी सत्य सांभाळा. असत्य वर्तन करु नका. सर्वांचा ईश्वर एक आहे.

बाबांची झोपण्याची तऱ्हा अगदीच विचित्र होती. एक लाकडी फळी, ४ फूट लांबीची आणि १ वीत रुंदीची, आठ--दहा जीर्ण चिंध्यांनी (कुजक्या) द्वारकामाईच्या मंदिरामध्ये बांधलेली. मशिदीची लाकडेसुध्दा कुजून गेलेली, आड्याच्या मुख्य भागातून सुटलेली. मशीद (द्वारकामाई) डळमळत होती. ह्या कुजक्या चिंध्या, बाबांचे वजन कसे काय सावरुन धरतील? तसे पहायला गेले तर फळीचे वजनसुध्दा त्या चिंध्या सांभाळू शकत नव्हत्या. परंतु त्या फळीवर बाबा कसे झोपत ह्याचे लोकांना आश्चर्य वाटे. कित्येकांना हे खरे वाटेना म्हणून लपून छपून धूर्त लोक बाबांवर नजर ठेवून पाहू लागले. काय मौज आहे ते पाहू! बाबा त्या फळीवर केंव्हा जाऊन झोपतात व फळीवरुन केव्हा व कसे खाली उतरतात ह्याची गंमत पहाण्यासाठी दिवसेंदिवस बघ्यांची तोबा गर्दी होऊ लागली. आणि म्हणून बाबांनी रागाने फळी सोडून टाकली. (साई स., अध्याय ३३, ओ. ३–४)

आपल्या भक्तांकडून बाबा केव्हा केव्हा दक्षिणा मागून घेत. दीन दुबळ्यांना दानधर्म करीत आणि उरलेल्या पैशांची बाबा धुनीसाठी सर्पण (लाकडे) घेत. लाकडे धुनीमध्ये टाकून जी राख (उदी) मिळे ती प्रसाद म्हणून बाबा आपल्या भक्तांना देत.

मानवदेह म्हणजे पंचमहाभूतांचे काष्ट असून नशिबाचे जे भोग आहेत, ते भोगण्यासाठीच मानवाने जन्म घेतलेला असून ते भोगल्यानंतरच मानवाला सुख प्राप्त होते. ब्रह्म, सत्य, ब्रह्मांड, अमृत यांची खूण ही 'उदी' सत्य. इथे कोणी कुणाचे नाही. उघडा आलो, उघडा जायचे. उदी हे त्याचे स्मारक. (ओवी ११ ते १४)

कै. अण्णासाहेब दाभोलकर यांनी साईसच्चरित्रामध्ये उदीचा महिमा असणारी अनेक उदाहरणे दिलेली आहेत. भक्तांच्या माहितीसाठी स्पष्टीकरण असे:-

१) काय बाबांच्या उदीचे महीमान।
उदी शंकराचे ही भूषण॥
भावे भाळी करी तो चर्चन।
विघ्न निरसन तात्काळ॥

नाशिकमध्ये मालेगावी एक पदवीधर डॉक्टर होते. त्यांच्या पुतण्यास आजार होता.

स्वत: डॉक्टरांनी नानाप्रकारे उपचार केले. शस्त्रक्रिया सुध्दा केली. सर्व उपाय करुन थकले. रोग हाड्याव्रण होता. कोणत्याही औषधाने बरा होत नव्हता. कुलदेवतेला, देवदेवांना, देवींना विनवून झाले. मुंबईहून कुणीतरी सांगितले, शिर्डीगावात एक अवलिया (साईबाबा) राहतात, त्यांच्याकडे जाण्यासाठी विनंती केली. त्याप्रमाणे मुलाच्या आई-वडिलांनी शिर्डीला जाण्याची तयारी केली. शिर्डीला येऊन मुलाला बाबांच्या समोर उभा करुन, मातापित्यांनी सर्वतोपरीने व्यथा सांगून एवढे जीवदान द्या, अशी बाबांजवळ विनंती केली. त्यावर बाबा म्हणाले, ही उदी घ्या आणि जखमेवर (व्रणावर) चोळा. आठ-दहा दिवसांत गुण येईल. (ओ. २२) ईश्वरावर भरवसा ठेवा. ही मशिद नसून द्वारकामाई आहे. या ठिकाणी ज्यांचे पाय लागतात, त्यांची दु:खे दूर होतात. ह्याची तुम्हालाही प्रचिती येईल.

त्याप्रमाणे पाण्यामधून मुलाला उदी पाजून मस्तकाला लावली आणि व्रणावर चोळली. हळूहळू मुलाला आराम पडू लागला. उदीच्या प्रभावामुळे घाव भरुन आला. ८/१० दिवसात जखम संपूर्ण बरी झाली.

२)एके दिवशी बाबांचे एक भक्त नारायणराव यांच्या घरी एका मित्राला विंचूने नांगी मारली असता, तो वेदनांनी व्याकूळ झाला. काही केल्याने वेदना कमी होईनात. आणि जवळपास बाबांची उदीसुध्दा मिळेना. अखेर, नारायणरावांनी बाबांची तस्बीर (छबी) समोर ठेवून एक अगरबत्ती लावून त्याची जी राख जमिनीवर पडली, ती घेऊन, बाबांचे नामस्मरण करुन, ज्या जागी विंचूने नांगी मारली होती, त्या ठिकाणी चोळून थोडी पाण्यातून प्यायला दिली. आश्चर्य म्हणजे केवळ पाच मिनिटांत वेदना शमल्या.

३)माधवराव बाबांचे थोर भक्त होते. बाबांवरील भक्तिने ते वेडे झाले होते. भक्तिशिवाय त्यांना दुसरी-तिसरी गोष्ट माहीतच नव्हती. रात्रंदिवस सारखा बाबांचा धावा. आणि तरी देखील माधवरावांच्या सौ.ना ताप येऊन जांघेवर दोन मोठ्या गाठी आल्या. त्यामुळे सौ. फार हैराण झाल्या. सौ. विव्हळत, त्यामुळे माधवरावांना काहीच सुचेना. रात्र-दिवस गाठी ठणकू लागल्या. उभयतांना अन्न गोड लागेना. बाबांची सेवा करण्याकडे मन लागेना. माधवरावांची बेचैन अवस्था झाली. अशा वेळी उभयता बाबांच्या चरणाजवळ येऊन हात जोडून म्हणाले,

जय जय साईनाथा। दया करावी आंम्हा आता।<br>
हे संकट काय ओढवेल आता। नसती चिंता उद्‌भवली।।<br>
तुजवाचूनी कवना' आता। आम्ही जाऊ कराया याचना।।<br>
दूर करी त्या पोरीच्या यातना। आशिर्वचना देई गा।।<br>
करी एवढे संकट हरण। आता कैवारी कोण तुजवीण।।<br>
करी या ज्वरांचे शमन। ब्रीद संरक्षण करी गा।।

यावर बाबा माधवरावांना म्हणाले, कशाच्या ग्रंथी आणि कशाचा ताप. आपोआप बरा होईल. सौ.ने पाण्यातून उदी घेताच, रात्री स्वस्थ निद्रा लागून सकाळी सूर्यनारायण उगवण्याच्या सुमारास उठून पाहतात तर अंगामध्ये ताप नाही आणि विषारी गाठी सुध्दा नाहीत. ही सर्व बाबांची कृपा!

४)हर्द्या नजिकच्या एका गावामध्ये एक गृहस्थ रहात होते. ते गृहस्थ मूतखड्याच्या व्याधीने त्रस्त झाले होते. नानाप्रकारे औषधोपचार करुन सुध्दा गुण नाही. लघवीच्या वेळी भयंकर वेदना होत. वेदना असह्य होऊन आपणास आता वेड लागण्याची वेळ येऊन ठेपली आहे, असा त्यांना भास होई. आता, शस्त्रक्रियेशिवाय दुसरा मार्ग नाही. हे त्यांनी मनामध्ये पक्के गोंदून ठेवले होते. परंतु ते गृहस्थ मनाने फारच भित्रे होते. शस्त्रक्रिया करावयाची म्हणजे,मनामध्ये धैर्य असावयाला हवे. मरण आले तरी चालेल परंतु शस्त्रक्रिया करुन घ्यावयाची नाही,असे त्यांनी मनामध्ये पक्के ठरवून टाकले. तोच त्या गावचे एक इनामदार साईबाबांचे भक्त शिर्डीगावाहून आलेले आहेत ही गोष्ट कानावर आली. त्यांच्या जवळ बाबांची उदी सापडेल, म्हणून रोग्याचे दोन आप्तेष्ट इनामदारांजवळ जाऊन त्यांना वृत्तांत कथन केला असता, त्यांनी त्यांना उदी दिली.

मुलाने बाबांचे नामस्मरण करुन पित्याला पाण्यामधून उदी पाजली आणि मस्तकाला लावली. तोच पाच मिनिटांत आश्चर्य घडून आले. (अध्याय ३४/१४७) उदी प्रसाद सर्वांगामध्ये भिनला आणि लघवीद्वारे मूतखडा बाहेर निसटला. त्या वृध्दाला आराम वाटला.

५)एकदा हनुमान जयंतीचा उत्सव जवळ आलेला असता, चांदोरकर, (नानासाहेब), वाईकर, बापू नगरकर आणि कानगांवकर असे चौघजण बाबांच्या दर्शनासाठी शिर्डीला आले. दर्शन घेऊन घाईघाईने परत निघत असता बाबा चौघांनाही म्हणाले, एवढी घाई कशासाठी? आता दुपारी जेवा, थोडी विश्रांती घ्या आणि मगच निघा म्हणतो. परंतु वाईकर आणि बापू नगरकर बाबांचे न ऐकता, गाडी मिळण्यासाठी निघाले.

वाईकर म्हणतात, हनुमान जयंतीसाठी उद्या माझे कथानक आहे. ह्या वेड्या फकीराच्या नादी लागून काय उपयोग?.चिटणीसांचे ठीक आहे. घरी पैसा मुबलक आहे. जर मी इथे थांबलो तर मला भीक मागावी लागेल. इथे कवडीची प्राप्ती नाही. चला आपण स्टेशनची वाट धरू, असे म्हणून दोघे निघाले. कानगांवकर आणि चिटणीस शिर्डीला राहिले. बाबा चिटणीसांना म्हणतात, जगाची रीत कशी आहे ते पाहिलीस? आपल्या दोघा मित्रांना सोडून दोघे निघून गेले. म्हणून तुम्ही असे मित्र जोडा की, आपली व त्यांची ताटातूट केव्हाही होणार नाही.

दुपारी बाबांबरोबर त्यांचे जेवण झाले, विश्रांती झाली, गप्पा गोष्टी झाल्या, तेव्हा बाबांनी आपण होऊन चांदोरकर (नाना), कानगांवकर या दोघांना निघण्याची आज्ञा केली. बाबांच्या चरणावर मस्तक ठेवून दोघेही स्टेशनच्या रस्त्याने चालू लागले.

इकडे स्टेशनवर बापू आणि कथेकरी वाईकर उपाशी बसले. दोघेही मनामध्ये चरफडत होते. काही खायला न मिळाल्याने चिटणीसांना पाहून दोघेही शरमिंदे झाले. दोघांनीही खाली माना घातल्या.

चांदोरकर म्हणाले, गाडी का सोडलीत? त्यावर नगरकर म्हणाले, आज गाडीला तीन तास उशीर झाला आहे. आम्ही मात्र उपाशी मेलो. बाबांचे ऐकले असते तर आज ही वेळ आली नसती. नंतर गाडी आली. चौघेही गाडीमध्ये बसून मुंबईला आले.

बाबा आपल्या भक्तांना नेहमी सांगत, "मी ना अनल हक्क,ना परमेश्वर यादे हक्क, मी यादगार. बंदा मी लाचार अल्लाचा. मी देव नाही, ना ईश्वर!"

सर्व साईभक्तांना मी नम्र विनंती करतो की, कुणीही अंधश्रध्देला बळी पडू नये. पैसा उधळू नये. श्रध्दा,सबुरीने वागल्याने बाबांच्या सान्या भक्तांना सुख–समाधान, धन प्राप्त होईल,हे सत्य जाणा. सदा साईचरणी लीन व्हा. आपल्या भक्तांना बाबा काही कमी पडू देणार नाहीत.

## ग्रंथ परीक्षण

## "श्री साई सरोवर"

हा गुजराती भाषेत लिहिलेला दोन भागांचा मोठ्या १५०० पानांचा श्री साईचरित्राचा अप्रतिम ग्रंथ नुकताच (१९ जुलै १९८७) प्रसिध्द झालेला आहे. श्री साईबाबांबद्दल इतका मोठा ग्रंथ कोठल्याही भाषेत अजून प्रसिध्द झालेला नाही. श्री. अण्णासाहेब दाभोलकर, ह.भ.प. दासगणू महाराज, पू. नरसिंह स्वामी, पू. साईशरणानंद, श्री. दादासाहेब खापर्डे या सर्वांनी मराठी, इंग्रजी व गुजराती भाषेतील बाबांविषयी व त्यांच्या हयातीतील भक्तांविषयीची गोळा केलेली सर्व ती माहिती या ग्रंथात आलेली आहेच. याशिवाय श्री. अमीदास मेहता, श्री बाळकृष्णदेव मामलतदार, प्रो. नारके, श्री. वामनराव गोखले यासारख्यांच्या फारशा प्रसिद्ध नसलेल्या पुस्तकांतील माहितीदेखील यात आहे. पू. उपासनी महाराज, पू. श्री. मोटा, पू. रंगावधूत महाराज, संत श्री. शांतवनजी महाराज इत्यादी संतांची विस्तृत चरित्रे यात दिलेली आहेत. शिरडीत म्हटल्या जाणाऱ्या श्री साईनाथ– सगुणोपासनेतील मराठी व संस्कृत आरत्या, स्तोत्रे व भजने यांचे उतारे अनुरुप स्थळी गुजराती अनुवादासह दिले आहेतच परंतु त्याशिवाय पू. नरसिंहस्वामींनी रचलेली श्री साईबाबा अष्टोत्तरशत नामावली, पू. रंगावधूत महाराजांनी रचलेले १००८ मंत्रांचे दत्त नामसंकीर्तन देखील गुजराती भाषेच्या अर्थासह संपूर्ण दिलेले आहे. दासगणू महाराजांचे "अगाध शक्ती अघटित लीला" व "शांतचित्ता महाप्रज्ञा" हेही स्वामी साईशरणानंदांच्या गुजराती श्री साईसच्चरित्रातून उध्दृत करण्यास लेखक विसरलेला नाही. थोडक्यात हा ग्रंथ श्री साईबाबांच्या चरित्राबद्दल इतका परिपूर्ण आहे की त्याला "श्री साई महाभारत" किंवा "श्रीसाई ज्ञानकोश" असेच म्हणणे योग्य.

या ग्रंथाचे वैशिष्ट्य म्हणजे यात साईबाबा अयोनिज असून शिरडी गावात निंब वृक्षाखालील भूयारातून शके १७७१ श्रावण वद्य अष्टमीला (गोकुळ अष्टमीला) (१० ऑगस्ट १८४८) मध्यरात्री प्रगट झाले व लोकांना ते दुसऱ्या दिवशी सकाळी

झाडाखाली दिसले असे म्हटले आहे. त्यावरुन लेखकाने गुजरातेतील एका प्रसिध्द ज्योतिषाकडून बाबांची प्रगट कुंडली करवून घेऊन ती या ग्रंथात दिली आहे व ती श्रीकृष्ण भगवानांच्या कुंडलीशी ९० टक्क्यांच्यावर कशी जुळते आहे हेही दाखविले आहे. अर्थात ही गोष्ट वादग्रस्त असल्याने सर्वांनाच पटेल असे नाही.

हा ग्रंथ भरपूर माहितीपूर्ण असला तरी तो केवळ निरस संशोधात्मक शास्त्रीय ग्रंथ नाही. उलट साईबाबांच्या एका निःस्सीम भक्ताने लिहिलेला अत्यंत भक्तीपूर्ण प्रासादिक ग्रंथ असून वाचण्यास मुळीच कंटाळवाणा वाटत नाही. हेमाडपंतकृत श्री साईसच्चरिताप्रमाणे ओवीबध्द तो नसला (गद्यात असला) तरी त्यात काव्यमय उपमा वगैरे अलंकार भरपूर आहेत. एकादशी, सोमवार, वटसावित्री वगैरे व्रते यात समजावून सांगितली आहेत. गायत्री महिमा, रुद्राध्याय महिमा सांगितला आहे. तसेच भारतातील तीर्थांचे वर्णन व माहात्म्यही दिले आहे. ठिकठिकाणी साधी पण अनुरूप चित्रेही छापली आहेत. लेखकाने हा ग्रंथ भक्तांच्या पारायणासाठीच रचलेला आहे, म्हणून प्रत्येक जिज्ञासेच्या (अध्यायाच्या) सुरवातीला श्री गणेश व इतर देवांना, ऋषींना व वडीलधाऱ्या व्यक्तींना नमन आहे आणि मधूनमधून पारायणाची फलश्रुतीही सांगितली आहे.

श्री जरमनवाला यांची साईभक्ती लक्षात येऊन त्यांनी साईबाबांची प्रत्यक्ष आज्ञा मिळवून हा ग्रंथ लिहिण्यास प्रारंभ केला. बाबांचा वरदहस्त असल्याशिवाय या साधारण दिसणाऱ्या गृहस्थाकडून एवढे महान कार्य पार पडणे शक्यच नाही.

श्री साईसरोवराच्या हस्तलिखितातून सारांश रुपे "श्री साई झलक" भाग १ व २ (पाने ४००) लेखकाने याआधी ८–९ वर्षापूर्वी प्रसिध्द केले होते व त्याच्या ३८,००० प्रती भक्तांना फुकट वाटल्या होत्या. सध्या त्या उपलब्ध नाहीत. पैशाची सोय झाल्यास त्याचे दोन्ही भाग एकत्रित करुन पुन्हा छापण्याचा लेखकाचा विचार आहे. साईसरोवर लिहून व प्रकाशित करुन प्रचंड कष्टकारक कार्य त्यांनी पूर्ण केले,याबद्दल धन्यवाद!

ज्या श्रीसाईलीलेच्या वाचकांना गुजराती थोडेफार जरी समजत असेल त्यांनी "श्री साई सरोवर" हा ग्रंथ शक्य असेल तर विकत घेऊन जरुर वाचावा. बाबांबद्दल व बाबांच्या भक्तांबद्दल भरपूर व आतापर्यंत अप्रसिध्द अशी बरीच मनोरंजक माहिती तर मिळेलच परंतु एक पवित्र ग्रंथाच्या पारायणाचे व त्याच्या प्रसिध्दीला हातभार लावल्याचे पुण्यही पदरी पडेल.

**लेखक-** श्री मगनलाल तापीदास जरमनवाला.

**प्रकाशक-** श्री साईसरोवर, वराछा रोड, सुरत ३९५ ००६.

**किंमत-** ग्रंथ १ व २ मिळून रु. १९५.०० (परंतु सध्या कमीत कमी रु. १०१ देणगी व रु. १५.०० पोस्टेज खर्च पाठविल्यास ग्रंथ १ लगेच व ग्रंथ २ प्रसिध्द झाल्यावर पाठविण्यात येईल.)

**प्राप्तीस्थान :-** प्रकाशकाकडे. (पत्रव्यवहार फक्त गुजराती किंवा हिंदीत करावा.)

**- श्री. मु. ब. निंबाळकर.**

# जेव्हा गुराखी राजा होतो

बडोदा हे मराठी संस्थान. बहुजन व अस्पृश्य समाजाची उन्नती व्हावी यासाठी ज्या संस्थानांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केले, त्यात सयाजीराव महाराज गायकवाड, राजश्री छत्रपती शाहू आणि पानगलच्या महाराजांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. साहित्य, संस्कृती, धर्मशास्त्र आणि समाज परिवर्तनाकडे सयाजीरावांचा स्वाभाविक ओढा होता. श्रमिक बहुजन समाजात नव्या विचारांचा व मानवी हक्कांच्या जाणीवा निर्माण व्हाव्यात या प्रामाणिक व विशुध्द हेतूने महाराजांनी विविध मार्गांनी प्रयत्न सुरु केले होते. होतकरु हुशार विद्यार्थ्यांना आर्थिक मदत देणे, उच्च शिक्षणासाठी महाविद्यालये, वसतीगृहे सुरु करणे व सामान्य जनांचे प्रबोधन व्हावे म्हणून ग्रंथ प्रकाशनाची योजना राबविणे या उपक्रमांनी महाराजांनी संस्थानचा इतिहास घडविला. धर्मविषयक व सामाजिक समता प्रवर्तक व्याख्यानमाला सुरु करणारे देशातील हे पहिले संस्थान. या व्याख्यानमालेप्रसंगी महाराज स्वत: उपस्थित राहात, चर्चा करीत. काही व्याख्यानमालांचे ते स्वत:च अध्यक्ष होते. अशा वेळी त्यांनी व्यक्त केलेल्या सामाजिक विचारांची दखल लो. टिळकांनाही घेणे भाग पडले होते. संस्थानातच नव्हे तर महाराष्ट्रातील समाज व साहित्य या क्षेत्रात क्रांतीकारक बदल करणाऱ्या सयाजीरावांचे चांगले चरित्र मराठीत अलिकडे लिहिले गेले. श्री. निंबाजीराव पवार यांनी लिहिलेले हे नवे सयाजीरावांचे चरित्र 'जेव्हा गुराखी राजा होतो' हे मराठीतील एक महत्त्वाचे चरित्र पुस्तक आहे. त्यातील बरेच तपशील संदर्भासाठी अभ्यासूंसाठी उपयुक्त पण आहेत.

बडोदे संस्थानच्या राजसिंहासनावर खानदेशातील कवळाण्याच्या गोपाळ नामक गुराखी मुलाचे आरोहण हा एक नियतीचा चमत्कारच म्हटला पाहिजे. ज्या उच्चपदासाठी या मुलाचा इंटरव्ह्यू झाला,त्या पदाचे श्रेष्ठत्व आणि महत्त्व समजण्याचे त्याचे वय त्यावेळी खास नव्हते. राजपदी आले त्यावेळी त्यांच्या हाती केवढी सत्ता, संपत्ती व लक्षावधी प्रजेचे भाग्य घडविण्याची शक्ती आली याची त्यांना कल्पनाही नव्हती. पण आपल्यावर काहीतरी मोठी जबाबदारी आली आहे,ही जाणीव त्यांना राज्याभिषेकाचे वेळी – किशोरवयातच झाली. हाच त्यांच्या आयुष्यातील महत्त्वाचा निर्णायक क्षण. तो त्यांनी बरोबर टिपला म्हणूनच ते वंदनीय अशा थोर पदास पोहोचले. बारा वर्षांचा गुराख्याचा राजपदासाठी झालेला हा इंटरव्ह्यू म्हणजे जगातील अत्यंत विलक्षण– अद्भुत व ऐतिहासिक महत्त्वाचा इंटरव्ह्यू होय. ही एखाद्या परिकथेत शोभून दिसणारी सयाजीरावांची कथा शंभर वर्षांपूर्वी प्रत्यक्ष घडलेली सत्यकथा होय.

चरित्रलेखनाचे जुने तंत्र न वापरता नवीन वेधकप्रकारे त्यांनी लेखन केले आहे. या चरित्राचे आणखी विशेष म्हणजे कवळाणे येथील मंडळीचे आहिरणी भाषेतील बोल, नेमक्या प्रसंगातून, नेटक्या व मोजक्या शब्दांच्या संवादातून लेखक मांडतो व

ांतही सहजता व सुंदरता कायम राखतो. हे प्रसंग अत्यंत हृदयस्पर्शी झाले आहेत. हाराज प्रारंभी अशिक्षित होते, ते सुशिक्षित तर झालेच, पण मूळचा सुसंस्कृतपणा बदार सिंहासनातूनही ते कधीच विसरले नाहीत, हा धागा लेखकाने अतिशय लपणे उलगडून दाखविला आहे. फुलाची एक एक पाकळी उमलत जावी तसे वीस प्रकरणातून सयाजीरावांचे जीवनचरित्र सहजपणे उलगडत जाते. सध्याच्या ढीसमोर सयाजीराव महाराजांसारख्या एका आदर्श व लोककल्याणी राजाचे चरित्र त्यंत सुबोध, रसाळ व लालित्यपूर्ण भाषेत श्री. पवार यांनी मांडले आहे.त्याबद्दल ांना धन्यवाद दिले पाहिजेत.

वंशवृक्ष, महत्त्वाच्या प्रसंगांची सूची, संदर्भग्रंथांची सूची, छायाचित्रे व बडोदे स्थानचा नकाशा यांचा समावेश ग्रंथात दिल्यामुळे हा ग्रंथ आणखीनच उपयुक्त व ग्राह्य झाला आहे.

**(लेखक- श्री. निंबाजीराव पवार, प्रकाशक- श्री. प्रकाश पवार, सयाजी प्रकाशन, गांधी रोड, नाशिक. किंमत - ८० रुपये. पृष्ठे ३४१.)**

---

**श्रीसाईलीलाच्या सभासदांस निवेदन**

श्री साईलीला मासिकाचे नवीन सभासद होऊ इच्छिणाऱ्या व वर्गणी संपलेल्या जुन्या सभासदांनी आपली वर्गणी श्री साईबाबा संस्थान, मुबई कार्यालय, साईनिकेतन, ८०४ बी, खोदादाद सर्कल जवळ, दादर, मुंबई - ४०० ०१४. येथे प्रत्यक्ष/मनिऑर्डर द्वारे भरावी. चेक पाठवायचा झाल्यास तो 'श्री साईबाबा संस्थान शिरडी' या नावावर असावा, कोणत्या कारणासाठी मनिऑर्डर करीत आहात त्याचा खुलासा मनिऑर्डरवर करावा. मनिऑर्डरवर जेथे 'संदेश के लिए स्थान आणि भेजनेवाले का नाम व पूरा पत्ता' असे नमूद केलेले असते त्या दोन्ही ठिकाणी सभासदांनी आपले नाव व पूर्ण पत्ता लिहिणे आवश्यक आहे.

---

श्री साईलीलाच्या संदर्भात पत्र-व्यवहार करताना, श्री साईलीलाच्या जुन्या सभासदांनी, त्यांचा सभासद क्रमांक नमूद करणे आवश्यक आहे.

श्री साईलीलाच्या सभासदांनी आपली वर्गणी संपण्यापूर्वी एक महिना अगोदरच भरल्यास अधिक सोयीचे होईल.

# शिरडीतील श्री साईमहाराजांचा दर गुरुवारचा पालख सोहळा

- श्री. सदानंद चेंदवण
कार्यकारी संपादक, श्री साईली
श्री साईबाबा संस्थान शिर



शिरडीला श्री साईबाबांच्या दर्शनासाठी आलेल्या भक्तभाविकाने गुर शिरडीहून निघू नये असा एक संकेत आहे. खुद्द शिरडी निवासी कुटुंबवर गृहस्थाश्रमी जुनी मंडळी सुध्दा गुरुवारी शिरडी सोडून बाहेरगावी जाण्यास र निघत नाहीत. गुरुवारी सायंकाळपर्यंत शिरडीला यावे पण निघू मात्र नये. निघार असेल तर रात्री दहानंतर निघावे असे म्हणतात. का? आहे माहीत?

अहो, या दिवशी, शिरडीवर संपूर्णपणे सत्ता गाजविणाऱ्या, जगातील भाविकांच्या अंतःकरणावर जबरदस्त प्रभाव असलेल्या भगवान संत चूडामण सच्चिदानंद सद्‌गुरु साईनाथ महाराजांच्या पालखीचा अपूर्व सोहळा गुरुवा सायंकाळनंतर निघत असतो. साक्षात श्री महाराजांची समाधी मंदिर ते मशिद म मशिद माई ते चावडी व फिरुन चावडी ते समाधी मंदिर अशी साप्ताहिक रपेट, असते असा भाविकांचा दृढ समज आहे. यामुळे श्रींच्या शेजारतीनंतर अगदीच निकडीचे असेल तरच गमन करतात.

शिरडीला साईनाथांची पालखी दर गुरुवारी निघते. याशिवाय उत्सव काल पालखी सोहळा होतो. समाधी मंदिर, द्वारकामाई व चावडी ही या पा सोहळ्याची तीन मर्यादित स्थळे आहेत.

पालखीच्या वेळी पालखीतून मिरवत न्यावयाच्या वस्तू म्हणजे श्री बाबांचा स चर्म पादुका म्हणजे जोडे व श्री बाबांची सालंकृत, पुष्पमालांनी सुशोभित तसबीर.

दर गुरुवारी रात्री सुमारे सव्वा आठ वाजता समाधी मंदिरातील चौथ पायऱ्यांच्या समोर एक चांदीचा पाट ठेवला जातो. त्या पाटावर एक लंब वर्तुळ

मध्ये गादी असलेले लाकडी तबक ठेवले जाते. त्या तबकात श्री बाबांच्या पादुका पुढे करून ठेवल्या जातात. त्या पादुकांवर सुमारे तीन-सव्वातीन वीत भर चा बाबांचा शिसवीचा सटका आडवा ठेवला जातो. पादुका व सटका यांची शी पूजा केली जाते व छोटासा हारही घातला जातो. या वस्तूंबरोबरच श्री ंची शिलेवर आसनस्थ असलेल्या चित्राची एक तसबीर असते. चांदीच्या फ्रेममध्ये भित केलेली ही तसबीर श्रींच्या पुतळ्याच्या चरणाजवळच ठेवलेली असते.

प्रत्यक्ष मिरवणुकीने या वस्तू पालखीतून निघण्यापूर्वी तासभर अगोदर त्या वस्तू कोंच्या दर्शनासाठी समाधी मंदिरात ठेवल्या जातात. भाविक अत्यादराने या ूंचे नतमस्तक होऊन, वस्तूंना स्पर्श करुन दर्शन घेतात. तसबिरीचेही दर्शन ात पण तसबीर पुतळ्यापाशी असल्याने त्यांना तिथे स्पर्श करता येत नाही. एरव्ही वस्तू समाधीमंदिरात प्रवेश केल्यावर डाव्या हातास असलेल्या श्री बाबांच्या वस्तू हालयात श्री बाबांनी हाताळलेल्या वस्तू म्हणून सुरक्षितपणे ठेवलेल्या असतात.

या वस्तूंबरोबरच श्रींच्या पालखीवर धरावयाची चांदीच्या मुठीची छत्री, पालखीवर ठावयाच्या चांदीच्या मुठीच्या चवऱ्या, अबदागीर, श्री बाबांचा अती आवडता असा फ्लेटी रंगाचा जरीने मढविलेला कोट या वस्तू पण काढल्या जातात.

बरोबर नऊ वाजता भजनी मंडळी समाधी मंदिरात येतात व साईभक्तीपर भजने, , अभंग यांचा सुमारे १५ मिनिटे मृदंग–टाळ वाद्यांच्या साथीत कार्यक्रम होतो. ुविकही यात सहभागी होतात. मोठा श्रवणीय असा हा कार्यक्रम होतो.

बरोबर साडे नऊ वाजता टाळ, मृदंग, ताशा वाजंत्री, पिपाणी यांच्या निनादात व ईंच्या नामघोषात समाधी मंदिरातील या तिन्ही वस्तू विधीपूर्वक उचलल्या जातात. वस्तू शिरडीतील कोते-पाटील यांच्या वंशजापैकीच दोघा मान्यवरांनी चलावयाच्या असतात. एकाजवळ पादुका–सटका–तबक असते तर दुसऱ्याजवळ सबीर असते. दोघाही पाटलांच्या पुढे भालदार–चोपदार हे असतातच. भक्तगणही चंड संख्येने या मिरवणुकीबरोबर असतो.

बरोबर ९ वाजून २० मिनिटांनी ही मिरवणूक द्वारकामाईत प्रवेश करते. रकामाईत पूर्व–दक्षिण कोपऱ्यात असलेल्या तुलसी वृंदावनाजवळ श्री बाबांची लखी रंगीबेरंगी पुष्पमालांनी आतून बाहेरून सुशोभित करून ठेवलेली असते. लांची जणू गादीच आतील बाजूस असते. एरव्ही ही पालखी मशिदीतच धुनीमातेच्या लीच्या बाजूस समांतर असलेल्या एका निमुळत्या पत्रादार असलेल्या खोलीत रक्षित ठेवलेली असते. हरद्याचे परमसाईभक्त श्री. सदूभैय्या नाईक यांनी बाबांना ही लखी दिलेली असून बाबा या पालखीत बसलेलेही आहेत असे सांगतात.

समाधीमंदिरातून मिरवणुकीने मिरवत आणलेल्या ह्या वस्तू द्वारकामाईत बाबांची त्य बसावयाची जी प्रचंड शिळा ज्या टपरीत ठेवलेली आहे तेथील शिळेवर ठेवल्या तात. तसबिरीला हार चढविला जातो व भजनाच्या कार्यक्रमाला सुरुवात होते. या जन कार्यक्रमाच्या वेळी विशिष्ट मर्यादेच्या पलिकडे कुणाही भक्ताला मुळीच जाऊ ले जात नाही.

द्वारकामाईत 'जय जय राम कृष्ण हरी', त्यानंतर 'हे साईनाम सुखदायी' .... व 'शिरडी माझे पंढरपूर' अशी प्रमुख भजने वाद्यांच्या तालावर होतात, व ती आटोपल्याव समाधीमंदिरातून टपरीवर ठेवलेल्या सर्व वस्तू फुलांनी सजविलेल्या पालखीत ठेवल्या जातात.

पालखीतून या वस्तू मिरवणुकीने चावडीत नेल्या जातात. सुमारे ९.४० ला ही पालखी मिरवणूक चावडीत येते. चावडीच्या प्रवेश द्वाराजवळ सुंदर वेलबुट्टीदा रांगोळी काढलेली असते. तिथे पालखी ठेवतात. समोर एक चौरंगही ठेवलेला असतो क्षणभर या वस्तू चौरंगावर ठेवतात. एरव्ही हा चौरंग चावडीतच असतो. नंतर चौरंगावरील वस्तू चावडीत बैठकीवरील गादीच्या आसनावर जिथे बाबांची फुल पाकळ्यांनी सजविलेली तसबीर जी आहे तिच्या समोर ठेवल्या जातात. चावडीची जागा लहान असल्याने भक्तांना या ठिकाणी फारसे येऊ दिले जात नाही. महिलांना मात्र चावडीतील गजापलिकडील दालनात उभे राहाता येते. तिथे त्या दाटीवाटी पुढील कार्यक्रम बघण्यासाठी उत्सुक असतात.

यावेळी चावडीतील बाबांच्या बैठकीवरील तसबिरीला चॉकलेटी कोट चढविलेल असतो. पादुका, सटका, तसबीर यांना प्रथम पुजारी सुवासिक उदबत्तीने ओवाळतात नंतर हळद, कुंकू, अक्षता, फुले वाहिली जातात. नैवेद्य म्हणून प्रामुख्याने फळेच ठेवल ज्या ऋतूत जी फळे प्रामुख्याने असतात ती फळे बाबांसमोर ठेवली जातात या नैवेद्यासभोवती पाणी फिरवून हा फलाहार अगत्यपूर्वक ग्रहण करावा असे बाबांन आवाहन केले जाते. नंतर निरांजन पेटविले जाते "घेऊनि पंचारती करु बाबांच आरती" यानंतर "आरती साईबाबा" ही आरती होते. ही आरती चालू असतान चॉकलेटी कोट घातलेल्या बाबांच्या तसबिरीतील ओठाजवळ रुपेरी रंगाच तमाखू–जर्दा भरलेली चिलीम पेटवून ती पाटील वंशजापैकी एकजण धरतात. आणि भक्तांनो, तुम्ही अगदी लक्षपूर्वक बारकाईने नजर न हलवता तिकडे बघा हं. चिलीम लावताच बाबा अक्षरश: दम मारतात व चिलीमीतून भर्रकन् धूर बाहेर आलेल दिसतो! येथवर ही आरती संपते व "शिरडी माझे पंढरपूर" भजन सुरु होते. त्यावेळी चॉकलेटी जरतारी कोटाला सुवासिक अत्तर फासले जाते. त्यावर गुलाबपाणी शिंपडले जाते. "घालीन लोटांगण वंदीन चरण" ही शेवटची आरती झाली की पुजारी देवाला साष्टांग नमस्कार घालतात.

पालखीतून आणलेल्या सर्व वस्तू पुन्हा पालखीतच ठेवल्या जातात. पालखी ९.५० ला चावडीतून निघते व वाद्य निनादात व जयघोषात समाधीमंदिरात परत येते वाटेत द्वारकामाईच्या प्रवेशद्वाराशी मिनिट दोन मिनिटभर ती उभी केली जाते यावेळी काही भक्तमंडळी पालखीच्या दांड्याला श्रध्दापूर्वक हस्तस्पर्श लावून पालखी दांड्याखालून जाण्यात धन्य मानतात.

पालखीतून आणलेल्या वस्तू समाधीमंदिरात चौथऱ्यावर पुन्हा ठेवल्या जातात. अगदी ठीक १० वाजता श्री बाबांची शेजारती सुरु होते, १०–२० ला ती संपते.

आरतीनंतर पालखीबरोबरच्या पाटील उभय वंशजांना प्रसादादाखल श्रीफल सन्मानपूर्वक दिले जाते. बाबांच्या वस्तू संग्रहातून या खास पालखीसोहळ्यासाठी काढलेल्या सर्व वस्तू पुन्हा जागच्या जागेवर व्यवस्थित ठेवल्या जातात. रात्री ९—१५ ते १०—३० पर्यंतचा हा पालखी सोहळ्याचा कार्यक्रम यत्किंचितही वेळ न दवडता कोणत्याही प्रकारची घाईगर्दी न करता अगदी व्यवस्थितपणे उरकण्याची दक्षता घेतली जाते.

रात्री १०—५० पर्यंत मंदिरातील सर्व ती आवराआवर झटक फटक होते. ठीक ११ च्या ठोक्याला सर्व पुढील मागील दारे बंद करुन कडी कुलूप करुन मुख्य प्रवेशद्वार बंद करुन कुलूप लावले जाते व दिवसभर भक्तांना दिलेल्या दर्शनामुळे की काय श्री साईनाथ महाराज शिणले जातात व निद्राधीन होतात. रात्री ११ नंतर कोणताही कसलाच कार्यक्रम शिरडीत करु नये, असा दंडक आहे. आरतीला जमलेली भक्तमंडळी ही "आता स्वामी सुखे निद्रा करा अवधूता। करा साईनाथा या चिन्मय हे सुखधामा जाऊनि देवा पहुडा एकांता" असे गुणगुणत आपापल्या निवासस्थानी परततात.

असा आहे हा श्रींच्या पालखीचा सुंदर सोहळा.

## ध्यास तुझा लागला

साई तुज विना करमत नाही
साई दाता तूच माऊली घरा घराची आई
साई साई डोळे उघडूनी जेव्हा पाही
हात तुझा हा हालत नाही, बोलत नाही,
सांगत नाही किती विचारु प्रश्न तुला
ओंठ हालेना, तुज विना साई, साई तुज विना
करमत नाही बाबा मजला
कधी न येईल माझ्या घरा तूच माऊली
तुझीच सावली फिरती रोज घरा घरा
साई तुज विना करमत नाही
ध्यास लागला बाबा तुमचा केव्हा येईल
गुरुपौर्णिमा वाट पाहीन पुढे दसरा
किती हो तुमचा सोहळा आनंद मावेना
गगनात विसर पडेना तुमचा जरा
साई साई तुज विना करमत नाही
खाता, पिता, उठता, बसता कानी हाक येई
बाबा बाबा साई बाबा साई बाबा साई

- सौ. अनुराधा शा. पिंपळगावकर
६३९, दत्तवाडी, पुणे - ३०

# इति श्री साई उवाच

श्री साईसच्चरितातील **साक्षात् श्री बाबांच्या मुखातून बाहेर पडलेली मौक्तिक फळे**

**संकलन- श्री. डी. जी. देशपांडे**
**११ ए–खूर–सिल–नाझ,**
**कोहिनूर मार्ग, दादर, मुं. १४.**

## - श्री साई वचनामृत -

१

चळल्या काय कुठें नेतां। बापाचा माल घेऊनि जातां।
जा शिवेवर नेऊन आतां। पीठ तत्वतां टाका तें।
आल्या रांडा फुकट खाऊ। कुटाया मज धांवधांवू।
गहूं माझे काय कर्जाऊ। पीठ नेऊं पाहतां।

—अ. १ला

२

मी तों केवळ भिकारी। फिरतो भिक्षेस दारोदारीं।
ओली कोरडी भाजी भाकरी। खाऊनि गुजरीं काळ मी।
त्या माझी कथा कशाला। कारण होईल उपहासाला।
कथावार्तादि अनुभवांचा। संग्रह साचा करावा।
दफ्तर ठेवा बरे आहे। त्याला माझे पूर्ण सहाये।
तो तर केवळ निमित्त पाहें। लिहावें माझें मीचं कीं।
माझी कथा मींच करावी। भक्तेच्छा मींच पुरवावी।
तयाने अहंवृत्ति जिरवावी। निरवावी ती ममपदीं।
ऐसें वर्ते जो व्यवहारीं। तया मी पूर्ण साह्य करी।
हे कथाच काय सर्वतोपरी। तया घरीं राबे मी।
अहंवृत्ति जेव्हां मुरे। तेव्हां तयाचा ठावही नुरे।
मीच मग मी पणे संचरें। माझ्याच करें लिहीन मी।
ये बुध्दीं जें कर्म आरंभिलें। श्रवण मनन बा लेखन वहिलें।
ज्याचे त्यानेच ते संपादिले। त्यास तों केले निमित्त।
अवश्यमेव दप्तर ठेवा। घरी दारीं असा कुठें वा।
वारंवार आठव ठेवा। होईल विसावा जीवास।
करितां माझीया कथांचे श्रवण। तयांचे कीर्तन आणि चिंतन।
होईल मद्‌भक्तीचे जतन। अविद्या निरसन रोकडें।
जेथे भक्ति श्रध्दान्वित। तयाचा मी नित्यांकित।
ये अर्थी न व्हावें शंकित। इतरत्र अप्राप्त मीं सदा।

सद्‌भावे या कथा परिसतां। निष्ठा उपजेल श्रोतयां चित्ता।
सहज स्वानुभव स्वानंदता। सुखावस्ता लाधेल।
भक्तासी निजरुपज्ञान। जीव–शिवा समाधान।
लक्षेल अलक्ष्य निर्गुण। चैतन्य धन प्रकटेल।
ऐसें या मत्कथांचे बिंदान। याहून काय पाहिजे आन।
हेंच श्रुतिचें ध्येय संपूर्ण। भक्त संपन्न ये अर्थी।
जेथे वादावादीची बुद्धी। तेथे अविद्या माया समृद्धि।
नाहीं तेथें स्वहित शुध्दि। सदा दुर्बुध्दी कुतर्की।
तीन आत्मज्ञानास पात्र। तयास ग्रासी अज्ञान मात्र।
नाहीं तयास इहपरत्र। असुख सर्वत्र सर्वदा।
नको स्वपक्ष स्थापन। नको परपक्ष निराकरण।
नको पक्षद्वयात्मक विवरण। काय ते निष्कारण सायास।

—अ. २रा.

३

काय चाललें होतें वाड्यांत। वाद कशाचा होता भांडत।
काय म्हणाले हे हेमाडपंत।

—अ. २रा

४

आपुली संपूर्ण अनुमती। चरित्र स्थिती वर्णावया।
तुम्ही आपुलें कार्य करा। मनी यत्किंचितही न कचरा।
विंश्वासपूर्ण मद्वचनी धरा। निर्धार करा मनाचा।
केलिया मल्लीलेचें लेखन। होईल अविद्या दोष निरसन।
भक्तिभावें करितां श्रवण। प्रपंचभान मावळेल।
उठतील श्रवण सागरावरी। भक्ति प्रेमामृताच्या लहरी।
बुडिया देतां उपराउपरी। येतील करी बोधरत्नें।

—अ. ३रा

५

यांतचि तुमचें कल्याण आहे। माझेंहि अवतार सार्थक्य हें।
माझी तों घोंकणी नित्य पाहे। काळजी वाहें हेच मी।
वरी एक सांगतों शामा प्रेमे घेईल जो मन्नामा।
तयाच्या मी सकल कामा। पुरवीं प्रेमा वाढवीं।
मग जो गाई वाडे कोडें। माझे चरित्र माझे पवाडे।
तयाचिया मी मार्गेपुढें। चोहींकडे उभाच।
जे जे भक्त मजकारणें। असतील विनटले जीवें प्राणें।
तयांसी या कथा श्रवणें। आनंद होणें सहजीच।
कोणीही केल्या माझे किर्तन। तयासी देईन आनंदधन।

नित्य सौख्य समाधान। सत्य वचन मानावें।
जो मजलागी अनन्य शरण। विश्वासयुक्त करी मद्‌भजन।
माझे चिंतन माझे स्मरण। तयाचे उध्दरण ब्रीद माझे।
माझे नाम माझी भक्ती। माझें दफ्तर माझी पोथी।
माझे ध्यान अक्षय चित्तीं। विषय स्फूर्ती कैंची त्या।
कृतांताच्या दाढेंतून। काढीन मी निजभक्ता ओढून।
करितां केवळ मत्कथा श्रवण। रोग निरसन होईल।
कथा करा सादर श्रवण। त्यावरीं करा पूर्ण मनन।
मननावरी निदिध्यासन। समाधान पावाल।
'अहं सोहं' जाईल विरोन। उन्मन होईल श्रोतियांचें।
चित्त होईल चैतन्यधन। अनन्य परिपूर्ण श्रध्देनें।
'साई साई ति' नामस्मरण। करील सकल कलिमलदहन।
वाणीश्रवण गतपाप भंजन। एक लोटांगण घालितां। — अ. ३रा.

६

मिळेल मेली तयास नोकरी। करावी आतां माझी चाकरी।
सुख संसारी लाधेल।। ताटें याची भरलीं सदा।
यावज्जीव न रितीं कदा। भावें मत्पर होतां सर्वदा।
हरतील आपदा तयाच्या।। काहीं केले काय झालें।
म्हणती जन ते समजा चळले। धर्माचरण जयांनी वर्जिलें।
तयास पहिले वर्जावे।। समोर येता बाजूस जावें।
महाभयंकर ते समजावे। त्यांच्या छायेसही न रहावें।
पडल्या सहावे कष्टही।। आचारहीन शीलभ्रष्ट।
विचारहीन कर्म नष्ट। देखेना जो इष्टानिष्ट।
केवीं ती अभीष्ट पावेल।। लाग्या बांध्यावीण विशेषीं।
कोणीन येई आपुले पाशीं। श्वान सुकर कां माशी।
हडहड कुणाशी करुं नये। येथून पुढे भक्तिभावा।
करावी याने माझी सेवा। करुणा येईल देवाधिदेवा।
अक्षय ठेवा लाधेल। मग ही पूजा करावी कैसी।
मी कोण कैसा जाणावा भरंवसी। साईचा तो देह विनाशी।
ब्रह्म अविनाशी सुपूज्य।। मी ती अष्टधा–प्रकृतिरुपाने।
भरली आहें चौबाजूनें। हेंच अर्जुनास भगवंतानें।
गीताख्यानानें निवेदिलें।।
यावन्नामरुपाकृति। स्थावर–जंगमात्मकही जगती।
मीच नटलों अष्टधा प्रकृति। ही एक चमत्कृती माझीच।।
ॐ प्रणव हा माझा वाचक। वाच्य तयाचा मीच एक।
विश्वाकार वस्तु अनेक। त्यांतही मी एक भरलेला।।

आत्मभिन्न वस्तु नाहीं। तेथें कामना कशाची पाहीं।
मीचि अवघ्या ठायीं ठायीं। भरलों दाही दिशांतीं॥
परिपूर्ण सर्वत्र येणे भावें। मी माझे हे जेथ विरावें।
तया कामनिय काय असावें। सर्वी बसावे सर्वस्वीं॥
कामना या बुध्दींत उगवती। आत्मयासीं संबंध न धरिती।
साईमहाराज निजात्ममूर्ति। कामना स्फूर्ति तेथें कैची॥
कामनांचे नाना प्रकार। मी कोण हें कळतांचि सार।
विरोनि जाती जैसी गार। रविकर निकर संतप्त॥
मनबुध्दयादि इंद्रियांसकट। नव्हे मी स्थूल ना विराट।
नव्हे मी हिरण्यगर्भ अप्रकट। साक्षी मी जुनाट अनादि॥
एवं गुणइंद्रियापरता। नाहीं मज विषय तत्परता।
नाहीं मजवीण ठाव रिता। कर्ता करविता मी नव्हे॥
मनबुध्दयादि इंद्रियगण। अवघा जडही जेथें ओळखण।
तेथेंच विरक्ति प्रकटेल जाणा। सारील आवरण ज्ञानाचें।
स्वरुपाचें जें विस्मरण। मायेचें अवतरण।
शुद्ध पूर्णानंद स्मरण। तोच मी चैतन्याघनरूप॥
त्या मजकडे फिरविणें वृत्ति। तीच सेवा तीच 'मद्‌भक्ति'।
चिदानंद मी होतां प्रतीती। शुध्द स्थिती तें 'ज्ञान'॥
अयमात्मा ब्रह्म। प्रज्ञानमानंदं ब्रह्म।
जगन्मिथ्यत्वें जगद्‌भ्रम। सत्यत्वें ब्रह्म तो हा मी॥
नित्य शुध्द बुध्द मुक्त। वासुदे S मोमन्वित।
सत्य श्रध्दाभक्ति सहित। पूजन स्वहित हें माझें॥
ऐसे मी कोण ते समजून। करावें माझे यथार्त पूजन।
वरी व्हावे अनन्य शरण। जावें समरसून मजमाजीं॥
नदी जाता समुद्रा शरण। येईल कां ती पुन्हां परतोन।
उरेल कां वेगळे नदीपण। देतां आलिंगन अर्णवा॥
स्नेहयुक्त कार्पासवाती। भेटू जातां दीपक ज्योती।
स्वयें पावे दिव्य दीप्ती। तैसीच गती संतपदीं।
अल्लामालिक चैतन्य घन। यावीण चित्ता नाहीं चिंतन।
शांतनिरपेक्ष समदर्शन। तयाचें मीपण तें कैचें॥
निर्ममत्व निरहंकृती। निर्द्वंद्वत्व निष्परिग्रहस्थिती।
याही चार गुणांची जै वस्ती। मीपण स्थिती तैं कैची॥
तात्पर्य हे आठही गुण। साईआंगी असतां संपूर्ण।
मीपणास तैं कैचें स्थान। रोवूं मीपण तें कैसें॥
विश्विं भरलें जयाचें मीपण। तयाचाच अंश माझेंही मीपण।
करावें साईपदीं समर्पण। हीच संपूर्ण मम सेवा॥

माझी सेवा माझें भजन। अनन्यपणें मजसी शरणं।
तो होय मद्रूप जाण। भगवंत वचन भागवतीं।।
कीटकीसही भ्रमरध्यान। तेणें ती लाधे भ्रमरपण।
शिष्यही करितां निजगुरुभजन। निजगुरुसमान तो होय।।
समान शब्दें जें वेगळेपण। तेंही न साहे गुरु एक क्षण।
गुरुत्व नव्हे शिष्यावीण। शिष्याचा अभिन्न गुरुपण।।

— अ. ३रा

७

कुठेंही असा कांहींही करा। एव्हढे पूर्ण सदैव स्मरा।
कीं तुमच्या इत्थंभूत कृतीच्या खबरा। मज निरंतरा लागती।।
येणे निदर्शित ऐसा जो मी। तोच मी सर्वांच्या अंतर्यामी।
तोच मी हृदयस्थ सर्वगामी। असें मी स्वामी सकळांचा।।
भूतीं सबाह्याभ्यांतरीं। भरुनि उरलों मी चराचरीं।
हें सकळ सूत्र ईश्वरी। सूत्रधारी मी त्याचा।।
मी सकळ भूतांची माता। मी त्रिगुणांची साम्यावस्था।
मीचि सकलेंद्रिय प्रवर्ता। कर्ता धर्ता संहर्ता।।
लक्ष लावी जो मजकडे। नाहीं तयास कैचेंही सांकडें।
तोच माझा जैं विसर पडे। माया कोरडे उडवी तैं।।
दृश्यजात हें मत्स्वरुप। कीड मुंगी रंक भूप।
हें स्थिर जंगम विश्व अमूप। हेंचि निजरुप बाबांचे।।

— अ. ३रा

क्रमश:

## श्रीमती थोरात साईचरणी विलीन

श्री साईबाबा संस्थानचे एका काळचे एक विश्वस्त श्री. रावसाहेब थोरात यांच्या सुशील पत्नी श्रीमती द्रौपदाबाई यांचे गुरु, ता. १७ सप्टें. ८७ रोजी दादर, मुंबई मुक्कामी वयाच्या ७८ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या पश्चात एक कन्या व दोन चिरंजीव आहेत.

श्री साई मृतात्म्यास चिरशांती व सद्गती देवो.

# तुमचे श्रीसाईबाबांविषयक सामान्यज्ञान किती आहे?

(पुढीलपैकी पाच प्रश्नांची उत्तरे बरोबर देता आल्यास तुमचे सामान्यज्ञान बरे, सातांची बरोबर देता आल्यास चांगले व सर्वच्या सर्व बरोबर देता आल्यास उत्तम समजावे.)

१) साईबाबांच्या लाडक्या घोड्याचे नाव........ हे होते.
अ) बिजली ब) शामसुंदर क) कृष्णकुमार ड) गुरुसागर

२) ........ हे बाबांचा लाडका भक्त शामा याचे खरे नाव होय.
अ) नाना निमोणकर ब) लक्ष्मण भट क) काका महाजनी ड) माधवराव देशपांडे

३) साईमहाराजांनी रक्तपिती झालेल्या.......... या महारोग्याची जातीने सेवा केली.
अ) भागोजी शिंदे ब) हनुमान प्रसाद जोशी क) बडे बाबा ड) आनंदराव पाखाडे

४) ........... श्री साईना नियमित भाकऱ्या करून देत असे.
अ) लक्ष्मीबाई ब) बायजाबाई क) गोखलेबाई ड) तर्खडबाई

५) "मी आपणाकडे आज भोजनास येईन असे श्रींनी हेमाडपंताना ......... दिवशी पहाटे स्वप्नात येऊन सांगितले.
अ) गुरुपौर्णिमा ब) राखी पौर्णिमा क) होळी पौर्णिमा ड) वटपौर्णिमा

६) श्रीसाईंची.......... बरोबर कुस्ती झाली होती.
अ) रामगीरबुवा ब) बडेबाबा क) मोहिद्दीन ड) डेंगळे

७) "वाहवा नवरदेव, सजलासी की आता "असे बाबा.... म्हणाले.
अ) दासगणूंना ब) नूलकरांना क) बाळाशिंपीस ड) धरमसी जेठाभाईना

८) ...... यांनी शिरडीश्वराला देण्यासाठी पुंडलिकरावाजवळ एक नारळ दिला होता.
अ) अक्कलकोट स्वामी ब) वासुदेवानंद सरस्वती क) गजानन महाराज ड) सोमदेव सूरी

९) ....... हे बाबांचे मुख्य बसण्याचे ठिकाण होय.
अ) लेंडीबाग ब) गुरुस्थान क) चावडी ड) द्वारकामाई

१०) श्रीसाईंनी नऊ रुपये दक्षिणा......... ला दिली.
अ) गोदावरीमाता ब) बायजाबाई क) लक्ष्मीबाई ड) राधाकृष्णी

११) श्री साईबाबांचे निर्वाण........ ऑक्टोबर १९१८ रोजी झाले.
अ) २ ब) १५ क) २५ ड) २६

१२) श्रीसाईंची समाधी आज ......... वाड्यात आहे.
अ) बुटी ब) नवलकर क) साठे ड) दिक्षित

— सदानंद चेंदवणकर


**उत्तरे**

१) ब २) ड ३) अ ४) ब ५) क ६) क ७) अ ८) ब ९) ड १०) क ११) ब १२) अ

# साईदरबारातील माणिक आणि मोती-४
# गुजराती ब्राह्मण मेघा

**सौ. विभावरी ज. राणे**
अस्मिता दर्शन, ४०३/४,
तेली गल्ली, अंधेरी (पूर्व),
मुंबई- ४०० ०६९.

साठेसाहेब नावाचे खेड जिल्ह्याचे एक मोठे अधिकारी होते. साठेसाहेब जिथे राहात तिथे मेघा नावाच्या ब्राह्मणाशी त्यांची ओळख झाली. हा ब्राह्मण साठेसाहेबांकडे नोकरीला होता. साहेबांनी गुजराती ब्राह्मण मेघा याची तिथे असलेल्या शंकराच्या देवस्थानाची पूजा करायला नेमणूक केली. मेघा ब्राह्मण पहिल्यापासूनच शिवभक्त होता. शंकराशिवाय तो कुठचाही देव मानीत नसे. त्याचे आपले एकच म्हणजे ॐ नमः शिवाय.



मेघा एका पायावर उभा राहून बाबांची आरती करीत आहे.

एकदा साठेसाहेब शिरडीला आले. साहेब सुद्धा साईबाबांचे एकनिष्ठ भक्त होते. साईबाबांना पाहिल्यावर त्यांचे मन प्रसन्न झाले. त्यांना वाटले, आपण येथे एक निवासस्थान बांधायचे व त्याप्रमाणे त्यांनी शिरडीत पहिले निवासस्थान बांधले. त्याचप्रमाणे साईबाबांना गंगेचे पाणी आणून आंघोळ घालावी, असे वाटत होते. पण त्यांच्या कामाच्या जबाबदारीमुळे त्यांना वेळ मिळत नव्हता.

नंतर साहेब घरी आले आणि आपल्या नोकराला म्हणजे मेघा याला म्हणाले, मेघा

तू शंकराची मनोभावे पूजा करतोस त्यामुळे मी अगदी भारावून गेलो आहे. तेव्हा तू आता शिरडीला माझ्या कामासाठी जा आणि शिरडीच्या साईबाबांना गंगेचे पाणी आणून आंघोळ घाल. हे ऐकल्यावर मेघा ब्राह्मण काहीच बोलला नाही. निस्सिम शिवभक्त असणारा मेघा साठे साहेबांना त्यांची जात विचारतो. पण त्यांच्याबद्दल साहेबांना तशी विशेष माहिती नसते. मग मात्र मेघा ब्राह्मण विचारात पडला. नाही म्हणावे तर नोकरी जाईल व शेवटी शिरडीला जायला तयार झाला. साठ्यांच्या आग्रहामुळे मेघा शिरडीस आला.

मेघा ब्राह्मण मशिदीच्या अंगणात आला आणि सर्वांभूति असणाऱ्या साईनारायणाने उग्र स्वरुप धारण केले. आणि हातात दगड घेऊन मेघाला म्हणाले, खबरदार पायरीवर पाऊल ठेवलेस तर.हे स्थान यवनांचे आहे. तू उच्च कुळातला ब्राह्मण आहेस. मी नीच यवन आहे. तुला माझा विटाळ होईल. तू परत जा. आणि एकंदरित असा प्रकार पाहून मेघा ब्राह्मण भीतीने थरथर कापू लागला. व त्याला वाटले,ना तारायंत्रे ना टेलिफोन आणि माझ्या अंतरीचे बोल या साईबाबांना कसे काय समजले. आणि गुरु व शिष्य यांची ओळख अंतःर्मनाने पूर्ण झाली. काही दिवस तिथे राहून मेघा ब्राह्मण घरी खेड जिल्ह्यात आला आणि अतिशय तापाने आजारी पडला. पण त्याचे सर्व लक्ष्य शिरडीला बाबांकडेच लागले होते. केव्हा एकदा शिरडीला जाईन आणि त्या साईनाथाचे पाय धुवीन, असे त्याला झाले होते. मेघा ब्राह्मण पुन्हा शिरडीला आला आणि शंकराशिवाय कोणालाही न मानणाऱ्या मेघाची साईबाबांवर पूर्ण श्रध्दा बसली व तो साईबाबांनाच साईशंकर मानू लागला.

शंकराला बेलाची आवड म्हणून तो कोस दिड कोस पायी चालून बेल घेऊन येई आणि आपल्या साईशंकराची पूजा करी. मेघा शिरडीत असेपर्यंत दुपारची आरती तो नेहमी करीत असे. मकरसंक्रांतीचे दिवशी मेघाच्या मनात बाबांना गोदावरीचे पाणी आणून स्नान घालण्याचे आले व त्याने बाबांकडे तशी इच्छा प्रकट केली. बाबा म्हणाले, तुझ्या इच्छेस येईल तसे कर. साईबाबांची आज्ञा मिळताच मेघा ब्राह्मण घागर घेऊन पाण्यासाठी निघाला. आठ कोसावरुन पाणी आणायचे म्हणजे किती त्रास पडेल, याचा त्याने विचारच केला नाही आणि तो पाणी घेऊन आला.

साईबाबा त्याला म्हणतात,"मला फकिराला गंगास्नान कशाला?" त्यावर मेघा ब्राह्मण म्हणतो, "गंगेच्या पाण्याने शंकराला मकरसंक्रांतीचे दिवशी आंघोळ घातल्याने मला आनंद होतो". आपल्या भक्ताची मनिच्छा पाहून साईबाबा आंघोळीसाठी ठेवलेल्या पाटावर बसले. मेघाने हरगंगा म्हणून सर्व घागर त्यांच्या डोक्यावर ओतली आणि मेघाला अतिशय आनंद झाला व म्हणाला माझ्या शंकराने परिपूर्ण आंघोळ केली. पण पहातो तर फक्त बाबांचे शिर तेवढे ओले होते. त्याचे त्याला आश्चर्य वाटले. अशा प्रकारे बाबा आपल्या भक्तांचे लाड आपण पुरवित. मेघा एका पायावर उभा राहून बाबांची आरती करीत असे.

अशीच एक दुसरी गोष्ट साईबाबा आपल्या भक्तावर कसे प्रेम करतात. हे दाखवणारी. एकदा मेघाला कै. नानासाहेब चांदोरकर यांनी एक मोठी बाबांची प्रतिमा

दिली होती. त्या प्रतिमेचे पूजन मेघा वाड्यात नेहमी मनोभावे करीत असे. मशिदीत प्रत्यक्ष मूर्ति व वाड्यात प्रतिमा या दोहोंची अहोरात्र पूजा व आरती मेघा करीत असे. एकदा असेच मेघा पहाटे झोपेत असतेवेळी बाबांनी त्याच्या बिछान्यावर अक्षता टाकल्या व सांगितले, मेघा त्रिशूळ काढ आणि तेथून ते गुप्त झाले. मेघाला आश्चर्य वाटले. सर्व दारे बंद आणि महाराज आत कसे आले. त्यावर बाबा म्हणतात, मी निरंतर सगळीकडे असतो. मला आतमध्ये यायला दरवाजा लागत नाही. माझ्यावर जो भार टाकतो, त्याचे सर्व व्यवहार मीच चालवतो. मेघाने बाबांच्या सूचनेप्रमाणे लाल रंगाचा त्रिशूळ बाबांच्या प्रतिमेकडे काढला.

दुसऱ्याच दिवशी पुण्यावरुन रामदास नावाचे भक्त शंकराचे लिंग घेऊन बाबांकडे आले. ते लिंग साईबाबांना अर्पण करुन आनंदाने त्यांनी नमस्कार केला. तेवढ्यात मेघा तिथे आला आणि बाबा त्याला म्हणाले, "याला तू आता सांभाळ." हे पाहून मेघा ब्राह्मणाच्या डोळ्यांतून आनंदाश्रू वाहू लागले. ते लिंग मेघाने मशिदीतून वाड्यात आणले व त्रिशूळाशेजारी स्थापन केले. अशा प्रकारे शिवभक्त मेघाला साईशंकराने त्रिशूळ आणि लिंग यांची स्थापना करुन दिली. शिरडीत गुरुस्थानी मंदिरात असलेले शिवलिंग मेघाने स्थापन केलेले आहे.

साईभक्त मेघा शुक्रवार दि. १९-१-१९१२ रोजी शिरडीतच निधन पावला. त्याचा पार्थिव देह अंत्यसंस्कारासाठी सकाळी बाहेर काढला, त्यावेळी श्री साईबाबा तिथे जातीने हजर होते. त्यावेळी मोठमोठ्याने त्यांनी शोक प्रदर्शन केले. त्यांचा त्यावेळचा शोकप्रदर्शन आवाज एवढा हृदयस्पर्शी होता की तो ऐकून तिथे हजर असलेल्या प्रत्येकाच्या डोळ्यात पाणी उभे राहिले. गावाच्या मुख्य रस्त्याच्या वळणापर्यंत त्याच्या प्रेतयात्रेबरोबर बाबा गेले होते आणि मग ते आपल्या नेहमीचे मार्गाने परत गेले. मेघाचा पार्थिव देह एका वटवृक्षाखाली ठेवला गेला आणि मग तिथे चिता रचून मंत्राग्नी दिला गेला. बाबांच्या दु:खाचे आर्त स्वर त्यावेळी लांबूनही चांगलेच ऐकू येत होते. मेघाच्या अखेरच्या क्षणाला निरोप म्हणून ते आपला हात हालवीत होते. जसे आरतीच्या वेळी ते हात हालवीत अगदी तसेच दिसत होते. कोरड्या इंधनाचा साठा भरपूर होता म्हणूनच की काय शवाला दिलेला अग्नी चांगलाच लवकर पेटला, व ज्वालाही लवकरच उंचावल्या. खापर्डे, बापूसाहेब जोग, उपासनी, दादा केळकर इ. तत्कालीन बडी मंडळी मेघाच्या अंत्ययात्रेला हजर होती.

धन्य तो बाबांचा परमभक्त मेघा.

# श्री. खापर्डे यांची शिरडी दैनंदिनी

- साईनंद

सोमवार, ता. २२–१–१९१२

आज सकाळी मी लवकर उठलो आणि ध्यानाला बसलो. आम्ही साईमहाराजांना बाहेर पडताना व ते पुन्हा परतताना पाहिले. आज पूजेच्या वेळी त्यांनी आपल्या दोन्ही नाकपुड्यात दोन फुले खोचली होती. आपल्या दोन्ही कानावर दोन फुले खोचली होती व एक त्यांच्या मस्तकावर होते. या गोष्टीकडे माधवराव देशपांडे यांनी माझे लक्ष वेधले. मला वाटते, ही काही तरी सूचना असावी. पण महाराजांनी हीच गोष्ट पुन्हा एकदा दिवस भरात केली. मी त्यांना याबाबत दुसऱ्या वेळी काहीतरी विचारणार तोच त्यांनी मला चिलीम दिली आणि मग माझे विचार मनातल्या मनातच राहिले. पुढे बाबा असे काहीतरी म्हणाले, मी काही गोष्टी ताबडतोब लक्षात ठेवण्याचा यत्न करतो. खरोखरच त्या प्रामुख्याने त्या लक्षात म्हणून राहाव्यात पण काय की कुणास ठाऊक त्या मी साफ मनापासून विसरुन जातो आणि मग मी दिवसाकाठी त्या पुन्हा आठवण्याचा प्रयत्न करतो खरं. पण सारे यत्न निष्फळ ठरतात. बाबांचे तोंडून असे ऐकण्याचा हा माझा अगदी पहिलाच अनुभव होता. याचे मला खरोखरीच आश्चर्य वाटले. साईबाबा आणखीन म्हणाले की, माझा आदेश हा निर्वाणीचा होय आणि म्हणूनच मी समजून चुकलो की, मला आता माझ्या मुलाच्या प्रकृतीची विशेष काळजी करावयास नको.

दरम्यान माध्यान्ह आरती झाली आणि आम्ही परतलो. मला असे दिसून आले की, सौ. लक्ष्मीबाई कौजलगी (मावशीबाई नावाने ओळखली जात होती ती) ही माझ्या निवासस्थानासमोर उभी आहे. तिला पाहून मला आनंद वाटला. श्री साईमहाराजांना नमस्कार करुन मशिदीतून परतलो आणि ती येथे येऊन पोचली होती. साईमहाराजांनी तिच्या भक्तीबद्दल तिजवर खास कृपा केली होती. भोजनानंतर मी काही मिनिटे विश्रांती घेतली आणि दीक्षितांनी रामायण व नाथमहाराजांच्या काही गाथांचे वाचन केले. उपासनीही तिथे हजर होते आणि लक्ष्मीबाई कौजलगीही हजर होत्या. तिनेही आमच्या संभाषणात भाग घेतला. वेदांताबद्दल तिला चांगलीच माहिती होती, असे त्यावरुन दिसून आले. आम्ही साईमहाराजांना सायंकाळच्या रपेटीच्या वेळी व पुन्हा शेजारतीचे वेळी पाहिले. लक्ष्मीबाईंनी काही गाणी म्हटली. ती राधा कृष्णाबाईंची मावशी होय. रात्री माझ्या विनंतीवरुन तिने थोडेसे भजनही केले आणि दीक्षितांनी रामायण वाचनाचा कार्यक्रम केला.

# श्री साई आणि भक्तीच्या नवविध भूमिका

– **श्री. चकोर आजगांवकर** एम.ए.
उपसचिव शिक्षणखाते, महाराष्ट्र राज्य
वाय् ११/१७० सरकारी वसाहत,
वांद्रे (पूर्व), मुंबई–४०० ०५१.

**नवविधा भक्ती**

देव व भक्त यांत एक नाते असते. उपास्य दैवत व उपासक यांत एक सुंदर मानसिक भूमिका असावी लागते. या भूमिकेस भक्तीचा पैलू म्हणतात. असे भक्त व उपासक यांच्या भूमिकांचे नऊ प्रकार वा नऊ पैलू आहेत. भक्ती ही अनेक अंगी, अनेक रुपी असते. भक्ताची नाती जशी बदलत जातात, तशी भक्ती नवविध भूमिकांत प्रकट होत. श्री साईभक्तीची अशीच नवविध रुपे आहेत.

**दास्य भक्ती**

कधी भक्त देवाचे दास्य पत्करतो. सारे तनमनधन व जीवित प्रभूचरणी समर्पण करतो. देवाच्या आज्ञेत वागावयाचे एवढाच त्याचा जीवन हेतू उरतो. ही दास्य भक्तीची परमोच्च व परमसुंदर भूमिका श्री हनुमंतानी रामरायापुढे धारण केली होती. देव व भक्त यांचे 'अद्वैत'एवढे की एकाच्या मनातील तरंग दुसऱ्याच्या अंतरी उमटावयाचे. भक्ताने प्रभूच्या मनातील सूक्ष्म इच्छाही तात्काळ पुरी करावयाची! ही दास्य भक्तीची भूमिका अनन्य भक्तीची, शरणभावाची व अलौकिक समर्पणाची असल्याने अद्वितीय ठरते. **यात प्रेम उत्कटतेला पोहोचलेले असते.**

**सख्यभक्ती**

दुसरी भूमिका सख्यभक्तीची. ईश्वराशी भक्त इतका मन, बुद्धी, भावना व अहंकार यातून एकरुप होतो की, देवावाचून त्याला क्षणभरही करमत नाही. आपल्या जीवनरथाच्या सारथी पदावर भक्तरुपी अर्जुन आपल्या साईरुप भगवंताला बसवितो. त्याच्या आदेशाने, प्रेरणेने, जीवनाची गाडी प्रारब्धाच्या मार्गावर चालू देतो. जीवनाच्या नौकेचे सुकाणू साईरुप प्रभूच्या हाती सोपविल्यावर, भक्ताच्या योगक्षेमाची, रक्षणाची, सन्मार्ग अविचल चोखाळून मुक्तीपंथाकडे पोहोचविण्याची जबाबदारी प्रभू स्वतःच स्वीकारतात. **यांत सबुरी म्हणजे तितीक्षेचा परमोच्च बिंदू गाठण्याची सुसंधी असते**

**आत्मनिवेदन भक्ती**

तिसरी भक्ती आत्मनिवेदनाची! परमेश्वराच्या अस्तित्वावरची, साक्षित्वावरची व सामीप्याची या भक्तिभूमिकेत उत्कट व सखोल श्रद्धा असते. परमेश्वराला प्रत्येक गोष्ट सांगितल्यावाचून, सर्व कर्मांचे व ईच्छा आकांक्षाचे प्रभूला निवेदन केल्यावाचून भक्त कोणताही व्यवहार करु शकत नाही. त्यामुळे त्याचे अहंकर्तृत्व वा अहंकार गळतो. त्याची अस्मिता परमेश्वराशी समता पावते. त्याची वैखरी प्रभूच्या चरणीची गंगा बनते. **यामुळे उत्कट श्रद्धा निर्माण होते आणि संचित, प्रारब्ध, क्रियमाण यातून**

सुटका मिळण्याचा दरवाजा उघडतो.

**सख्य, दास्य आत्मनिवेदन भूमिका**

या भक्तिभूमिकांतून भक्ताला **सामीप्य, सालोक्य, सारुप्य, व सायुज्य** अशी चार मुक्तीच्या वाटांचे मर्म समजू लागते व तो परमार्थाच्या मार्गावरील योग्य पाऊल उचलू लागतो. स्मरण, चिंतन, श्रवण, कीर्तन, वंदन व अर्चन अशा इतर सहा भक्ती भूमिकाही महत्त्वाच्या असल्या तरी वरील तीन भूमिका या प्रत्यक्ष व्यवहारोपयोगी (applied) आहेत. इतर सहा भूमिका तुम्हाला परमेश्वराशी अभिमुखता (orientation ओरिएंटेशन) प्राप्त करुन देतील. **सख्य, दास्य,** व **आत्मनिवेदन** भक्तीमध्ये श्रद्धा, निश्चय, सोशिकता, प्रत्यक्ष प्रेममय कृती अशी प्रभावी वास्तव व व्यवहारात उतरु शकणाऱ्या कृती सामावलेल्या आहेत. भक्ती भावनेला मन, बुद्धी, शरीर, अहंकार व आत्मा यामध्ये रुजविताना या तीन भूमिकांचा मोलाचा उपयोग होतो. भक्ती केवळ मनावर बिंबत नाही, तर कृतीत आविष्कृत होते. **कृतीत प्रगट झालेली प्रखर व उत्कट भक्ती भावना ही चिरंजीव व चिरस्थीर होते. तिच्यात वेधशक्ती निर्माण होते.** वेध शक्ती असलेली भक्ती ही साधनेतील फार उच्च व महत्त्वाचा टप्पा असतो.

**लीलामय प्रभुसाईंचे प्रगटीकरण**

परिणामी साईरुपप्रभूचे लीलामय कृष्णस्वरुप व्यवहारात प्रगट होते. देवाला व्यवहारात आणणाऱ्या या तीन भक्तीभूमिकांचे रहस्य व मर्म सर्वांनी ध्यानात ठेवल्यास माझ्या या लेखन प्रपंचाचे सार्थक होईल.

- "**श्रीसाईगीतायना**"च्या काव्य पंक्तीत लेख संपवितो. बाबा म्हणतात :—

  **"रंगतात मम नामी**
  **गुंगतात मम प्रेमी**
  **भक्त ते अनन्य मला प्राणाहून प्यार ।"** (श्रीसाईगीतायन)

- बाबांचे प्रेम साम्राज्य श्रद्धा व सबुरीत आहे, प्रेम आणि तितीक्षेत आहे :—

  **"साम्राज्य हेच माझे — श्रद्धेत सार्वभौम**
  **मी प्रेम चक्रवर्ती — सामंत दिव्यधाम"**
  **"भक्ती, उदंड प्रीती — संसारी या ललाम**
  **प्रेमार्त अंतरात — घे नित्य जन्म राम** (श्री साईगीतायन)

# देव श्रेष्ठ की गुरु श्रेष्ठ

– श्री. हरिश्चंद्र काळू म्हात्रे
चिंचोड्याचा पाडा, ठाकुर्ली,
सुभाष रोड, डोंबिवली (पश्चिम)

आपल्या भारतीय संस्कृतीत गुरु परंपरेला फार मोठे स्थान आहे. फार पूर्वी म्हणजेच वेदकालापासून गुरु परंपरा भारतात निर्माण झालेली आहे. विज्ञान युग असूनसुद्धा गुरु परंपरेचा लोप झालेला नाही, ही विशेष उल्लेखनीय बाब म्हटली पाहिजे. भारतात अनेक जाती-धर्मात अनेक पंथ आहेत. त्या सर्वच पंथांना गुरु परंपरा लाभलेली आहे. गुरु अनेक भेटतात, परंतु सद्‌गुरु भेटणे दुर्लभ.

प्रभू रामचंद्रांनी वसिष्ठांना तसेच भगवान श्रीकृष्णांनी सांदिपनींना गुरु केले होते. अशी ही अनादी कालापासून चालत आलेली गुरु-शिष्याची परंपरा आजपर्यंत अखंडीत चालू आहे. सद्‌गुरु भेटल्यानंतर परमात्म्याची प्राप्ती सहज होते. परंतु सद्‌गुरु देवापेक्षाही श्रेष्ठ असतात. रामदास स्वामी म्हणतात,

गुरु थोर म्हणावा कि देव थोर म्हणावा।
आधी नमस्कार कोणाशी करावा ॥
मनी भाव तो सद्‌गुरु थोर आहे ।
तयाचे प्रसंगी रघुराज पावे ॥

अशा प्रकारे रामदास स्वामींनी देवापेक्षा गुरु थोर असल्याची ग्वाही दिली आहे. ज्ञानेश्वर, एकनाथ, नामदेव व तुकाराम महाराज तसेच आजपर्यंत होऊन गेलेल्या सर्वच संतांनी गुरुचे श्रेष्ठत्व मान्य केले आहे. एकनाथ महाराज सद्‌गुरुबद्दल ग्वाही देतात,

सद्‌गुरु सारिखा असता पाठीराखा ।
इतरांचा लेखा कोण करी ॥

शिरडीचे साईबाबा आपल्या गुरुचे स्थान निंब वृक्षाखाली असल्याचे नेहमी सांगत. त्याची प्रचिती त्यावेळच्या भक्तजनांना आलेली आहे. अशाच एका थोर संताची गुरु श्रेष्ठ कसा, याबाबतची गोष्ट सांगण्याचा अल्पसा प्रयत्न करणार आहे.

आपल्या महाराष्ट्रात 'नामदेव महाराज' नावाचे थोर संत होऊन गेले. लहानपणापासून नामदेवा बरोबर देव जेवत असत. देव आपल्या बरोबर जेवतो व बोलतो, याचा कालांतराने अहंकार नामदेवांना झाला. नामदेवांना झालेला अहंकार मुक्ताबाईंच्या लक्षात आल्यावर, त्या नामदेवांना उद्देशून बोलल्या–

रात्रंदिवस जयाला देवाचा सहवास ।
कां रे अहंकार नाही गेला ॥

त्याचवेळी पंढरपूरात संतांचा मेळावा भरला होता. त्या मेळाव्यात निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई, नामदेव, गोरोबा कुंभार वगैरे थोर थोर संत उपस्थित होते.

त्यावेळी संतांची परीक्षा घेण्याचे ठरले. गोरोबा कुंभार सर्वात वयस्कर, तसेच ज्ञानी होते. त्यांना सर्व संत गोरोबा काका म्हणून हाक मारीत. त्यांचा धंदा कुंभाराचा असल्यामुळे मडके तपासण्याची (पारखण्याची) त्यांची हातौटी होती. म्हणून सर्व मंडळींनी कुणाचे मडके कच्चे आहे, ते तपासण्याची कामगिरी गोरोबा काकांवर सोपविली. गोरोबा काकांनी हातात हातोडी घेवून प्रत्येक संताच्या डोक्यावर मारून परीक्षा घेण्यास सुरुवात केली. नंतर नामदेवांवर पाळी आली, तेव्हा ते घाबरुन पळून गेले. नामदेवाचे मडके कच्चे असल्याचे गोरोबा काकांनी संत मेळाव्यात जाहीर केले. आपल्याला कच्चे ठरविल्याबद्दल नामदेवांना अतिशय वाईट वाटले.

संत मेळाव्यात झालेल्या अपमानामुळे नामदेव पांडूरंगाच्या भेटीला मंदिरात गेले. नामदेवांनी घडलेली सर्व हकीकत पांडुरंगाला सांगितली. देवा! तुम्ही माझ्याबरोबर बोलता, जेवता तरी मी कच्चा कसा? असा प्रश्न केला. देवांनी सांगितले, 'नामदेवा, तू अजून गुरु केला नाहीस. तसेच गुरुशिवाय ज्ञान प्राप्त होणार नाही.' देवा, असा सामर्थ्यवान गुरु कोण आहे? मी कोणाला शरण जावू? पांडुरंगाने सांगितले, शंकराच्या मंदिरात 'विसोबा खेचर' नावाचे महान संत आहेत. त्यांना तू गुरु कर.

पांडूरंगाच्या आज्ञेप्रमाणे नामदेव शंकराच्या मंदिरात गेले. मंदिरात जाताच त्यांना आश्चर्याचा धक्का बसला. विसोबा खेचर त्यावेळी पिंडीवर पाय देवून झोपले होते. प्रत्यक्ष पांडुरंगाने गुरु करण्यासाठी ज्यांच्याकडे पाठविले, ते तर खुशाल देवावर पाय ठेवून झोपले आहेत, असे बघून नामदेवांना अतिशय राग आला. आपला राग दिसू न देता, नामदेव विसोबा खेचरांच्या जवळ गेले. नामदेव विसोबा खेचरांना म्हणाले, 'बाबा, आपण शंकराच्या पिंडीवर पाय देवून झोपला आहात! आपले पाय जरा बाजूला करा.' विसोबा खेचर, नामदेवांना म्हणाले, 'बाळ' म्हातारपणामुळे मला शरीराची हालचाल करता येत नाही. तरी तूच माझे पाय शंकराच्या पिंडीपासून बाजूला कर. नामदेवांनी विसोबा खेचरांचे पाय उचलले व बाजूला ठेवले, तर काय आश्चर्य! तेथेही शंकराचे लिंग तयार झाले. नामदेवांनी, विसोबा खेचरांचे पाय गोलाकार फिरविले, त्या सर्व ठिकाणी शंकराच्या पिंडी तयार झाल्या. नामदेवांना, विसोबा खेचरांच्या सामर्थ्याची कल्पना आली. नामदेवांनी त्यांचे पाय आपल्या मस्तकावर धारण केले. त्याचवेळी विसोबा खेचरांनी आपला वरदहस्त नामदेवांच्या मस्तकावर ठेवला. नामदेवांना ज्ञानदृष्टी प्राप्त झाली व चराचर सृष्टीत त्यांना पांडुरंग दिसू लागला.

नामदेव महाराज पुढे महान संत म्हणून प्रसिद्धीला आले. त्यांनी भागवत् धर्माचा प्रसार सर्व भारत देशात केला. विशेष उल्लेखनीय, अभिमानाची गोष्ट अशी की, नामदेव महाराजांचे तीनशे अभंग शिखांचा पवित्र धर्मग्रंथ 'ग्रंथसाहिबा' या ग्रंथात आहेत. याचा प्रत्येक महाराष्ट्रीय माणसाला अभिमान वाटला पाहिजे.

# जय प्रभो साईनाथा

१

जय प्रभो साईनाथा, जय जय प्रभो जगन्नाथा
अनेक मैलांवरुनी मजला तुम्ही हांक देता।।
कुणा गांवचा कुठला मी हा कुठे असे शिरडी
पायाला मम दोरी बांधुनी दिव्य शक्ति ओढी।।
स्वार्थी प्रपंची मग्न राहतां विसरुनी जाण खरी
साईशक्ति ही खेचुनी घेई अपुल्या चरणांवरी।।
मानीत असतां कृतार्थता मी स्वार्थी प्रपंचात
मी कृपाकटाक्षें श्री साईंच्या येतो शिरडीत।।
दर्शनास मी धांवत जातां राहती नेत्र खिळून
तेजोमंगल दर्शन होतां येती डोळे भरुन।।
भारुनी जाई मम जीवात्मा जीवनीं नवजागृती
नेत्र वाहती स्मृति मंजुषी तरंग किती उठती।।

२

जन्मोजन्मींचे पुण्य धांवते भक्ति ज्योत फुलते
दिव्य ज्योत श्री साईचरणी दृष्टिपुढे दिसते।।
श्रध्दा अंतःकरणी ठेऊनी चरणी लीन होता
साईकृपेचा वरदहस्त हा राही जणुं फिरता।।
श्री साईंच्या तेजाचा तर घडला साक्षात्कार
तेच उचलती संसाराचा सारा माझा भार।।
साईचरणीं जीव हा जडला मिळे मला प्रेरणा
सातत्याने सदैव लाभो हीच पदीं प्रार्थना।।

३

नमितो स्तवितो ध्यातो साई श्रध्देने अंतरी
भक्ति सुबुध्दी सुगुण मज द्या प्रार्थितसे श्रीहरी।।
विघ्ने हरुनी सुकिर्ती यश द्या मजला बलशक्ति
तव कृपेने सदैव लाभो प्रपंची सुख शांती।।

**- श्री. दा. र. दळवी**
जे. एन. ३, बिल्डिंग नं. २३,
सेक्टर नं. १०, वाशी, नवी मुंबई— ४०० ७०३

# श्री साईबाबांनी रक्षण केले

**कै. श्री. वसंत वामन प्रधान**
श्री. गणाधीराज को. ऑ. हाऊसिंग
सोसायटी लि., बि. नं. २, ब्लॉक नं. ९२
मिठागर रोड, मुलुंड (पूर्व), मुंबई-४०० ०८१.

१० मे १९८७, रविवार सकाळ, सुट्टीचा दिवस असल्यामुळे सारे घरीच होते. घरचे सर्व व्यवहार सावकाश चालू होते. माझी धाकटी सून सकाळी आंघोळीकरिता बाथरुममध्ये गीझरचे बटन चालू करुन पाठमोरी झाली व एका क्षणात मोठा प्रकाश पडून गीझरच्या भोवती आग लागली, ती बाहेर कंपाऊंडमध्ये खेळणाऱ्या मुलांना खिडकीच्या काचांमधून दिसली. माझी सून गोंधळली व ओरडली, कुणीतरी मेन स्वीच बंद केला व पुढील दुर्घटना टळली. जर तिने गीझरचे बटण बंद करण्याचा वा इतरत्र नळाला स्पर्श केला असता तर किंवा बाथरुमचा दरवाजा अगोदर बंद केलेला असता तर काय घडले असते! कल्पनाच करवत नाही. त्या एका क्षणात आम्ही श्री साईबाबांना कळवळ्याची हाक मारली. माझी सून आंघोळ केल्यावर रोज एक श्री साईसत्‌चरित्राचा अध्याय वाचते. आम्ही सर्वच रोज एक अध्याय वाचतो. गेली नऊ वर्षे सतत वापरांत असलेला निर्दोष गीझर एकाएकी कसा बिघडला? व श्रीसाईकृपेमुळेच प्राण वाचले. आमचे नजरेसमोर तो भयानक प्रसंग आहे. श्रीसाईंच्या कृपेचा हात विद्युत वाहकतेपेक्षाही जलद कार्य करुन दाखविता झाला. श्रीसाईश्रद्धेवर आमचे जीवन व्यतित होत आहे. दुसरी घटना १९८४ डिसेंबर अखेरची आहे. माझ्या वृद्धत्वामुळे आता मला कुणाच्या तरी आधारे शिरडीस जावे लागते. हृदयविकाराने काही प्रमाणात मी आजारी असल्याने सावधगिरीने दैनंदिन व्यवहार करावे लागतात. कवी लेखक अधिवेशनाकरिता मी निघालो होतो. संस्थानच्या आदेशाप्रमाणे मी एक दिवस अगोदर संमेलन पूर्व जावयास हवे होते. परंतु मी माझ्या जावयाच्या रजेच्या सोयीप्रमाणे शिरडीत संस्थेने ठरवून दिलेल्या दिवसापेक्षा एक दिवस आणखी अगोदर दाखल झालो, अर्थात संस्थेच्या नियमाप्रमाणे त्या एका दिवसाकरिता मला राहण्यास जागा मिळणे शक्य नव्हते. (कवी, लेखक यांकरिता राखून ठेविलेली जागा.) मला माझे जावई व मुलगी या समवेत मिळणाऱ्या जागेत त्यांच्याबरोबर जाणे भाग होते. परंतु बेसुमार गर्दीमुळे हॉल संपूर्ण भरला होता. एकही लॉकर शिल्लक नव्हता. मी व माझी नातवंडे हॉलमध्ये संडासाजवळ पाणी सांडलेल्या जागेत जेमतेम आश्रय मिळविला होता, व चिंतातूर अवस्थेत निवारा कसा मिळेल या विवंचनेत होतो. माझ्या जावयाची जागा मिळविण्याकरिता धावपळ व खटपट चालू होती, व सर्वसाक्षी बाबा ते पहात होते. माझे जावई रेल्वेत ऑफिसर असल्यामुळे त्यांना बायको व मुले यांचेकरिता पहिल्या वर्गाचा रेल्वेचा फ्री पास होता. मी व सौभाग्यवती असे आमचे दोघांचे सेकंड क्लासचे दादर नागपूर गाडीचे रिझर्व्हेशन केले होते. माझी मुलगी, जावई व तीन नातवंडे केवळ माझ्या आग्रहामुळेच पहिल्या वर्गात बसले. लहान मुलांची अकारण

गैरसोय होवू नये व प्रवासाची मौज त्यांना उपभोगिता यावी हा उद्देश. मधूनच गाडी स्टेशनवर थांबल्यावर माझे जावई आमची विचारपूस करीत असत. माझा मोठा मुलगा दादर स्टेशनवर आम्हाला गाडीत बसविण्यास आला होता. गाडी सुटण्यास काही वेळ बाकी होता, म्हणून तो सहज प्लॅटफॉर्मवर फिरत होता, इतक्यांत त्याला कुणीतरी श्रीसाईबाबांचा फोटो भेट दिला व तो फोटो घेवून माझेकडे आला व म्हणाला, आताच मला हा फोटो कुणीतरी दिला, तो तुमच्याबरोबर असू द्या. मित्रहो, मी व माझी वृद्ध पत्नी प्रवास कसा झेपेल या विवंचनेत असताना श्रीसाईबाबा फोटोच्या माध्यमात आमचे बरोबर असणे ही घटनाच रोमांचकारी होती. मला आठवले की, 'जेथे जातो तेथे माझा तू सांगाती, चालविसी हाती धरोनिया,' लगेच मनात आले श्रींच्या सहवासात आता अडचण कसली, जागा रहाण्यास मिळणारच, मी मनाने निश्चिंत झालो. रात्री नऊ वाजता शिरडीस पोहोचल्यावर सर्व रस्ते भक्तांनी भरलेले, रस्त्यामध्येच अनेक झोपलेले व वर वर्णन केलेली आमची अवस्था. आमची सर्व मंडळी निवाऱ्यासाठी हवालदील झालेली. अशा अवस्थेत आमच्या जावयानी शेवटचा प्रयत्न करुन पाहिला. शिरडी संस्थानचे मॅनेजर यांना भेटून ते म्हणाले, माझे सासरे हार्ट पेशंट असून ते लेखक कवी आहेत. संमेलनासाठी ते आमचे मुळे एक दिवस अगोदर नियोजीत दिवसापेक्षा येथे आले आहेत, तरी त्यांची काही तरी सोय करा. मॅनेजर ताबडतोब म्हणाले, आम्ही त्यांची जागा त्यांचे नावे राखून ठेविली आहे. भक्तनिवासात तळमजल्यावर जा. ही किल्ली घ्या. त्यांना जिना चढावा लागणार नाही. अशा रितीने निवांत सुस्थीर अवस्थेत श्री साईमाऊलीने आम्हाला नेवून ठेविले. अभिषेक, पूजा यथासांग घडून अतिशय आनंदात आम्ही तेथे पाच दिवस राहिलो. श्री साईबाबांचे ठिकाणी अनन्य श्रद्धा व सबूरी असावी.

## श्री. वसंतराव प्रधान साईचरणी विलीन

मुलुंड येथील साईभक्त व साईलीलाचे एक लेखक व कवी श्री. वसंत वामन प्रधान हे १०-९-८७ रोजी संकष्टी चतुर्थीस सायं. ७-४५ वा. वयाच्या ७६व्या वर्षी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने साईचरणी विलीन झाले.

वयाच्या ८ व्या वर्षांपासून त्यांनी साईभक्तीला सुरुवात केली. संत दासगणू महाराजांना त्यांनी भक्त केले होते. बाबांच्या अपार भक्तीने त्यांनी लेख व कवितां द्वारे सेवा केली.

त्यांच्यामागे पत्नी, दोन मुलगे, सूना, विवाहीत कन्यका, नातवंडे व असंख्य साईपरिवार आहे.

श्री साई मृतात्म्यास चिरशांती व सद्‌गती देवो.

# साईचरणी प्रार्थना

बाबा, येऊ दे मज ऐसे मरण
दिसू देत मज साईचरण
लागो मज साई दर्शनाचा ध्यास
नसावी मनी अन्य कोणतीही आस
साईच दिसो अवती भवती
ऐसी बाबा करा चमत्कृती
ऐकू यावेत मज साईबोल
गढून जावे मी साईत सखोल
तुटावी सर्व मोह–माया बंधनं
जावे मी साईस पूर्ण शरण
करावे सर्वस्व साईचरणी अर्पण
मुखाने करावे साई नामस्मरण
माझे उरावे ना कोणतेच रूप
व्हावे मी साईंशी एकरूप
हीच प्रार्थना साई–चरणी
करितसे मी दिन–रजनी

**– कु. नीता मधुकर लिंगरकर**
७/२६८, नंद–दीप,
सायन (पश्चिम),
मुंबई– ४०० ०२२.

# साई ! साई ! साई !

साई माझी माऊली
करविते अमृतपान,
आम्हीच खेळात रमलो
सोडून तिचे ध्यान !

साई माझा पिता
देतसे जीवना आधार,
आम्हीच भरकटत असतो
सोडूनी त्यांचा हात !

साई माझा बंधू
रक्षिती जीवनास,
आम्हीच शोधीत असतो
राखीसाठी हात !

साई माझी बहीण
करावया गुजगोष्टी
आम्हीच पारी बसतो
निंदीत सगळ्यांसी !

साई माझा राम
भोगलासे वनवास,
आम्हीच इच्छितो मुक्ति
भोगूनी राजविलास !

**सौ. प्रतिभा जयकांत दमनिया**
५/टी-६७,
सायन हॉस्पिटल स्टाफ क्वार्टर्स,
सायन, मुंबई-४०० ०२२.

# श्री साईनाथांची थोर कृपा

- श्री. विश्राम ज्ञानू कदम
४२, महात्मा नगर,
सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई-४०००५५.

श्री. राजेंद्र भगवान शिंदे हा माझा परममित्र. याच्या घरी साईबाबांची पहिली ओळख आरतीच्या वेळी मला झाली. त्या वेळेस सन १९६६ साली मी इयत्ता दुसरीत शिकत होतो. दर गुरुवारी संध्याकाळी त्याच्या घरी होणाऱ्या आरतीला मी काहीसा अनियमितपणे हजर राहात असे. आमच्या घरी साईभक्तीचे वातावरण नव्हते. इयत्ता पाचवीत गेल्यावर, आमच्या शाळा बदलल्यामुळे पूर्वीइतके घनिष्ट संबंध राहिले नाहीत, तसेच गुरुवारच्या आरतीला जाणेसुध्दा बंद पडले. परंतु साईबाबांनी माझ्यासारख्या अजाण बालक भक्तावर आपली कृपादृष्टी कायम ठेवली आहे.

१९ एप्रिल १९७८ रोजी माझी बँक ऑफ बरोडा, सेन्ट्रल ऑफिस, मुंबई येथे कारकून म्हणून भरती झाली. त्या वेळेस माझे शिक्षण फक्त इंटर कॉमर्स (पुणे विद्यापीठ) पर्यंत झाले होते. घरच्या परिस्थितीमुळे नोकरी करणे प्राप्त होते, आणि नोकरी करीतच शिक्षण पूर्ण करीत होतो. सन १९७८ च्या दसऱ्याला साईबाबांनी मला स्वतःकडे पुन्हा एकदा खेचून घेतले. त्याचे असे झाले की, आमच्या कॉलनीतील दहा बारा मित्रांबरोबर शिरडीस बाबांच्या पुण्यतिथी उत्सवासाठी जाण्याचे ठरले. त्याप्रमाणे आम्ही शिरडीस बाबांच्या समाधीचे दर्शन घेऊन आलो. या पुण्यतिथी उत्सवापासून शिरडीस जाण्याचा तो एक अलिखित नियमच बनला. माझा दुसरा जिवलग मित्र श्री. विनायक बाबूराव सोनवणे तसेच श्री. राजेंद्र भगवान शिंदे आणि मी स्वतः असे तिघेजण दरवर्षी श्री साईबाबांच्या पुण्यतिथी उत्सवासाठी नियमाने हजर असतो.ही एक श्री साईनाथांची थोर कृपाच होय.

मी नोकरी करीत असताना बी. कॉम. च्या शेवटच्या वर्षाची परीक्षा सन १९८१ च्या मार्चमध्ये दिली. दादरच्या गणेश ॲकॅडमीच्या क्लासला जात होतो. सोबत श्री. अनिल भुसे हा ग्रिण्डलेज बँकेत काम करणारा मित्र होता. तो आणि मी असे दोघे एकत्र अभ्यास करीत असू. परिक्षेच्या निकालाच्या दिवशी असे लक्षात आले की, माझा मित्र पास झाला असून मी नापास झालो आहे. असे होणे केवळ अशक्य होते, कारण माझी श्री साईनाथांवर पूर्ण निष्ठा होती. मी लगेच उत्तरपत्रिकांच्या फेर तपासणीकरिता अर्ज केला.अर्ज करुन ४-५ महिने झाले तरी मुंबई विद्यापीठाकडून काहीच प्रत्युत्तर आले नाही. मी पासच आहे ही खबर लवकरात लवकर मिळावी म्हणून मी रोज साईबाबांची प्रार्थना करीत होतो. कारण पदवीधर झाल्यास बँकेत मला

पगारवाढ मिळणार होती, तसेच ऑफिसर म्हणून प्रमोशन टेस्टला बसण्यासाठी मी लायकसुध्दा होणार होतो. नोव्हेंबर मध्ये परीक्षा होणार होती व त्यासाठी अर्ज भरण्याची शेवटची तारीख जवळ आली तरी मुंबई विद्यापीठाकडून काहीच उत्तर आले नाही, म्हणून मी अर्ज भरला. (साईबाबा माझी परिक्षाच घेत होते का?) परंतु अभ्यासात माझे लक्षच लागत नव्हते. दरवर्षीप्रमाणे आम्ही पुण्यतिथी उत्सवाला शिरडीस जाऊन आलो. त्यावर्षी पुण्यतिथी गुरुवारी आली होती व त्याच्याच पुढच्या गुरुवारी माझी परीक्षा सुरु होणार होती. परिक्षेच्या आदल्या रात्री माझ्या मित्राचे (श्री. शिंदे) वडील माझ्या घरी आले व परत मला शिरडीस जाण्यासाठी सांगू लागले. (साईबाबा माझी परीक्षा घेत होते का?) कारण त्यांच्या सूनेला इंटरव्हयूचा कॉल आला होता,व तो निराप देण्यासाठी शिरडीस लगेच जाणे जरुरीचे होते. त्यांची सून घरातील इतर लोकांबरोबर शिरडीस बाबांच्या दर्शनास गेलेली होती. मी दुस—या दिवशी सुरु होणा—या परिक्षेची काळजी न करता शिरडीस रवाना झालो. निरोप पोचता करुन बाबांच्या समाधीचे दर्शन घेऊन परतलो. डिसेंबर महिन्यात अखेर साईनाथांना माझी दया आली. मुंबई विद्यापीठाने कळविले की, उत्तरपत्रिकेच्या फेरतपासणीमध्ये मी पास झालो. या सर्व प्रकारामध्ये बँक ऑफ बडोदा मधील माझी प्रमोशनची एक संधी हुकली होती. परंतु साईबाबांनी माझ्यासाठी काही आगळेच योजले होते.

सन १९८३ मध्ये 'नाबार्ड' (राष्ट्रीय कृषि आणि ग्रामीण विकास बँक) मध्ये ऑफिसरच्या थेट भरतीसाठी वर्तमानपत्रात जाहिरात आली होती व त्यानुसार अर्ज केल्यानंतर श्री साईबाबांच्या कृपाशीर्वादाने मी १५.११.१९८४ रोजी गुरुवारी त्या बँकेत सहाय्यक विकास अधिकारी म्हणून कामावर रुजू झालो. सध्या तेथे २ १/२ वर्षे पूर्ण केली आहेत. माझ्या दोन धाकटया बहिणी असून श्री साईनाथांच्या कृपेने त्यांचे विवाह लवकरात लवकर जुळून येवोत, हीच साईबाबांना माझी आर्त विनंति आहे.

माझ्या आईला आलेले अनुभवः-

१. माझी धाकटी बहीण कुमारी सविता ही सिंडीकेट बँकेत नोकरीला असून तिचे रोज डोके दुखते. त्याकरिता डॉक्टर तपासणी करण्यात आली. आईने साईबाबांच्या फोटोसमोर विनंती केली की, रिपोर्ट नॉर्मल येऊ दे, साईकृपेने रिपोर्ट नॉर्मल आला आहे.

२. अधून मधून माझ्या आईच्या छातीत अतिशय दुखत असे.परंतु त्या ठिकाणी उदी लावल्यावर तिला तात्काळ आराम पडतो.

# लकी नंबर

**सौ. विजयालक्ष्मी नारायण वैऊ**
३०/३२, महादेव शंकरशेठ ले
चिराबाझार, मुंबई – ४०००० 

मी आज ३० वर्षे गुरुपौर्णिमेसाठी शिर्डीस जाते. प्रत्येक वेळी मला काही ना क अनुभव येतोच. दहा वर्षापूर्वी पर्यंत मी श्री साईंच्या अखंड पारायणामध्ये भाग होते. कारण त्या वेळी भाग घेणाऱ्याला आपले नाव देऊन जाता येत असे व आप पाळी यावयाच्या आधी हजर राहिले तरी चालत असे.ह्या प्रमाणे बारा वर्षे पर्यंत पारायणामध्ये भाग घेतला. त्यानंतर नवीन पध्दत काढली की, नाव देऊन ज येणार नाही, ज्याला भाग घ्यावयाचा असेल त्याने कायम तेथे बसले पाहिजे. मल शक्य नव्हते कारण माझ्या बरोबर बरीच मंडळी व लहान मुले असतात. त्या सर्व खाण्यापिण्याची गैरसोय करुन कायम बसणे मला शक्य नव्हते. त्या करिता पारायणाच्या फोटोला हार घालून व श्रध्देने नमस्कार करण्यावरच माझ्या म समाधान मानून घेत होते, परंतु मनाला खंत असे.

ह्या वर्षी आम्ही ता..८ रोजी रात्री गुरुपौर्णिमेसाठी शिर्डीला पोहोचलो. गुरु संध्याकाळी मशिदीमधून समाधी मंदिरात जात असता बोर्ड लिहिलेला वाचला. त्य यंदाच्या अंखंड पारायणाबद्दल माहिती होती. ज्या कोणाला पारायणामध्ये भ घ्यावयाचा असेल, त्याने आपले नाव देऊन फॉर्म भरावा व रात्री ८ ते ९ वाजेपर्यंत काढला जाईल, त्या वेळी हजर राहावे. ते वाचून मला फार आनंद झाला व मी बागवे यांस फॉर्म कोठे भरावयाचा ते विचारले. त्यांनी सांगितले, चौथऱ्यावर भरण्याचे काम चालू आहे. लगेच मी माझा फॉर्म भरला व माझा नंबर घे आरतीसाठी समाधी मंदिरात गेले. आरती नंतर लेंडी बागेत जाऊन दत्तगुरुंचे द घेऊन माझी बहीण व मेव्हणे श्री. वसंत शं. हाटकर व भाऊ ह्या सर्वांना घेऊन बर आठ वाजता ड्रॉ चा निकाल ऐकण्यासाठी गेले.

चौथऱ्यावर श्री. बागवे व श्री. धानू उभे होते. एक लहान मुलगा एक, एक चि काढून हातात देत होता. श्री. धानू तो श्री. बागवेंना देत व श्री. बागवे त्या व्यक्तीचे वाचून त्यांना कोणता अध्याय वाचावयास येणार ते सांगत, त्याप्रमाणे नंबर देत. अ अध्याय ६ पासून सुरुवात होऊन ५०, ५१, ५२ अध्याय संपले तरीही माझा न आला नाही. माझी खूप निराशा झाली. शेवटचा नंबर श्री. बागवे यांनी हातात घेतल आता हा लकी नंबर कोणाचा आहे ते पाहू यां? असे म्हणत नाव वाचले- विजयालक्ष्मी नारायण वैऊडे. माझे नाव ऐकताच माझ्या डोळयांतून अश्रू वाहाव लागले. बाबांना नमस्कार करुन मी माझा नंबर घेतला व घरी गेले.

तेव्हा माझा भाऊ म्हणाला, बाबांनी तुला नंबर देऊन तुझी इच्छा पूर्ण केली

टले, ते सर्व खरे परतु मला परवा पहाटे चार वाजता मशिदीमध्ये हजर रहावयास हिजे. तेव्हा माझ्या मावशी म्हणाल्या, मी सुध्दा तुझ्या बरोबर पोथी ऐकावयास येईन. म्हटले, जरूर या.

शुक्रवारी रात्री बाबांना नमस्कार करुन आम्ही सर्वजण झोपलो. मध्यरात्री णीतरी दार ठोकले, म्हणून मी दार उघडून पाहिले, तर कोणी नाही. कारण ईहून येणारी माझी मुले, त्यांचे मित्र व भाचे पंचवटीने निघून रात्री २॥ ते ३ पर्यंत मीच येतात, परंतु ह्या वर्षी मुंबई बंद असल्यामुळे ते सर्वजण रात्री ११ च्या डीने निघाले, मग दार कोणी ठोकले?

म्हणून मी किती वाजले ते पाहिले. त्या वेळी २-४० झाले होते. मी मावशींना ठविले. पाणी गरम करुन त्यांना आंघोळीला दिले. सर्व प्रातःविधी उरकून आम्ही ची बरोबर ३-४५ ला मशिदीमध्ये गेलो. त्यावेळी अध्याय ४५ वा चालू होता. सहा जेपर्यंत आठ अध्याय कसे वाचून होणार?

मी बाबांचे नामस्मरण करीत बसून राहिले. इतक्यात रेखाताई आल्या. त्या सर्वांना कर वाचण्याची विंनंती करीत होत्या. काकड आरती नंतर अध्याय ५१ ची सुरुवात ली. इतक्यात दिगंबर भटजी व सर्व कमिटी मेंबर्स हजर झाले. मला तर धास्ती टावयास लागली. परंतु रेखाताईंनी भटजींना सांगितले, सर्वांनी घाई केली, तरी ही करु नका, अद्याप दोन अध्याय वाचून व्हावयाचे आहेत. भटजी स्वस्थ बसले. ध्याय ५२ रेखाताईंनी वाचला. त्यानंतर ५३ अध्याय समाप्तीचा वाद्यांच्या कडकडात सर्व मेंबर्सच्या उपस्थितीत वाचून समाप्त केला, व कृतज्ञतेने श्री साई चरणावर श्रूंचा अभिषेक केला. बाबांची आरती करुन पोथीच्या मिरवणूकीबरोबर समाधी देरात जाऊन, बाबांना मंगल स्नान घातले, व औक्षण केले. मनात म्हटले, धन्य बा तुमची. भक्तांची इच्छा पूर्ण करण्यासाठी तुम्ही कशी कळ फिरवाल याचा आम्हा नवांना कधीच उलगडा होणार नाही.

गुरुपौर्णिमेच्या दिवशी प्रातःकाळी माझ्याकडून समाप्तीचा अध्याय वाचून घेऊन झ्या मनाला जी शांती दिली, त्याला कशाची तोड नाही. अशीच कृपा करुन माझी वननौका ह्या संसाररूपी सागरांतून पैलतीरी सुखरुप पोहचवावी, ही तव चरणी र्थना.

# साईकृपे ऑपरेशन यशस्वी झाले !

**सौ. अर्चना संजीव चंदने**
माणिक कॉलनी, कल्याण.

आमच्या घरात बरीच वर्षे श्री साईबाबांची भक्ती चालू आहे. विशेष म्हणजे,माझ्या जन्माच्या वेळी पिताजी शिर्डीला होते. तेव्हा त्यांच्या कानात 'तू घरी जा' असा आवाज ऐकू आला. आजूबाजूला कोणी नसताना हा आवाज ऐकून त्यांना नवल वाटले. तरी ती साईइच्छा समजून ते लगेच घरी आले. त्यावेळी माझा जन्म झाला होता. तिच मी, आज ३० वर्षे साईकृपे सुखासमाधानाने निरोगी आयुष्य जगत आहे. असे असता माझ्यावर एक प्रसंग आला तो म्हणजे बाळंतपणात ऑपरेशनचा!

प्रथमच डोहाळे लागले व बाळंतपणासाठी माहेरी आले. सातव्या महिन्यात पहिले इंजेक्शन घेतले. डॉक्टरी तपासणी झाली तेव्हा बाळंतपण नैसर्गिकरीत्या होणार नाही, असे डॉ.नी सांगितले. खात्रीसाठी सोनोग्राफी करुन पाहिली. मूल पायाळू असून वार खाली असल्याने ऑपरेशन करणे भाग होते. त्यासाठी माझे रक्त तपासले. त्यात साखरेचे प्रमाण जास्त आढळले. तरी ऑपरेशन शिवाय उपाय नाही,हे ऐकून मी फार घाबरले. कधी औषधासाठी डॉ.ची पायरी न चढणारी मी आज फारच हताश झाले. मनोमन श्री साईंचे स्मरण केले. त्या बरोबर 'साई आहेत उभे पाठीशी दृढ भरवसा हा मानसी । भयभीती शिवेल कैसी । निर्धास्त मी जाहलो ।' या काव्यपंक्ती आठवल्या. मी निश्चिंत झाले. माझी भयभीती नाहीशी झाली. माझे ऑपरेशन चांगले होऊ दे! असे म्हणून हात जोडले. नंतर हॉस्पिटल मध्ये गेले. तेथे दिनांक ११-११-१९८६, मंगळवार रोजी ऑपरेशन करण्याचे ठरले. सोमवारी ब्लड प्रेशर वाढले होते पण मंगळवारी ऑपरेशपूर्वी ते पूर्णपणे नॉरमल झाले. त्या दिवशी सकाळी १० वाजे-पर्यंतची वेळ चांगली नव्हती. ती वेळ टळावी अशी सर्वांचीच इच्छा, आणि साईकृपे तसेच झाले. काही कामामुळे डॉक्टर ११ वा. हॉस्पिटलला हजर झाले. त्यामुळे अशुभ वेळ टळली. ११ वाजता मला ऑपरेशन थिएटर मध्ये नेण्यात आले. इंजेक्शनला घाबरणारी मी ऑपरेशनच्या वेळी थोडीही घाबरले नाही. एवढी निर्भयता केवळ साईकृपे प्राप्त झाली. म्हणूनच माझे ऑपरेशन यशस्वी झाले. दोन दिवसातच मी उठून बसू लागले. याचे डॉक्टरांनापण आश्चर्य वाटले. केवळ साईकृपेच ऑपरेशन यशस्वी होऊन मला पुत्ररत्नाचा लाभ झाला.

# श्री बाबांची कृपा

– कु. रेश्मा विजय धेन्डे
द्वारा डॉ. विजय धेन्डे,
२४२ रजनी गंधा, पंतनगर,
घाटकोपर, मुंबई-७५.

मी व माझे आईवडील बाबांची नित्य नेमाने भक्ती करतो. त्यांच्या चरणी आम्हा-सर्वांची अगदी दृढ श्रद्धा आहे. मला गेल्या वर्षी प्रत्ययास आलेली बाबांची थोरवी मी येथे देत आहे.

गेल्या वर्षी १९८६च्या एप्रिल महिन्यात माझी वार्षिक परीक्षा चालू होती. पहिले चार पेपर्स चांगले गेले. पण अचानक मला काय झाले तेच कळेना! मन अगदी अस्वस्थ झाले. डोके इतके सुन्न झाले की, चार पेपर्स दिल्यानंतर मला परिक्षेलाच जाऊ नये, असे वाटू लागले. मी तर अगदी आईजवळ हट्टच धरला की, मी परिक्षेलाच बसत नाही. असे यापूर्वी कधीच झाले नव्हते. माझ्या आई-वडिलांच्या तोंडचे पाणीच पळाले. त्यांनी बाबांचा धावा सुरु केला. आईने मला उदीचे पाणी प्यावयास दिले. ते घेतल्यावर मला लगेच झोप आली. अन् काय झाले कृपास हाऊक! अचानक पहाटे मला जाग आली. मी अगदी शांत मनाने पुस्तके काढून माझा अभ्यास पूर्ण केला व निश्चित मनाने पेपरही दिला. केवळ बाबांच्या कृपेमुळेच मी ती परीक्षा देऊ शकले व उत्तमरितीने पासही झाले. माझ्या कृपाळू बाबांनी आपल्या भक्ताची लाज राखली व मोठ्या संकटातून मला वाचविले.

बाबांचा वरदहस्त सदैव आम्हा सर्वांच्या पाठी राहो व सर्व साईभक्तांना त्यांचा लाभ होवो, हीच साईचरणी प्रार्थना.

## लेखक - कवींस निवेदन

**श्री साईलीला मासिकाकडे साहित्य पाठविताना लेखक-कवींना पुढील गोष्टींची दक्षता घेणे आवश्यक आहे.**

**सुवाच्च अक्षरात कागदाच्या डाव्या बाजूस भरपूर समास सोडून लिखाण असावे, ते पाठोपाठ असु नये, शक्यतो टंकलिखित असावे.**

**ह्यात असलेल्या संतांविषयीचे लेख, सामान्य दर्जाचे अनुभव पाठवू नयेत.**

**अभ्यासपूर्ण, तर्कशुद्ध, मीमांसक व वैचारिक स्वरुपाच्या लेखांना प्राधान्य दिले जाईल.** **का.सं.**

ो साईलीला ऑक्टोबर १९८७ चा अंक शिल्लक नसल्याने कृपया त्या अंकाची
ागणी करु नये.

# शिरडी वृत्त
# सप्टेंबर – १९८७

या महिन्यात श्रींच्या दर्शनासाठी भक्तांची गर्दी नेहमीप्रमाणे होती. काही कलाकारांनी श्रींच्या पुढे हजेरी दिली, ती खालीलप्रमाणेः-

**कीर्तनः-**
१) ह.भ.प. मधुकर गणेश सुर्यवंशी, संस्थान गवई, कीर्तनकार–प्रवचनकार यांची कीर्तने एकादशी व महत्त्वाचे दिवशी झाली.
२) ह.भ.प. लक्ष्मण महाराज, वाकचौरे, शिरडी.
३) ह.भ.प. धुडकोजी महाराज, चाळीसगांव.

**प्रवचनः-** १) ह.भ.प. लक्ष्मीनारायण किसनलाल दायमा, शेगांव.
२) ह.भ.प. वसंत बापूराव पवार, चिमणा बाळापूर.
३) ह.भ.प. नारायण जोशी, पिंपरी.

**भजन, गायन वादन वगैरेः–** १) त्रिमूर्ती गणेश मेळा, वैजापूर २) सौ. रंजना जाधव, गोखळी ३)श्री. शिवशक्ती मंडळ, मुंबई ४)श्री. श्यामचरण बाबा, हैद्राबाद ५)श्री. दत्तराज विठ्ठल खेर, मुंबई ६)श्री. पुरुषोत्तम बापूराव धुमाळे, काजीखेड ७)श्री. म्हाळसाकांत भजनी मंडळ, जेजुरी ८) श्री रतनलाल शर्मा, नागपूर ९) श्री. कल्याण चौधरी, कलकत्ता १०)श्रीमती पूर्वी चौधरी, कलकत्ता ११)श्री. वेंकटेश्वर, हमम १२) श्री. विजय पवार, लक्ष्मीवाडी १३) श्री. अरुण ओंकारदास सोमाणी, संगमनेर १४) श्रीमती शकुंतला मुजूमदार १५) कु. चित्रा पहेलजाणे, दिल्ली १६) सौ. सुनिता गणेश केळकर, सांगली १७) श्रीमती राजेश्री केळकर १८) श्री. श्रीराम सातर्डेकर, मुंबई.

**हवापाणीः**-शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही. पाऊस चांगला पडला.

## अव्यक्त साई जगती, शुभ संक्रमण पहाती!

तिळ युक्त गूळ हाती, ही भाव युक्त भक्ती।
वात्सल्य युक्त नाती, संदेश हाच देती॥
धरु साई चरणी प्रीती, देईल तोच शक्ती।
नको अन्य काही युक्ती, हे धर्म सांगताती॥
अव्यक्त साई जगती, शुभ संक्रमण पहाती।
जन सर्व तुष्टवीती, आशीष दान देती॥

**- श्री. मधुकर अंबाडे**
अंबाडे हाऊस, दांडिया बाजार,
बडोदा.

# श्री साईबाबा संस्थान, शिरडी

## श्री साईबाबा संस्थान प्रकाशित पुस्तकांची यादी

| अनु क्र. | पुस्तकाचे नांव | भाषा | किंमत | पॅकींग व पोस्टेज |
|---|---|---|---|---|
| १. | श्री साई सत्‌चरित | मराठी | ३१-०० | ९-०५ |
| २. | —„— | इंग्रजी | १४-५० | ६-५० |
| ३. | —„— | हिंदी | — | — |
| ४. | —„— | गुजराथी | १९-०० | ६-५० |
| ५. | —„— | कन्नड | १३-५० | ८-०० |
| ६. | —„— | तेलगु | १८-०० | ८-०० |
| ७. | —„— | तामीळ | — | — |
| ८. | —„— | सिंधी | २२-०० | ७-५० |
| ९. | श्री साई सत्‌चरित पोथी | गुजराथी | ३१-०० | १०-५० |
| १०. | श्री साई लिलामृत | मराठी | — | — |
| ११. | —„— | हिंदी | — | — |
| १२. | —„— | गुजराथी | ६-६५ | ४-०० |
| १३. | अवतार व कार्य | मराठी | — | — |
| १४. | स्तवन मंजिरी | मराठी | ०-६५ | ३-५० |
| १५. | —„— | हिंदी | १-०० | ३-५० |
| १६. | —„— | गुजराथी | ०-९० | ३-५० |
| १७. | सगुणोपासना (आरती) | मराठी | ०-७० | ३-५० |
| १८. | —„— | हिंदी | १-२५ | ३-५० |
| १९. | —„— | गुजराथी | ०-८० | ३-५० |
| २०. | —„— | तेलगु | २-५० | ५-५० |
| २१. | —„— | सिंधी | १-२५ | ३-५० |
| २२. | दासगणूकृत ४ अध्याय | मराठी | १-८५ | ३-५० |
| २३. | सचित्र साईबाबा | मराठी/इंग्रजी | ४-८० | ५-५० |
| २४. | मुलांचे साईबाबा | मराठी | — | — |
| २५. | —„— | इंग्रजी | १-६५ | ३-५० |
| २६. | —„— | हिंदी | — | — |
| २७. | —„— | गुजराथी | १-६५ | ३-५० |
| २८. | —„— | तेलगु | — | — |
| २९. | रुद्राध्याय (अ ११ वा) | मराठी | ०-८० | ३-५० |
| ३०. | मार्गदर्शिका (शिर्डी गाईड) | मराठी | — | — |
| ३१. | —„— | इंग्रजी | — | — |
| ३२. | —„— | गुजराथी | १-५० | ३-५० |
| ३३. | साई दि सुपरमॅन | इंग्रजी | ७-२५ | ४-०० |
| ३४. | साईबाबा ऑफ शिर्डी (भरुचा) | इंग्रजी | ६-५० | ४-०० |
| ३५. | साईबाबा ऑफ शिर्डी (प्रधान) | इंग्रजी | ३-०० | ४-०० |
| ३६. | अष्टोत्तर शत नामावली | मराठी | १-०० | ३-५० |
| ३७. | रघुनाथ सावित्री भजनमाला | मराठी | १५-२५ | ४-५० |